सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
Solapur Tarun Bharat
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | गुरूवार, दि. १३ मार्च २०२५ | वर्ष दुसरे | अंक ३४७ | पाने : ८ | किंमत रु. ६/-
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## फेक पनीर विक्री विरोधात कडक कारवाई करणार - अजित पवार

मुंबई : फेक पनीर किंवा आर्टिफिशियल पनीर हे निश्चितच नागरिकांच्या आरोग्यासाठी धोक्याचे आहे. हे पनीर विक्री करीत असलेल्या विक्रेते व संबंधितांवर कडक कारवाई करण्यात येईल. अनॉलॉग चीज च्या नावाखाली आर्टिफिशल पनीर किंवा फेक पनीर विक्रीबाबत संबंधित अधिकारी, लोकप्रतिनिधी तसेच या विषयातील तज्ज्ञ व्यक्तींची बैठक घेण्यात येईल. या बैठकीत निर्णय घेऊन फेक पनीर विक्री बाबत कडक कारवाई करण्यात येईल, असा इशारा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज विधानसभेत लक्षवेधी सूचनेच्या उत्तरात दिला.

नालॉग चीज हा पदार्थ राज्यात नालॉग पनीर, आर्टिफिशियल पनीर किंवा फेक पनीर या नावाने विक्री केल्या जात असल्याबाबत सदस्य विक्रम पाचपुते यांनी लक्षवेधी सूचना उपस्थित केली होती. या लक्षवेधी सूचनेच्या चर्चेत सदस्य कैलास पाटील यांनीही सहभाग घेतला. उपमुख्यमंत्री पवार या सूचनेच्या उत्तरात माहिती देताना म्हणाले का, खाद्यपदार्थांतील भेसळ ओळखण्यासाठी त्यांचे नमुने घेण्यात येतात. या नमुन्यांची तपासणी करून त्याचे विश्लेषण करण्यात येते. प्रयोगशाळांमधील विश्लेषणामुळे भेसळ आढळलेल्या नमुन्यांवर कारवाई करीत भेसळयुक्त पदार्थ जनतेमध्ये जाण्यापासून रोखता येतात. त्यासाठी अन्न व औषध प्रशासनाच्या नवीन प्रयोगशाळा, प्रयोगशाळांचे बळकटीकरण यासाठी भरीव निधी देण्यात येईल. फेक पनीरची विक्री, साठवणूक व वाहतुक विरोधात कारवाई करण्यासाठी सध्या अस्तित्वात असलेल्या नियमांमध्ये सुधारणा करून ते अधिक कठोर करण्यात येतील. तसेच केंद्र शासनाच्या नियमांमध्ये बदल करण्यास संबंधित केंद्रीय मंत्र्यांची चर्चा करण्यात येवून विनंती करण्यात येईल. कुठल्याही परिस्थितीत अशा पनीर विक्री करणाऱ्यांवर कारवाई करण्यात येणार असल्याचा स्पष्ट इशाराही उपमुखमंत्री श्री. पवार यांनी दिला.

## 'राजवाडा रिकामा करा, महाराज येत आहेत' ; नेपाळमध्ये सत्तांतराचे वारे

काठमांडू : भारताच्या शेजारी असलेल्या आणि २००८ पर्यंत हिंदू राष्ट्र म्हणून ओळखल्या जाणाऱ्या नेपाळमध्ये सध्या माओवादी कम्युनिस्टांची सत्ता आहे. या सत्ताधाऱ्यांविरोधात नेपाळमध्ये आंदोलन सुरू आहे. बदलाचे वारे वाहण्यास सुरुवात झाली आहे. नेपाळमध्ये पुन्हा एकदा सत्तांतर होण्याची चर्चा जोर धरू लागली आहे. याला निमित्त आहे ते ताज्या घटनाक्रमाचे

माओवादी सत्तेत आल्यानंतर राजधानी काठमांडूतून बाहेर जाऊन स्थायिक झालेले नेपाळचे शेवटचे राजे ज्ञानेंद्र बीर बिक्रम शाह देव पुन्हा एकदा काठमांडूत आले आहेत. त्रिभुवन आंतरराष्ट्रीय विमानतळावर नेपाळ हजारो तरुणांनी राजाचे स्वागत केले. याप्रसंगी 'नारायणहिटी खाली गर, हाम्रो राजा आउंदै छन' आणि 'जय पशुपतिनाथ, हाम्रो राजालाई स्वागत छ' या दोन नेपाळी भाषेतील घोषणा वारंवार देण्यात आल्या. नारायणहिटी हे नेपाळच्या राजवाड्याचे नाव आहे. नेपाळी तरुण सरकारला उद्देशून राजवाडा रिकामा करा, महाराज येत आहेत आणि जय पशुपतीनाथ, आमच्या महाराजांचे स्वागत आहे अशा घोषणा देत होते.

मागील दोन महिने ज्ञानेंद्र बीर बिक्रम शाह देव हे पोखरा या पर्यटनस्थळी होते. तिथे त्यांनी अनेक मंदिरांमध्ये जाऊन देवदर्शन घेतले. नागरिकांशी थेट संवाद साधला. ज्ञानेंद्र यांच्या या दौऱ्यातून त्यांनी नेपाळच्या राजकारणात सक्रीय होत असल्याचा स्पष्ट संकते दिला. आता ज्ञानेंद्र बीर बिक्रम शाह देव काठमांडूत येताच 'राजवाडा रिकामा करा, महाराज येत आहेत' अशी घोषणा तरुण देऊ लागले आहेत. यामुळे नेपाळमध्ये पुन्हा एकदा राजेशाही येणार अशी चर्चा सुरू झाली आहे.

नेपाळच्या संसदेत १४ सदस्य असलेल्या राष्ट्रीय प्रजातांत्रिक पार्टीने जाहीरपणे ज्ञानेंद्र बीर बिक्रम शाह देव यांना पाठिंबा दिला आहे. तर एखाद्या पक्षाचे वेगळे मत असू शकते पण नेपाळमध्ये राजेशाही ही इतिहासजमा झाली आहे आणि पुन्हा येणार नाही, असे सत्ताधाऱ्यांकडून सांगितले जात आहे.

नेपाळमध्ये राजेशाहीची अखेर २००८ मध्ये झाली. राजेशाही संपल्यापासून नेपाळमध्ये आतापर्यंत १३ वेळा सत्तांतर झाले. पण अद्याप देशात स्थैर्य आलेले नाही. याउलट नेपाळमध्ये राजेशाही सलग २४० वर्षे कार्यरत होती. यामुळे राजकीय स्थैर्यासाठी नेपाळची तरुणाई पुन्हा एकदा राजेशाहीची मागणी करू लागली आहे.

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार ऑक्टोबर २०२४ मध्ये ज्ञानेंद्र बीर बिक्रम शाह देव भूतानच्या दौऱ्यावर गेले होते. महाराज नसूनही त्यावेळी भूतानमध्ये ज्ञानेंद्र बीर बिक्रम शाह देव यांच्यासाठी सगळीकडे लाल गालिचा अंथरण्यात आला होता. यानंतर फेब्रुवारी महिन्यात एक व्हिडीओ करुन ज्ञानेंद्र बीर बिक्रम शाह देव नेपाळमधील अस्थिरतेविषयी चिंता व्यक्त केली होती. देशाच्या प्रगतीसाठी स्थिर सत्तेची आवश्यकता त्यांनी बोलून दाखवली होती. यानंतर आता मार्च महिन्यात ज्ञानेंद्र बीर बिक्रम शाह देव यांचे काठमांडूत आगमन होताच तरुणांमध्ये नवा उत्साह संचारल्याचे चित्र आहे.

## एमपीएससी पदभरती आणि पेपरफुटी, कॉपी, गुणांच्या पारदर्शकतेवर विधानपरिषदेत चर्चा

मुंबई : महाराष्ट्र विधानसभेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात महाराष्ट्र लोकसेवा आयोग संदर्भातील विविध मुद्द्यांवर चर्चा झाली. विधानपरिषदेचे सदस्य सतेज ऊर्फ बंटी पाटील, अभिजित वंजारी, अशोक ऊर्फ भाई जगताप, जयंत आसगावकर, राजेश राठोड, धीरज लिंगाडे, डॉ. प्रज्ञा सातव, मिलिंद नार्वेकर आणि सुनिल शिंदे यांनी एमपीएससी संदर्भात प्रश्न उपस्थित केला. यावेळी एमपीएससीमार्फत होणारी पदभरती आणि पारदर्शकता व पेपरफुटीवर प्रश्न विचारण्यात आला. यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उत्तर दिले.




## जनतेने जास्त व्याज देणाऱ्या योजनांच्या अमिषास बळी पडू नये - मुख्यमंत्री

मुंबई: राज्यातील जनतेने जास्त व्याज देणाऱ्या योजनांच्या अमिषास बळी पडू नये, असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानपरिषदेमध्ये केले. सदस्य शशिकांत शिंदे यांनी टोरेस घोटाळा प्रकरणी उपस्थित केलेल्या प्रश्नाला उत्तर देताना मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. जादा व्याज देणाऱ्या ९९ टक्के योजना या फसव्या असल्याचे सांगून मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की, कोणीही अशा प्रकारे जादा व्याज देऊ शकत नाही. बँकेच्या व्याजदरापेक्षा दोन ते चार टक्के जास्ती व्याज दिले जाणे शक्य आहे. पण त्यापेक्षा जास्त किंवा भरघोस व्याज देणे कोणालाही शक्य होत नाही. त्यामुळे असे जादा व्याजाचे अमिष देणाऱ्या योजना फसव्याच असतात. त्यांच्या अमिषाला जनतेने बळी पडू नये आणि अशा फसव्या योजनांमध्ये गुंतवणूक करू नये असे आवाहन मुख्यमंत्री फडणवीस यांनी केले.

## निवडणूक प्रक्रियेला बळकटी देण्यासाठी निवडणूक आयोगाची राजकीय पक्षांसोबत चर्चा

मुंबई : भारत निवडणूक आयोगाने सर्व राष्ट्रीय आणि राज्यस्तरीय राजकीय पक्षांना ३० एप्रिल २०२५ पर्यंत निवडणूक प्रक्रियेशी संबंधित कोणत्याही अपूर्ण राहिलेल्या मुद्द्यांवर सूचना देण्याचे आमंत्रण दिले आहे. आयोगाने पक्षांना पाठवलेल्या पत्रामध्ये पक्षाध्यक्ष आणि वरिष्ठ नेत्यांसोबत परस्पर सोयीस्कर वेळी संवाद साधण्याची कल्पना मांडली आहे, जेणेकरून कायदेशीर चौकटीत राहून निवडणूक प्रक्रिया अधिक बळकट करता येईल.

मागील आठवड्यात झालेल्या निवडणूक आयोगाच्या पत्रकार परिषदेवेळी मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांतील मुख्य निवडणूक अधिकारी, जिल्हा निवडणूक अधिकारी आणि निवडणूक नोंदणी अधिकारी यांना राजकीय पक्षांसोबत नियमित संवाद साधण्याचे निर्देश दिले होते. तसेच, अशा बैठकीत मिळणाऱ्या सूचनांचे निराकरण प्रस्थापित कायदेशीर चौकटीतच करण्यास सांगितले होते. या संदर्भात, आयोगाने ३१ मार्च २०२५ पर्यंत कार्यवाही अहवाल सादर करण्याच्या सूचनाही दिल्या आहेत.

राजकीय पक्ष हे निवडणूक प्रक्रियेशी संबंधित प्रमुख घटक असून, भारतीय संविधान आणि कायदेशीर चौकटीत २८ घटकांचा समावेश आहे. निवडणूक आयोगाने आपल्या पत्रात लोकप्रतिनिधित्व अधिनियम १९५० आणि १९५१, मतदार नोंदणी नियम, १९६०, निवडणूक आचारसंहिता १९६१, तसेच सर्वोच्च न्यायालयाचे आदेश आणि आयोगाने वेळोवेळी जारी केलेली मार्गदर्शक तत्त्वे या माध्यमातून पारदर्शक आणि विश्वासार्ह निवडणूक प्रक्रिया सुनिश्चित केली असल्याचे नमूद केले आहे. आयोगाच्या वेबसाइटवर ही सर्व नियमावली उपलब्ध आहे.

राजकीय पक्षांनी या विकेंद्रित संवाद प्रक्रियेत सक्रियपणे सहभागी व्हावे, असे आवाहन निवडणूक आयोगाने केले आहे.

## बिडकीन ऑरिक सिटीत जपानची निडेक ग्लोबल अप्लायन्स प्रकल्प उभारणार

### १००२ कोटींची गुंतवणूक करून होम अप्लायन्सचा प्रकल्प उभारणार

तभा वृत्तसेवा

बिडकीन दि १२ मार्च बिडकीन ऑरिक सिटीत जपानची निडेक ग्लोबल अप्लायन्स कंपनी १००२ कोटींची गुंतवणूक करून होम अप्लायन्सचा प्रकल्प उभारणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत याबाबतचा सामंजस्य करार करण्यात आला. या कंपनीच्या माध्यमातून ७०० ते १००० जणांना प्रत्यक्ष रोजगार मिळणार आहे, अशी माहिती मुख्यमंत्री कार्यालयातील सूत्रांनी दिली.निडेक ग्लोबल होम अप्लायन्सेसची ९ देशांत गुंतवणूक आहे. कंपनीचे १५ हजारांपेक्षा अधिक कर्मचारी आहेत. रेफ्रीजरेटर, वॉशिंग मशीनच्या मोटर्स, ड्रायर यासह अनेक होम अप्लायन्सची निर्मिती या कंपनीकडून केली जाते. यापूर्वी व्हिडिओकॉन कंपनीच्या माध्यमातून होम अप्लायन्सची मोठ्या प्रमाणात निर्मिती होत होती. त्यामुळे संभाजीनगर परिसरात मोठ्या प्रमाणात या कंपन्यांचे व्हेंडर तयार होते. व्हिडिओकॉन बंद पडल्यामुळे यातील अनेक छोटे उद्योग संकटात आले होते. या नव्या कंपनीमुळे या लघुउद्योगांना देखील फायदा होणार असल्याचे व्यापारी महासंघाचे माजी अध्यक्ष अजय शहा यांनी सांगितले. वर्षभरात ऑरिक सिटीत अजून २० हजार कोटींची गुंतवणूक होणार आहे. यात प्रत्यक्ष, अप्रत्यक्षरीत्या २५ हजार रोजगार निर्माण होतील, अशी माहिती सूत्रांनी दिली. आतापर्यंत बिडकीन आणि शेंद्रात ७७ हजार कोटींची गुंतवणूक झाली असल्याची माहिती ऑरिकचे व्यवस्थापक महेश पाटील यांनी दिली. टोयोटा, जेएसडब्ल्यू, एथर या कंपन्यांची गुंतवणूक वर्षभरात निश्चित झाली आहे. याशिवाय अवनी पॉवर यांनी १५८ एकर जागा मागितली आहे. त्यांची १०५२१ कोटींची गुंतवणूक केली जाणार आहे, तर टोयोटा टुशो कॉर्पोरेशन टेक्नो पार्क बिझनेसने ७०० कोटींच्या प्रकल्पासाठी ७५ एकरची जागा मागितली आहे.



### एमजीएम हॉस्पिटल ६00 कोटींतून उभारणार ऑरिक सिटीत रुग्णालय

एमजीएम संस्थेला ऑरिकमध्ये ३५ एकर जागा मिळाली आहे. संस्थेकडून ६00 कोटींची गुंतवणूक करण्यात येणार आहे. यात पहिल्या टप्प्यात ५0 बेडच्या हॉस्पिटलची उभारणी केली जाईल. नंतर १00 बेड आणि नंतर १५0 बेडचे हॉस्पिटल होईल. फिजिओथेरपी महाविद्यालय आणि नर्सिंग महाविद्यालय यासह इतर उपक्रम सुरू केले जातील, अशी माहिती एमजीएमचे सचिव अंकुशराव कदम यांनी माहिती दिली.




## नगरमध्ये ०५ लाखांची विदेशी सिगारेट जप्त

नगर : भारतामध्ये बंदी असलेल्या विदेशी सिगारेटची विक्री करणाऱ्यावर स्थानिक गुन्हे शाखेने छापा टाकून ५,०३,०००/- रू किंमतीची विदेशी सिगारेट जप्त केली आहे.

गुन्हे शोध पथकास गोपनीय माहीती मिळाली की, नरेश जयपालदास कटारिया, रा.अहिल्यानगर हा त्याचे राधास्वामी स्टोअर्स, कापडबाजार, अहिल्यानगर या दुकानामध्ये भारतामध्ये प्रतिबंधीत केलेले विदेशी सिगारेट बंदी असताना विक्री करत आहे.पथकाने मिळालेल्या माहितीवरून पंचासमक्ष राधास्वामी स्टोअर्स, कापडबाजार, अहिल्यानगर येथे दुकानामध्ये जाऊन तेथे असलेल्या इसमास पोलीस पथक व पंचाची ओळख सांगुन त्याचे नाव विचारले असता त्याने त्याचे



नाव नरेश जयपालदास कटारिया, वय ४२, रा.मिस्कीननगर, तारकपुर, अहिल्यानगर असे असल्याचे सांगीतले.पंचासमक्ष राधास्वामी स्टोअर्सची झडती घेतली असता दुकानामध्ये भारत सरकाने प्रतिबंधीत केलेले विदेशी बनावटीचे सिगारेट त्यात १,६०,०००/- रू किं. त्यात ESSE Light कंपनीचे ८० विदेशी सिगारेट बॉक्स, २,४८,०००/- रू किं.त्यात ESSE SPECIAL GOLD कंपनीचे १२४ विदेशी सिगारेट बॉक्स, २०,०००/- रू किं. त्यात ESSE CHANGE POP कंपनीचे १० सिगारेट बॉक्स व ७५,०००/- रू किं. त्यात DUNHILL कंपनीचे २५ विदेशी सिगारेट बॉक्स असा एकुण ५,०३,०००/- रू किंमतीचे विदेशी सिगारेट असा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

ताब्यात घेण्यात आलेल्या नरेश जयपालदास कटारिया, वय ४२, रा.मिस्कीननगर, तारकपुर, अहिल्यानगर हा भारत सरकारने प्रतिबंधीत केलेल्या विदेशी सिगारेट वितरण व व्यापाराकरीता बेकायदेशीरपणे कब्जात बाळगून विक्री करण्याचे उद्देशाने बाळगताना मिळून आल्याने त्याचेविरूध्द कोतवाली पोलीस स्टेशन गुरनं २४१/२०२५ सिगारेट आणि इतर तंबाखु उत्पादने अधिनियम २००३ चे कलम ७ (१), ७ (३), २० (२) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

सदरची कारवाई जिल्हा पोलिस अधीक्षक राकेश ओला, अपर पोलीस अधीक्षक प्रशांत खैरे, उपविभागीय पोलिस अधिकारी नगर शहर विभाग अमोल भारती यांचे सुचना व मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी केलेली आहे

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## ‘बसवेश्वर’मध्ये मानवता सन्मान समानता शपथ

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १२ मार्च -** श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्था, लातूर द्वारा संचलित महात्मा बसवेश्वर महाविद्यालयातील युवती मंच व महिला तक्रार निवारण समिती यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून शिव्या मुक्त समाज अभियानांतर्गत मानवता सन्मान समानता शपथ महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय गवई यांनी दिली.

यावेळी सुप्रसिद्ध वक्त्या डॉ. क्रांती मोरे, पर्यवेक्षिका प्रा. वनिता पाटील, रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. शिवप्रसाद डोंगरे, प्रा. किसनाथ कुडके, स्टाफ सचिव प्रा. रवींद्र सुरवसे, प्रा. रवींद्र सोनोने, प्रा. विश्वनाथ स्वामी, प्रा. किसनाथ कुडके आणि डॉ. अश्विनी रोडे यांची उपस्थिती होती.

यावेळी बोलताना डॉ. क्रांती मोरे म्हणाल्या की, स्त्रियांमध्ये कुटुंब व्यवस्थापनाबरोबरच समाज आणि राष्ट्राला आकार आणि संस्कार देण्याची अद्वितीय क्षमता आहे त्यामुळे स्त्रियांनी स्व जाणीव ठेऊन आत्म सन्मानाने जगावे आणि आपला आपणच सन्मान मिळवावा असे तया म्हणाल्या.

कार्यक्रमाचा प्रारंभ कु. मिताली आगलावे आणि कु. भक्ती पांचाळ यांनी गायलेल्या नारीशक्ती गीताने झाला. त्यानंतर जगत् ज्योती महात्मा बसवेश्वर आणि क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांना अभिवादन करण्यात आले.

अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्य डॉ. संजय गवई म्हणाले की, ज्या समाजात स्त्रीशक्तीचा सन्मान होतो त्या समाजाचे भवितव्य हे भव्य दिव्य असते म्हणूनच केवळ ०८ मार्च जागतिक महिला दिनी सन्मान न करता नित्य जीवनातही स्त्रियांचा सन्मान केला गेला पाहिजे आणि आज आपण घेतलेली शपथ दैनंदिन व्यवहारांमध्ये कार्यान्वित करावी असे आवाहनही त्यांनी याप्रसंगी केले.



### संक्षिप्त वृत्त...

## लातूर जिल्ह्यात शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश जारी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १२ मार्च -** कायदा व सुव्यवस्था, सार्वजनिक शांतता व सुरक्षितता अबाधित राखण्यासाठी अपर जिल्हादंडाधिकारी केशव नेटके यांनी महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ च्या कलम ३७ (१) व (३) नुसार संपूर्ण लातूर जिल्ह्याच्या हद्दीत शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश जारी केले आहेत. हा आदेश संपूर्ण लातूर जिल्ह्याच्या हद्दीत ११ मार्च, २०२५ रोजीच्या ००.०१ वाजेपासून ते २५ मार्च, २०२५ रोजीच्या २४.०० वाजेपर्यंत (दोन्ही दिवस धरुन) लागू राहील.

शस्त्रबंदी व जमावबंदी काळात या आदेशान्वये शस्त्रे, सोटे, तलवारी, भाले, दंडे, बंदुका, सुरे, काठ्या, लाठ्या किंवा शारीरिक इजा करण्यासाठी वापरता येईल, अशी कोणतीही वस्तू सोबत घेऊन फिरता येणार नाही. कोणताही दाहक पदार्थ किंवा स्फोटक पदार्थ बाळगता येणार नाही, दगड किंवा इतर क्षेपणास्त्रे, सोडावयाची किंवा फेकावयाची उपकरणे बाळगणे किंवा जमा करणे किंवा तयार करण्यास मनाई राहील. व्यक्तीचे प्रेत, आकृत्या किंवा प्रतिमा यांचे प्रदर्शन करता येणार नाही. तसेच जाहीरपणे घोषणा करणे, गाणे म्हणजे वाद्य वाजविण्यास मनाई राहील. ज्यामुळे सभ्यता अगर नितीमत्ता यास धोका पोहोचेल अशा किंवा राज्याची सुरक्षितता धोक्यात येईल किंवा ज्यामध्ये उलथवून टाकण्याची प्रवृत्ती दिसून येत असेल अशी आवेशपूर्ण भाषणे, हावभाव करणे, सोंग आणणे, चित्रे, चिन्हे फलक किंवा इतर कोणत्याही जिन्नस किंवा वस्तू तयार करणे, त्यांचे प्रदर्शन किंवा प्रसार करणे यास मनाई करण्यात आली आहे.

## पुरोगामी महाराष्ट्रात महिला नेतृत्वाचे पर्व आनंददायी : डॉ. महादेव गव्हाणे

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १२ मार्च -** स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड आणि भारत शिक्षण प्रसारक मंडळ संचलित जयक्रांती कला वरिष्ठ महाविद्यालय (वाणिज्य व विज्ञान यांच्या संयुक्त विद्यमाने ‘विद्यापीठस्तरीय युवती नेतृत्व विकास कार्यशाळा २०२४- २५ जयक्रांती वरिष्ठ महाविद्यालयात संपन्न होत आहे. युवती शिबिरास विद्यापीठातील विविध महाविद्यालयातून १२० मुलींनी सहभाग नोंदविला.

सत्राचे अध्यक्ष संस्थेचे सचिव प्रा. गोविंदराव घार, उद्घाटक राजर्षी शाहू महाविद्यालयाचे प्राचार्य व विद्यापिठाच्या व्यवस्थापन परिषदेचे सदस्य डॉ. महादेव गव्हाणे, डॉ. मल्लिकार्जुन करजगी, संचालक राष्ट्रीय सेवा योजना स्वा.रा.ती. म. विद्यापीठ नांदेड, धर्मराज हल्लाळे, डॉ. कुसुम मोरे, प्रा.राहुल वाघमारे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. श्रीधर कोल्हे, डॉ. प्रमोद तांदळे,डॉ. केशव आलगुले आदी मान्यवर मंचावर उपस्थित होते.

## गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १२ मार्च -** अभिनव अध्यापक महाविद्यालयातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आलेला आहे. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांच्याकडून उन्हाळी-२०२४ मध्ये घेण्यात आलेल्या बी.एड. अभ्यासक्रमात गुणानुक्रमे विद्यापीठातून सर्वप्रथम सुबोध सर्वोत्तम मांदळे व सर्वतृतीय पांचाळ महानंदा रामू यांचा सत्कार महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुधाकर कुलकर्णी यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी डॉ. सुधीर भूमकर यांच्यासह विद्यार्थी, प्राध्यापक उपस्थित होते.



## भरदिवसा पाचजणांकडून मारहाण; एक गंभीर जखमी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १२ मार्च -** शहरातील अंबाजोगाई रोडवरील रेणापूर नाक्याजवळील एका बिअर बारसमोर पाच तरुणांनी एकास भर रस्त्यावर बेदम मारहाण केल्याची घटना मंगळवारी दुपारी घडली आहे. यातील जखमीवर लातूरच्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या रुग्णालयात उपचार सुरू असून त्याची प्रकृती गंभीर आहे. पोलिसांनी आरोपींना ताब्यात घेवून त्यांची शहरातुन धिंड काढली.

अंबाजोगाई रोडवरील एका बारमध्ये काही तरुण मंगळवारी मद्य प्राशन करीत होते. दरम्यान, बारमध्ये भांडण सुरू झाले. तेव्हा या भांडणात बिअरच्या बॉटल मारल्याने भांडण वाढत गेले. बिअर बारच्या बाहेर आल्यानंतरही भांडण सुरूच होते. त्यानंतर हे सर्वजण रोडवर आले आणि तेथेच ही बेदम मारहाणीची घटना घडली. ही घटना सीसीटीव्हीत कैद झाली आहे. घटनेची माहिती मिळताच शिवाजीनगर पोलीस ठाण्यातील पोलीस कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. तोपर्यंत जखमी व्यक्तीला स्थानिकांनी रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले होते. घटनास्थळी अनेकांनी घटनेचे मोबाइलमध्ये चित्रीकरण केले. पोलिसांनी आजूबाजूचे सीसीटीव्ही आणि इतर माहिती गोळा केली असून मारहाण करणारे पाचजण हे गुन्हेगारी पार्श्वभूमीचे आहेत. पोलीसांनी मारहाण करणाऱ्या आरोपींना ताब्यात घेवून त्यांची लातूर शहरातुन धिंड काढली. या प्रकरणी पोलीस पुढील तपास करीत आहेत.

# अनधिकृत कत्तलखाने बंद करा

### सकल हिंदू समाजाची निदर्शने

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १२ मार्च -** शहरातील अनधिकृत कत्तलखाने बंद करावेत, या मागणीसाठी सकल हिंदू समाजाच्यावतीने मंगळवारी महापालिकेच्या प्रवेशद्वारासमोर निदर्शने करण्यात आली. याबाबत आयुक्तांना मागण्यांचे निवेदन देण्यात आले. याबाबत तत्काळ कार्यवाही न केल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा निवेदनात देण्यात आला आहे.

देशामध्ये गोवंश हत्याबंदी कायदा करण्यात आला आहे. महाराष्ट्रात गोमातेस राज्यमातेचा दर्जा देण्यात आला आहे. असे असतानाही लातूर शहरात अनधिकृतपणे कत्तलखाने सुरू आहेत. अनधिकृतपणे गोमातांची, गोवंशाची हत्या करण्यात येत आहे. हत्या करून त्याचे मांस शहरातील विविध दुकानांतून विक्री केले जात आहे. यामुळे हिंदुंच्या भावना दुखावल्या जात आहेत. यापूर्वीही शहरात हा प्रश्न चिघळला होता. पण त्यानंतर या प्रश्नी महापालिका प्रशासन आणि पोलिसांनी गांभीर्याने घेत कार्यवाही केली होती.

आता पुन्हा शहरात गोवंश हत्या, अनधिकृत कत्तलखान्यांचा विषय चिघळला आहे. दोन दिवसांपूर्वी गोवंश मांस असलेले वाहन अडविले म्हणून दोन समाजात बाचाबाची, दगडफेकही झाली आहे. परिस्थिती गंभीर स्वरूप धारण करीत आहे. शहरात वारंवार



उद्भवणारा अनधिकृत कत्तलखाने हा विषय गांधी चौक ठाण्याचे पोलीस गांभीर्याने घेत नसल्याने तीव्र नाराजी पसरली आहे.

मंगळवारी सकल हिंदू समाजाच्यावतीने महापालिकेच्या मुख्य प्रवेशद्वारासमोर निदर्शने करून शहरातील कत्तलखाने तत्काळ बंद करावेत, अशी आयुक्तांना निवेदन देऊन करण्यात आली. याबाबत कार्यवाही न केल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे. कुठलाही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. या आंदोलनात सकल हिंदू समाजबांधव मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

## मालमत्ता कर व गाळे भाडे शास्ती माफी योजनेस मुदतवाढ

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १२ मार्च -** मनपाच्या वतीने मालमत्ता कर व गाळे भाडे शास्ती योजनेस मुदतवाढ देण्यात आली असून गाळेधारकांना आता ७५ टक्के सवलत दिली जात आहे. एमआयडीसी मधील मालमत्ताधारकांसाठीही ५० टक्के सवलत योजना राबविण्यात येत असून मालमत्ता धारकांनी या संधीचा लाभ घेत आपल्याकडील कर भरणा करावा असे आवाहन मनपा आयुक्त बाबासाहेब मनोहरे यांनी केले आहे.

दिनांक १७ मार्च पर्यंत ही सवलत योजना लागू राहणार आहे.या काळात थकबाकीदारांसाठी व्याज व शास्तीमध्ये ५० टक्के सवलत दिली जाणार आहे.चालू आर्थिक वर्षातील मार्च महिना सुरू झाला तरी काही मालमत्ता धारक व गाळे धारकानी अद्याप कर भरणा केला नसल्याने मनपा कर संकलन विभाग व मालमत्ता विभागाच्या वतीने धडक वसुली मोहीम राबविण्यात येत आहे.नागरिकांनी आपल्या मालमत्तेचा थकीत कर भरणा करावा यासाठी ५० टक्के शास्ती सुट लागू करण्यात आली होती. मनपा मालकीच्या व्यापारी संकुलातील गाळे धारकाकडे मोठ्या प्रमाणात गाळे भाडे प्रलंबित असल्याने त्याना व्याजात सुट देण्यात आली होती.

दोन्ही विभागाकडून शास्ती सुट लागू केल्याने बहुतांशी नागरिक व गाळे धारकानी आपल्या कडील कर,भाडे भरून योजनेचा लाभ घेतला.या योजनेस उस्फुर्त प्रतिसाद मिळत आहे. काही मालमत्ता धारक व गाळे धारक वैयक्तिक अडचणी मुळे कर भरणा करू न शकल्याने त्यानी महापालिकेकडे योजनेस मुदतवाढ देण्याची मागणी केली आहे.

थकबाकीदारांची मागणी व मार्च महिन्यात कर भरणा करण्याकडे असणारा कल विचारात घेऊन मनपा आयुक्त तथा प्रशासक बाबासाहेब मनोहरे यांनी वरील दोन्ही योजनेस १७ मार्च पर्यंत मुदतवाढ देण्याचा निर्णय घेतला आहे.

उर्वरित सर्व थकबाकीदार, मालमत्ता धारक व गाळे धारकानी १७ मार्च पर्यंत आपल्याकडील थकीत कर भरणा करून घ्यावा. त्या नंतर कोणतीही सूट लागू होणार नाही,असे कर संकलन विभागा मार्फत कळविण्यात आले आहे.

मार्च महिना सुरु झाल्याने थकीत कर व गाळे भाडे वसूलीसाठी नियुक्त पथकामार्फत जप्तीची कार्यवाही तीव्र करण्यात येत असून या अंतर्गत मालमत्ता सील करणे,अटकाव करणे,नळ कनेक्शन बंद करणे आदी कार्यवाही करण्यात येणार आहे. मालमत्ता व गाळे जप्त किंवा सील करूनही मालमत्ताधारकांनी कर भरणा न केल्यास अशा मालमत्ताधारकांच्या मालमत्तेचा लिलाव,विक्री करून कर वसूल करण्यात येणार आहे.

## सार्वजनिक ग्रंथालय संघाचे आज वार्षिक अधिवेशन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १२ मार्च -** जिल्हा सार्वजनिक ग्रंथालय संघाचे ४० वे वार्षिक अधिवेशन,जिल्हा सार्वजनिक ग्रंथालय संघ व नागाबुवा वाचनालय हेळंब,ता.देवणी यांच्या संयुक्त विद्यमाने,गुरुवार,दि.१३ मार्च २०२५ रोजी सरस्वती संगीत महाविद्यालयाच्य पाठीमागे,नंदादिप विद्यालय, कातळे नगर,लातूर आयोजित करण्यात आले असून, या अधिवेशनाचे उद्घाटन औसाचे आ.अभिमन्यु पवार यांच्या हस्ते सकाळी १०.३० वाजता होणार आहे.

महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघाचे अध्यक्ष डॉ.गजनान कोटेवार यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या या उद्घाटन सत्राला,महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संचालनालयाचे प्र.संचालक अशोक गाडेकर व लातूरच्या जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर घुगे यांची विशेष उपस्थिती राहणार आहे.

या प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ विचारवंत डॉ.सोमनाथ रोडे, जिल्हा ग्रंथालय अधिकारी वंदना काटकर-देशमुख,विभागीय सहाय्यक ग्रंथालय संचालक सुनील हुसे,राज्य ग्रंथालयाचे कार्योपाध्यक्ष राम मेकले, माजी अध्यक्ष प्राचार्य डॉ.रामेश्वर पवार,राज्य ग्रंथालय संघाचे कार्याध्यक्ष गुलाबराव पाटील, मराठवाडा विभाग ग्रंथालय संघाचे अध्यक्ष खंडेराव सरनाईक, कार्याध्यक्ष प्रभाकर कापसे,बीड जिल्हा ग्रंथालयाचे अध्यक्ष सुधीर चाटे,लातूर जिल्हा सार्वजनिक ग्रंथालय संघाचे कार्याध्यक्ष डॉ. ब्रिजमोहन झंवर, हेळंबच्या सरपंच अयोध्या सिरसे, नागाबुवा मठ संस्थानचे अध्यक्ष विठ्ठलराव पाटील,खाडगावचे सरपंच नेताजी देशमुख, पाखरसांगवीचे सरपंच भिमाशंकर लखादिवे हे लाभणार आहेत.

तत्पूर्वी साने गुरुजी विद्यालय ते नंदादीप विद्यालय,कातळे नगर दरम्यान ग्रंथ दिंडी निघणार आहे, त्याचे उद्घाटन दादाराव कराड वाचनालयाचे अध्यक्ष डॉ.हणुमंत कराड, जिल्हा परिषदचे माजी अध्यक्ष पंडितराव धुमाळ यांच्या हस्ते होणार आहे.

यावेळी कै. ॲड.त्र्यंबकदास झंवर काका आदर्श ग्रंथपाल कार्यकर्ता राज्यस्तरीय पुरस्कार कुंडलिक मोरे सोलापूर, कै.मारुती चिरके आदर्श ग्रंथपाल जिल्हास्तरीय पुरस्कार प्रकाश सोनकांबळे, पुरस्कार वितरण तसेच महाराष्ट्र शासनाचा ग्रंथमित्र पुरस्कार प्राप्त युवराज जाधव,ज्येष्ठ विधीज्ञ ॲड. शशिकिरण पाटील यांचा आ.अभिमन्यु पवार यांच्या हस्ते होणार आहे. दुपारी २ ते ३ दरम्यान महाराष्ट्र विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५०चा कायदा व विश्वस्त बदल अर्ज आणि इतर माहिती मार्गदर्शनाचे सत्र लातूर विभागाचे धर्मादाय सहाआयुक्त आर.ए.सासणे यांच्या अध्यतेखाली होणार असून,यावेळी लातूर विभागाचे धर्मादाय उपायुक्त एस.व्ही.एच.कादरी यांचे मार्गदर्शन होणार आहे.

## मानसिक व शारीरिक स्वास्थ राखण्यासाठी महिलांनी स्वतःसाठी अर्धा तास योगा करावा

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १२ मार्च -** सध्याची बिघडलेली जीवनशैली खाण्यापिण्याच्या चुकीच्या सवई आणि व्यायामाचा अभाव यामुळे आज प्रत्येकाला विविध समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. योगासने प्रत्येक व्यक्तीच्या शारीरिक आणि मानसिक आरोग्यासाठी महत्त्वाची आहेत. तेव्हा महिलांनी मानसिक व शारीरिक स्वास्थ राखण्यासाठी स्वतः करिता किमान अर्धा तास वेळ काढून योगा करावा असे आवाहन आर्ट ऑफ लिव्हिंगच्या ज्येष्ठ शिक्षिका डॉ. प्रणिता चाकूरकर यांनी केले.



लातूर येथील एमआयटी मेडिकल कॉलेज आणि यशवंतराव चव्हाण ग्रामीण रुग्णालयाच्या वतीने जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने महिलांचे मनस्वास्थ याबाबत प्रबोधन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते या कार्यक्रमात उपस्थित महिलांना मार्गदर्शन करताना डॉ. प्रणिता चाकूरकर बोलत होत्या.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी एमआयटी वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठता डॉ. एन. पी. जमादार हे होते. तर महिला उन्नतीकरण समितीच्या डॉ. सरिता मंत्री, जेष्ठ प्रा. चंद्रकला पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.

दैनंदिन कामाची दगदग आणि ताणतणाव यातून योगाच बिघडलेल्या जीवनशैलीतून मार्ग काढू शकतो असा मौलिक सल्ला देऊन डॉक्टर प्रणिता चाकूरकर म्हणाल्या की, मानसिक आरोग्य आणि शारीरिक आरोग्य एकमेकांशी जोडलेले आहेत. योगा हा व्यक्तीच्या शारीरिक आणि मानसिक आरोग्यासाठी महत्त्वाचा आहे. योगा पुरुष आणि महिला दोघांसाठीही तितकाच महत्त्वाचा असला तरी, महिलांसाठी त्याचे विशेष फायदे आहेत. शारीरिक ताकद वाढवण्या व्यतिरिक्त, योगा महिलांना मानसिक आरोग्याच्या समस्यांना तोंड देण्यास मदत करू शकतो.


महिलांच्या जीवनात उद्भवणारी आव्हाने आणि त्यांना सामोरे जाण्यासाठी मार्गदर्शन करून डॉ. चाकूरकर यांनी टेलिव्हिजन मोबाईलचा वापर कमी करून योगासाठी वेळ द्यावा असा मौलिक सल्ला दिला. यावेळी अनेकांनी मार्गदर्शन केले.

# मार्चमध्ये येणार उष्णतेची तीव्र लाट

### हवामान विभागाचा अंदाज; उष्माघात टाळण्यासाठी सजग व्हावे

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १२ मार्च -** गेल्या काही दिवसांपासून शहरासह जिल्ह्यात सायंकाळपासून ते सकाळी आठवाजेपर्यंत वातावरणात गारवा जाणवत आहे. सकाळी आठ वाजेनंतर दुपारी चार-पाच वाजेपर्यंत उकाडा जाणवत आहे. हवामान खात्याच्या अंदाजानुसार येणाऱ्या काही दिवसांमध्ये लातूर जिल्ह्यात उष्णतेची लाट जाणवू शकते. अशा परिस्थितीत उष्माघात होऊ नये यासाठी नागरिकांनी आतापासूनच सजग राहावे व प्रतिबंधात्मक उपायांवर अधिक भर द्यावा. तसेच, उष्माघाताची लक्षणे जाणवू लागल्यास तातडीने शासकीय रुग्णालयात उपचार करून घ्यावे, असे आवाहन प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.



यंदा फेब्रुवारी महिन्यापासून उन्हाळ्याला सुरूवात झाली आहे. मार्च महिन्यात उष्णतेत आणखी वाढ होत असल्याचे दिसून येत आहे. तापमानाचा पारा ३७ अंशांवर येऊन पोचला आहे. त्यातच आता येणाऱ्या काही दिवसांमध्ये लातूर जिल्ह्यात उष्णतेची लाट जाणवू शकते, असा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे. सौम्य त्रासात उष्णतेमुळे थकवा येणे, ताप येणे, शरीरावर रॅश उमटणे, हाता-पायाला गोळे येणे, चक्कर येणे अशी लक्षणे दिसतात. गंभीर त्रासात उष्माघातामुळे त्वचा कोरडी पडणे, डोके दुखणे, रक्तदाब वाढणे, मानसिक अस्वस्थता, बेशुध्द अवस्था अशा लक्षणांसह मृत्यूही होऊ शकतो. कष्टाची कामे उन्हात करू नका. शक्यतो उन्हाच्या वेळेत घराबाहेर जाणे टाळा. गडद रंगाचे तंग कपडे वापरू नका. मद्यपान, चहा, कॉफी, शीतपेय टाळा. खूप प्रथिनेयुक्त आणि शिळे अन्न खाऊ नका. उन्हाच्या काळात भर दुपारी स्वयंपाक करणे टाळा व स्वयंपाक घर हवेशीर ठेवा, असे आवाहन जिल्हा प्रशासनाच्यावतीने करण्यात आले आहे.

### लहान मुलांची काळजी घेण्याचे आवाहन

**उन्हाळ्यात लहान मुलांना पुरेसे पाणी आणि द्रव पदार्थ द्या. उन्हाळ्यात शरीरातील पाणी झपाट्याने कमी होते. त्यामुळे मुलांना भरपूर पाणी, लिंबूपाणी, ताक, नारळ पाणी आणि फळांचे रस द्यावेत. कोल्ड्रिंक्स आणि साखरयुक्त पेयांपासून दूर रहावे. हलका आणि पौष्टिक आहार द्या. उन्हाळ्यात जड आणि तळलेले पदार्थ टाळावेत. कलिंगड, काकडी, संत्री, द्राक्षे यासारखी पाण्याचे प्रमाण जास्त असलेली फळे द्यावीत.**

**दूध, दही आणि ताकाचा आहारात समावेश करावा. उन्हाळ्यात मुलांना हलके, सैलसर आणि सूती कपडे घालावेत. उन्हाळ्यात शरीराची झपाट्याने ऊर्जा कमी होते. त्यामुळे मुलांनी ८-१० तासांची झोप घ्यावी. घाम आणि त्वचेसंबंधी समस्या टाळण्यासाठी स्वच्छता ठेवा. दररोज अंघोळ करून अँटीसेप्टिक साबण वापरावा.**

# रक्तदान चळवळीत सहभागी व्हा

### शिक्षणाधिकारी नागेश मापारी यांचे आवाहन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १२ मार्च -** रक्तदान हे सर्वश्रेष्ठ दान आहे. आपल्या रक्तदानामुळे एखाद्याचा जीव वाचू शकतो. विद्यार्थी व शिक्षकांनी रक्तदान करून रक्तदान चळवळीत सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हा परिषदेचे माध्यमिक विभागाचे शिक्षणाधिकारी नागेश मापारी यांनी केले.

येथील राजमाता जिजामाता बी.एड. कॉलेजचे आंतरवासिता शिबिर सुरू असून या शिबिरांतर्गत मंगळवारी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराचे उद्घाटक म्हणून शिक्षणाधिकारी मापारी बोलत होते. अध्यक्षस्थानी संस्थेचे सचिव प्राचार्य डी. एन. केंद्रे होते. यावेळी उपशिक्षणाधिकारी संजय क्षीरसागर, संस्थेच्या अध्यक्षा के. ए. जायेभाये, प्राचार्य संगमेश्वर केंद्रे, उपप्राचार्या कविता केंद्रे, मुख्याध्यापिका स्वाती केंद्रे, अश्विनी केंद्रे, वैशाली केंद्रे, राजेंद्र जायेभाये, प्रा. डॉ. एन. के. सय्यद, प्रा. एच. बी. पडवळ, प्रा. ए. यू. करदुरे, राजीव मुंढे, विष्णू कराड, शिवकांत वाडीकर, परमेश्वर गित्ते यांच्यासह विद्यार्थी




उपस्थित होते.

प्रारंभी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्ज्वलन करून या शिबिराची सुरूवात झाली. राजमाता जिजामाता बी. एड. कॉलेजचा हा रक्तदान शिबिराचा उपक्रम स्तुत्य असल्याचे यावेळी शिक्षणाधिकारी मापारी म्हणाले. अध्यक्षीय समारोपात प्राचार्य केंद्रे म्हणाले, सध्या रक्ताचा तुटवडा असल्याने रक्तदान शिबिरांना प्रोत्साहन देण्याची गरज आहे.

रक्तदान शिबिरे ही काळाची गरज बनली असून यात सहभाग नोंदवावा, असे आवाहन त्यांनी केले. यावेळी श्रीकांत पांचाळ, रोहित डोंगरे, राधा जगताप, गिरीधर वाघमारे, राजीव मुंढे, पांडुरंग सुडे, विजयकुमार पवार, रविकुमार सोनवणे, अमरेश्वर शिवणे, गणेश कांबळे, सतीश जाधव, ऋषिकेश लंकाळे, मारोती गित्ते, पवन नवगिरे, विठ्ठल पेठे आदी विद्यार्थ्यांनी रक्तदान केले. सूत्रसंचालन सुमित जोशी यांनी केले तर आभार प्रियंका वाघमारे यांनी मानले.

## विनायक पै यांची सीआयआय महाराष्ट्र राज्य अध्यक्षपदी तर दीपक गर्ग यांची उपाध्यक्षपदी नियुक्ती

छत्रपती संभाजीनगर- टाटा प्रोजेक्ट्स लिमिटेड चे एमडी आणि सीईओ श्री. विनायक पै यांची २०२५-२६ साठी भारतीय उद्योग महासंघ महाराष्ट्र राज्य परिषदेचे अध्यक्ष म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे, तर सॅनी इंडियाचे उपाध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक श्री. दीपक गर्ग यांची भारतीय उद्योग महासंघ महाराष्ट्र राज्य परिषदेचे उपाध्यक्ष म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.भारताच्या आर्थिक वाटचालीत महाराष्ट्राची महत्त्वाची भूमिका असल्याने, नवीन नेतृत्व व्यवसाय वाढ, धोरणात्मक समर्थन, डिजिटल परिवर्तन आणि उद्योग-सरकार सहकार्याला गती देण्याचे उद्दिष्ट ठेवते. त्यांचे नेतृत्व राज्याच्या औद्योगिक आणि आर्थिक चौकटीला बळकटी देण्यावर लक्ष केंद्रित करेल, महाराष्ट्राची जागतिक स्पर्धात्मकता वाढविण्यासाठी नवोपक्रम, शाश्वतता आणि समावेशक विकासावर भर देईल.

## मधुमेह चिकित्सेमध्ये भारत जगाला मार्ग दाखवू शकतो - डॉ.व्ही मोहन

पुणे, ११ मार्च २०२५ : भारतामध्ये आपण स्वेदशी बनावटीची किफायतशीर वैद्यकीय उपकरणे,मॉलिक्युल्स,थेरपीज विकसित करून ती जगाला देऊ शकतो. मधुमेह चिकित्सेमध्ये जगाला मार्ग दाखवण्याचे सामर्थ्य भारतामध्ये आहे,असे मत मद्रास डायबेटिस रिसर्च फाऊंडेशनचे अध्यक्ष व डॉ.मोहनस् डायबेटिस स्पेशालिटिज सेंटर,चेन्नईचे अध्यक्ष डॉ. व्ही मोहन यांनी यावेळी व्यक्त केले. चेलाराम डायबेटिस इन्स्टिट्युट तर्फे पुण्यात जे.डब्ल्यू.मॅरिएट येथे ७ ते ९ मार्च २०२५ दरम्यान ९ व्या आंतरराष्ट्रीय मधुमेह परिषद - २०२५ (इंटरनॅशनल डायबेटिस समिट) चे आयोजन करण्यात आले होते.

## आईकू ने त्यांचा आईकू नियो १0आर लाँच

नवी दिल्ली : उच्च-कार्यक्षमता स्मार्टफोन ब्रँड असलेल्या आईकू ने आज त्यांचे नवीन पॉवरहाऊस - आईकू नियो १०आर लाँच करण्याची घोषणा केली. नवीन मानके स्थापित करत, आईकू नियो १०आर हे महाविद्यालयीन विद्यार्थी, तंत्रज्ञान उत्साही आणि तरुण गेमर्ससाठी डिझाइन केलेले आहे. या स्मार्टफोनमध्ये आधुनिक वैशिष्ट्यांचा समावेश आहे ज्यात नवीनतम स्नॅपड्रॅगनएँ ८ी जनरेशन ३ मोबाइल प्लॅटफॉर्म, अल्ट्रा-स्मूथ स्टेबल ९०एफपीएस, गेमिंगसाठी १४४हर्ट्झरिफ्रेश रेट आणि या सेगमेंटमधील सर्वात बारीक ६४००एमएएचबॅटरी यांचा समावेश आहे. आईकू नियो १०आर ची किंमत ८+१२८ जीबीव्हेरिएंटसाठी २६,९९९ (निव्वळ प्रभावी किंमत:ड़ २४,९९९), ८+२५६ व्हेरिएंटसाठी २८,९९९ (निव्वळ प्रभावी किंमत: २६,९९९) आणि १२+२५६ व्हेरिएंटसाठी ३०,९९९ (निव्वळ प्रभावी किंमत: २८,९९९) आहे. हे दोन रंगांच्या पर्यायांमध्ये उपलब्ध असेल: रेजिंग ब्लू आणि मूनलाईट टायटॅनियम. याव्यतिरिक्त, आईकू नियो १०आर सध्या प्री-बुकिंगसाठी उपलब्ध आहे आणि १९ मार्च रोजी दुपारी १२ वाजता आईकू विक्रीसाठी उपलब्ध होईल.

## 'मेड इन इंडिया, मेड फॉर इंडिया'वर भर देत हायर ची भर, १000 कोटींची गुंतवणूक

भारत: हायर अप्लायन्सेस इंडिया या जागतिक पातळीवर मेजर अप्लायन्सेसमध्ये सलग १६ वर्षे अव्वल क्रमांकावर असलेल्या ब्रँडने आपल्या एसी उत्पादनात अत्यंत महत्त्वपूर्ण क्षमतावृद्धी केली आहे. ग्रेटर नोएडा येथील आपल्या कारखान्यात त्यांनी नव्या इंजेक्शन मोल्डिंग सुविधेचे नुकतेचे उद्घाटन केले. भारतातील या एका आघाडीच्या होम अप्लायन्सेस उत्पादक कंपनीने 'मेड इन इंडिया, मेड फॉर इंडिया' उपक्रमाला बळकटी देण्याच्या आपल्या प्रयत्नात एक महत्त्वाचे पाऊल टाकले आहे. हा अत्यंत महत्त्वाचा समारंभ उत्तर प्रदेशचे माननीय मुख्य सचिव श्री. मनोज कुमार सिंग आणि हायर अप्लायन्सेस इंडियाचे अध्यक्ष श्री. एनएस सतिश यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला. यावेळी माहिती तंत्रज्ञान आणि इलेक्ट्रॉनिक्स विभागाचे मुख्य सचिव श्री. अनुराग यादव आणि ग्रेटर नोएडा अथॉरिटीचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. रवी कुमार एनजी उपस्थित होते. या लक्षणीय टप्प्यातून हायरची 'मेड इन इंडिया, मेड फॉर इंडिया' बांधिलकी पुन्हा एकदा अधोरेखित झाली आहे. यामुळे स्थानिक पातळीवरील उत्पादनाला बळकटी मिळेल, नाविन्यतेला चालना मिळेल आणि परिणामी देशाच्या आर्थिक विकासाला गती मिळेल.

## युनिक्लो तर्फे 'लाइफ इन लिनन' कँपेन

मुंबई - युनिक्लो या जागतिक पातळीवरील कपड्यांच्या रिटेलर ब्रँडने 'लाइफ इन लिनन' ही नवी स्प्रिंग समर कँपेन आज सादर केली. बॉलिवुड आयकॉन आणि युनिक्लोचे ब्रँड एंडोसर्स करीना कपूर खान आणि सिद्धार्थ मल्होत्रा या जाहिरातीत दिसतील. उन्हाळा सुरू होत असताना या जाहिरातीत युनिक्लोच्या प्रीमिअम लिनन कलेक्शनमधील सहजसुंदर अभिजात सौंदर्य आणि बहूविधता दिसून येते. या 'लाइफ इन लिनन' कँपेनमध्ये लिनन हा उन्हाळ्यासाठीचा उत्तम पर्याय असल्याचे सांगत या कपड्याच्या प्रकारात आरामदायीपणा आणि कालातीत स्टाइलचा मेळ घातलेला दिसतो. दिवसभरातले शांततेचे काही क्षण ते सगळ्यांनी एकत्र येणे अशा या दोन वेगवेगळ्या फिल्म्समध्ये करीना आणि सिद्धार्थ हे दोघेही त्यांचे रोजचे आयुष्य जगताना दिसतील आणि त्याचवेळी आपल्या दैनंदिन आयुष्यात लिननची सहजसुंदर बहूविधताही दिसून येईल.

## मालिका 'हप्पू की उलटन पलटन'ने हास्य व वारसाची सहा वर्षे साजरी केली!

एण्ड टीव्हीवरील लोकप्रिय विनोदी मालिका 'हप्पू की उलटन पलटन' अविश्वसनीय टप्प्यावर पोहोचली आहे, जेथे मालिकेने हसवून-हसवून लोटपोट करणारे विनोद आणि संस्मरणीय पात्रांसह प्रेक्षकांचे मनोरंजन करण्याची सहा भव्य वर्षे पूर्ण केली आहेत. प्रतिभावान जोडी संजय व बिनायफर कोहली निर्मित मालिका २०१९ मध्ये सुरू झाली आणि तेव्हापासून घराघरांमध्ये लोकप्रिय ठरली आहे. ही मालिका कॉमेडी आणि कौटुंबिक ड्रामाचे सुरेख संयोजन सादर करते. दरोगा हप्पू सिंग, त्याची प्रबळ इच्छाशक्ती असलेली पत्नी व त्यांच्या खोडकर मुलांच्या विलक्षण कृत्यांच्या अवतीभोवती फिरणारी ही मालिका देशभरातील चाहत्यांना हास्य व आनंद देत आहे. या उल्लेखनीय क्षणाला साजरे करण्यासाठी सर्व कलाकार व टीम सेटवर भव्य सेलिब्रेशनकरिता एकत्र आले.

## 'तेनाली रामा'मध्ये विषकन्या च्या रूपात पवित्रा पुनिया

सोनी सब वरील 'तेनाली रामा' मालिकेत तेनाली रामा (कृष्ण भारद्वाज) या दरबारी कवी आणि मुत्सद्दी सल्लागाराच्या रोचक गोष्टींमध्ये प्रेक्षक रंगून जात आहेत. एका नवीन कथानकात, तेनाली विजयनगरात परत आला आहे आणि काली मा (बरखा बिष्ट)ने भाकीत केलेल्या संकटापासून राज्याचे रक्षण करण्याचे आव्हान त्याच्यापुढे आहे. मायावी गिरगिट राज (सुमित कौल)ने विजयनगर साम्राज्यात अराजक माजवण्यासाठी एक हत्ती मोकळा सोडून आपला दुष्ट हेतू आधीच स्पष्ट केला आहे. आता त्याला आणखी एका दुष्टाची साथ मिळाली आहे, ती म्हणजे विषकन्या आफरीन. ही भूमिका पवित्रा पुनियाने केली आहे.

## 'वीर हनुमान': एक भव्य महाकाव्य उलगडणार

सोनी सब वाहिनी आपल्या 'वीर हनुमान' या नव्या मालिकेतून हनुमानाचे जीवनचरित्र आपल्या प्रेक्षकांसमोर उलगडणार आहे. बाल मारुतीच्या जीवनातील कमी ज्ञात असलेल्या कथांचे चित्रण बघायला मिळणार आहे, ज्यामध्ये त्याला आपल्या जीवनाचा खरा उद्देश काय आहे, याचा शोध लागतो आणि त्यानुसार त्याची पुढील वाटचाल होते. भक्ती आणि श्रद्धेने ओतप्रोत असलेली, स्वस्तिक प्रॉडक्शन्सद्वारा निर्मित ही मालिका ११ मार्च रोजी सुरू होत असून दर सोमवार ते शनिवार रात्री ७:३० वाजता मालिका प्रसारित करण्यात येणार आहे. मारुतीचा बालपणीचा लोभस खोडकरपणा आणि त्यातूनच भक्ती, युक्ती आणि शक्तीचे प्रतीक म्हणून उदयाला आलेल्या या देवतेचे चित्रण प्रेक्षकांसमोर येत आहे. दमदार कथा आणि समृद्ध कथा मांडणीच्या बळावर ही मालिका भारतीयांच्या एका लाडक्या दैवताचे जीवनचरित्र पडद्यावर साकारत आहे, जे नव्या पिढीच्या प्रेक्षकांना देखील आकर्षित करेल.

# मराठवाड्याचे चित्र बदलण्यासाठी चांगल्या माणसांना पाठबळ देणारी यंत्रणा हवी : सुहास सरदेशमुख

## 'सुसंस्कृत ? राजकारणाचा मराठवाडा पॅटर्न' या विषयावर व्याख्यान संपन्न




छत्रपती संभाजीनगर, दि.१२ : मराठवाड्याची सध्याची एकंदरीतच निर्माण झालेली स्थिती बदलायची असेल तर माणसं निर्माण करायला हवीत. माणसं घडविण्याची प्रक्रिया ही केवळ एक-दोन व्यक्तींपुरती मर्यादित न राहता खूप मोठ्या प्रमाणात ती होणे गरजेचे आहे. चांगुलपणाने काम करणाऱ्या माणसांना प्रोत्साहन देणारी एक ठोस यंत्रणा राजकीय व्यवस्थेने निर्माण केली पाहिजे. यामध्ये पक्षीय मुद्दा हा गौण असून राजकीय व्यवस्था उभी करणे ही समकालीन काळाची नितांत गरज असल्याचे प्रतिपादन ज्येष्ठ पत्रकार सुहास सरदेशमुख यांनी यावेळी केले.

यशवंतराव चव्हाण सेंटर जिल्हा केंद्र छत्रपती संभाजीनगर व एमजीएम विद्यापीठाच्या वृत्तपत्र विद्या आणि जनसंवाद महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार व महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्या ११२ व्या जयंतीनिमित्त 'सुसंस्कृत ? राजकारणाचा मराठवाडा पॅटर्न' या विषयावर आचार्य विनोबा भावे सभागृहात विशेष व्याख्यान आयोजित करण्यात होते. ज्येष्ठ पत्रकार व स्तंभलेखक सुहास सरदेशमुख यांनी यावेळी उपस्थितांशी संवाद साधला.

यावेळी, चव्हाण सेंटरच्या जिल्हा केंद्राचे अध्यक्ष अंकुशराव कदम, सचिव नीलेश राऊत, प्राचार्या डॉ रेखा शेळके, वैशाली बाविस्कर, सुबोध जाधव, सुहास तेंडुलकर,शिव कदम,गणेश घुले उपस्थित होते.

पुढे बोलताना ज्येष्ठ पत्रकार सुहास सरदेशमुख म्हणाले, आपलं मन हिंदू - मुस्लिम, सवर्ण - दलित आणि आता मराठा ओबीसी अशा अवस्थेत दुभंगलेले आहे. या दुभंगलेल्या अवस्थेत आपण आज महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांची जयंती साजरी करत आहोत, हीच एक सकारात्मकता शिल्लक आहे. एकूणच मराठवाड्याच्या राजकारणाचा पोत पाहिला तर हे लक्षात येते की, ज्या - ज्या माणसांनी आणि वस्तूंनी आपल्यावर अत्याचार होण्याचे परिणाम केलेले आहेत त्याचा आपण गौरव करतो की काय? अशी भिती आपल्या मनामध्ये निर्माण होण्याची ही स्थिती आहे. बुलेट गाडी,जिवंत घोड्यावर रपेट मारणे, बंदूक बाळगणे , जेसीबी वरून फुले व गुलाल उधळणे, क्रेन ला हार लावून सत्कार करणे हे सगळं मराठवाड्यातील नेत्यांच्या सरंजामी मानसिकेतेचे प्रतिनिधित्व असल्याचे ज्येष्ठ पत्रकार सुहास सरदेशमुख यांनी यावेळी सांगितले.

## संघ हीच जीवनगाथा



अलकः- (६४) **राष्ट्रीय**

डॉक्टरजी म्हणायचे एखादी व्यक्ती राष्ट्रीय हे कसे ठरवायचे, ते त्याच्या वृत्तीवरून कळते. त्याची वृत्ती भक्तीमय आहे की भोगवादी, याला अनुसरून तो भारतमातेला उपमा अलंकारांनी सजवतो. त्यावेळी शाळेतील लहान मुले कवी इकबाल चे गाणे समूह स्वरात म्हणायची. तो हिंदुस्थानचे वर्णन करताना 'हम बुलबुले है उसकी। वह गुलिस्ताँ हमारा।। म्हणजे तो आमचा बगीचा आहे व आम्ही त्यातील लहान लहान बुलबुल पक्षी आहोत असे म्हणतो. संघाला भारत मातेला अशी उपमा देणे अजिबात पसंत/मान्य नाही. (मला आठवते हे गाणे दुर्बुद्धीच्या संस्काराने स्वातंत्र्यानंतरही आम्ही शाळेत म्हणत असू. नंतर हा इकबाल पाकिस्तानात पळून गेला होता तरीही; याहून आपल्या शिक्षण पद्धतीचे दुर्दैव कोणते? असो) संघात राष्ट्रीय वृत्तीने हिंदूंची अंतकरणे घडवली जातात. डॉक्टर म्हणतात आपल्या देशात College of ART आहे पण College of HEART नाही. संघ राष्ट्रीय वृत्ती घडवणारे, जीवन जगण्याचे शास्त्र शिकवणारे महाविद्यालय आहे. यावर भर देऊन शाखेतील रोजचे उपक्रम असावेत; याची संघात उच्चस्तरीय पाहणी होत असे. आज सुद्धा संघाची/समितीची देशभक्तीपर गीते हृदयस्थ संस्कार करणारी असतात हे वादातीत सत्य आहे. क्रमशः

लेखन : सौ. सुरेखा विजय काणे,
छत्रपती संभाजीनगर. मो. ९९६००५३५२१
माजी जिल्हा बौद्धिक प्रमुख राष्ट्र सेविका समिती



**छत्रपती संभाजी नगर जिल्हा परिषद चे मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक विकास मीना यांची नुकतीच यवतमाळचे जिल्हाधिकारी म्हणून बदली झाल्यामुळे खुलताबाद पंचायत समितीचे गटविकास अधिकारी प्रकाश नाईक यांनी भेट घेऊन सत्कार केला.**

# जि.प.प्रा.शाळा शिंदेफळ येथे वार्षिक स्नेहसंमेलन संपन्न


सिल्लोड : शिंदेफळ येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेमध्ये वार्षिक स्नेहसंमेलनात विद्यार्थ्यांनी इतिहास, भक्ती आणि लोककलेचा सादरीकरणातून प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले. याप्रसंगी विद्यार्थ्यांनी संत गोरा कुंभार, शिवाजी महाराज आणि संभाजी महाराजांच्या हृदयस्पर्शी सादरीकरणांसोबतच 'महाकाली' गाण्याने भक्तिमय वातावरण निर्माण केले, तर पारंपारिक गोंधळ या लोककलेच्या सादरीकरणामुळे कार्यक्रमाला रंगत आली. संभाजी महाराजांची मशालींसोबत पालखीतून ऐतिहासिक आगमन आणि त्यांचे हृदयद्रावक बलिदान याने उपस्थितांचे डोळे पाणावले. कोळीगीत, मंगळागौरीचे खेळ आणि व्यसनमुक्तीवर आधारित विनोदी सादरीकरणांनी उत्साहात भर घातली. तसेच 'महाकला कुंभ' आणि प्रयागराज दर्शनाने कार्यक्रमाला आगळीवेगळी उंची दिली.

रात्री उशिरापर्यंत प्रेक्षकांनी कार्यक्रमाचा आनंद घेतला. या उत्स्फूर्त प्रतिसादातून तब्बल १,३६,९६० रुपयांची रक्कम बक्षीस स्वरूपात शाळेस प्राप्त झाली, ज्यामुळे जिल्हा परिषद शाळेला मोठा हातभार लागलेला आहे, असे मत मुख्याध्यापक सिध्देश्वर दौड यांनी व्यक्त केले.

या कार्यक्रमास माझी पंचायत समिती सभापती अशोक गरुड, जिल्हा मध्यवर्ती बँकेचे अध्यक्ष अर्जुन गाडे, संतोषभाऊ कावले, संजय जामकर, सरपंच रेखाताई अक्कलकर, रविभाऊ राणा, वानखेडे सर यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेतील शिक्षक धनंजय काटे , संगिता मोरे , संध्या सपकाळे , रोहिणी रोठे , निताबाई मडावी , शितल इंगळे यांनी परिश्रम घेतले. तर शालेय समिती, ग्रामपंचायत सदस्य तथा गावातील विविध पदाधिकारी, पालक व ग्रामस्थांच्या उपस्थितीत कार्यक्रम संपन्न झाला.

## मदिहा सय्यद फैसल चा पहिला रोजा



सिल्लोड प्रतिनिधी -सिल्लोड शहरातील डॉ. जाकेर हुसेन नगरात राहाणारे मदिहा सय्यद फैसल (वय ०९वर्ष) हिने पवित्र रमजान महिन्यात आपल्या जिवनातील पहिला रोज ठेवला होता.मदिहा हिने आयुष्यातील पहिला रोजा ठेवल्यामुळे तिचे सर्वत्र कौतुक होत आहे.मदिहा ही पत्रकार प्रा मन्सूर कादरी यांची नात असुन राज्य मराठी पत्रकार संघाचे तालुकाध्यक्ष सोहेल कादरी यांची पुतणी आहे.

## जितो लेडीज विंग च्या विविध कार्यकमांना उत्स्फुर्त प्रतिसाद

छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी - नेहमी सामाजिक व जनकल्याणकारी उपकम राबविणा-या जितो लेडीज विंग तर्फे विविध सामाजिक उपक्रैम राबविण्यात आले याच अंतर्गत नुकतेच ग्लिस्टनिंग गोल्ड ज्वेलरी ची कार्यशाळा आयोजीत करण्यात आली होती. या कार्यशाळेमध्ये दर्शना सेठीया यांनी सोन्या चांदीचे दागीने कसे ओळखावे व सोन्याचे विविध रंग यावर मार्गदर्शन केले. या कार्यशाळेमध्ये ९८ महिलांचा सहभाग होता. तसेच स्टार्टअप पिच डे हा कार्यकम आयोजीत करण्यात आला. या प्रेरणादायी महिला उदयोजकांनी नविन स्टार्टअप व व्यवसायाबददल कल्पना दिली. यावेळी सागर गोसलिया व स्नेहा रायसोनी यांनी प्रेरणादायी महिला उदयोजकांच्या प्रवसातुन शिकण्याची संधी गुंतवणुकदार उदयोजक व इनोव्हेसोबत नेटवर्किंग तसेच विविध साक्षरता कार्यशाळा घेण्यात आली. यामध्ये सी.ए.रूपाली बोथरा यांनी सांगीतले की पैसे कुठे व कसे गुंतवायचे तसेच गुंतवणुकीसाठी उपयुक्त कल्पना व माहिती व मनिमार्केटचे महत्व यावर मार्गदर्शन केले. तसेच कृती बुध्दीमत्ता व कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेमध्ये सुदर्शन कटारिया यांनी चॅट जि पी टी व ए आय टुल्स यावर माहिती दिली. यामध्ये ६५ महिलांनी कार्यशाळेत सहभाग घेतला होता व नविन तंत्रज्ञान शिकण्याचा आनंद घेतला. संपुर्ण कार्यकम यशस्वी करण्यासाठी अध्यक्ष प्रिया मुथा उपाध्यक्ष रितु जैन, प्रिती बाकलीवाल, सचिव सोनल जैन, सहसचिव सपना मुथियान, सारिका सेठी, कोषाध्यक्ष प्रियंका संघवी यांनी परिश्रम घेतले. संपुर्ण कार्यकमासाठी जितो लेडीज विंग चे सर्व सदस्य उपस्थीत होते.



**छत्रपती संभाजीनगर : सरला स्नेह मंडळ संचलित बालज्ञान मंदिर शाळेच्या माजी अध्यक्ष कै. डॉ. कुमोदिनी कुद्री मोती यांच्या स्मृती प्रित्यर्थ बालज्ञान मंदिर प्राथमिक शाळेच्या शिक्षिका विभा सतीश वैराळ व नारायण आंधळे यांना अनुराधा राख यांच्या हस्ते आदर्श शिक्षक पुरस्कार देण्यात आला या प्रसंगी संस्थेच्या अध्यक्षा राजमती सासवडे, सचिव अंजली टाकळकर, अहिरवाडकर, पानसे उपस्थित होत्या.**

## साडेचारवर्षीय हसनेन पिंजारी चा पहिला रोजा



सोयगाव, दि.१२ मार्च- पवित्र रमजान महिन्यातील सोमवार रोजी सोयगाव शहरातील चार वर्षे ११ महिन्याचा हसनेन असलम पिंजारी ने आपल्या जिवनातील पहिला रोजा ठेवल्याबद्दल वडील असलम पिंजारी,आई रुबीना पिंजारी,आजी नसिबा पिंजारी,जावेद पिंजारी,राजू पिंजारी,यांनी अभिनंदन केले.

## अवघ्या तीन वर्षात २०० हून अधिक किडनी प्रत्यारोपण शस्त्रक्रिया यशस्वीपणे पूर्ण



छत्रपती संभाजीनगर

अवघ्या तीन वर्षात २०० हून अधिक किडनी प्रत्यारोपण शस्त्रक्रिया यशस्वीपणे पूर्ण करून मेडिकवर हॉस्पिटल, छत्रपती संभाजी नगर ला एक महत्त्वाचा वैद्यकीय टप्पा गाठण्यात यश प्राप्त झाले आहे. महानगर (मुंबई व पुणे) वगळता मागील तीन वर्षात महाराष्ट्रात सर्वाधिक किडनी प्रत्यारोपण शस्त्रक्रिया करण्याचा मान मेडिकवर हॉस्पिटल ला मिळाला आहे, हे विशेष.

अत्याधुनिक तंत्रज्ञान, अनुभवी डॉक्टर्स, जागतिक दर्जाची सुविधा, उत्कृष्ट सुश्रुषा या सर्वांच्या जोरावर मेडिकवर हॉस्पिटल संपूर्ण महाराष्ट्रातील, विशेषता मराठवाडा भागातील रुग्णांना माफक दरात उच्च दर्जाचा उपचार सातत्याने उपलब्ध करून देत आहे.

मागील तीन वर्षाच्या काळात साधारण ते अत्यंत क्लिष्ट स्वरूपाच्या प्रत्यारोपण शस्त्रक्रिया यशस्वीपणे घडून आल्या आहेत अशी माहिती किडनी प्रत्यारोपण विभाग प्रमुख डॉ. सचिन सोनी यांनी दिली. आपल्या भागातील रुग्णांना आता पुणे किंवा मुंबई येथे जाण्याची गरज नाही असेही ते पुढे म्हणाले.

रक्तगट जुळणारे तसेच विसंगत, चिमुकले ते वयोवृद्ध, एचआयव्ही बाधित रुग्ण, एकाच रुग्णाचे लिव्हर किडनी प्रत्यारोपण, कॅडेवर प्रत्यारोपण अशा सर्व प्रकारच्या क्लिष्ट शस्त्रक्रिया आमची चमू सातत्याने यशस्वीपणे पार पाडते अशी माहिती डॉ. सोनी यांनी दिली.

प्रत्येक यशस्वी प्रत्यारोपण हे रुग्णा साठी तर आनंददायी असतेच परंतु त्यासोबत हा वैद्यक शास्त्राचा, समर्पित सेवा देणाऱ्या प्रत्येकाचा हा विजय असतो. रुग्णाला केंद्रबिंदू मानून, त्यासाठी शास्त्रानुसार आवश्यक, नैतिकतेची जोपासना करून उच्च दर्जाची सेवा देणे हा मूलभूत सिद्धांत मेडिकवर हॉस्पिटलने आत्मसात केला आहे, हे डॉ. सोनी यांनी आवर्जून सांगितले. केवळ प्रत्यारोपण क्षेत्रातच नव्हे,तर एकंदरीत संपूर्ण वैद्यकीय क्षेत्रात मेडिकवर हॉस्पिटल गुणवत्ता पूर्ण सेवा देत राहील अशी ग्वाही केंद्रप्रमुख डॉ. दिपेन शहा यांनी दिली.

## जाहीर प्रगटन

**मा. व्ही. डी. पाटील दिवाणी न्यायाधिश साहेब कनिष्ठ स्तर कन्नड यांचे न्यायालयात.**

दिवाणी किरकोळ अर्ज.क्रं. १५७/२०२५, पुढील तारीख ११/०४/२०२५..

अर्जदार : नाना पिता धर्मा जाधव, वय ५४ वर्षे, धंदा शेती, रा. चिंचखेडा बु. ता. कन्नड जि. औरंगाबाद.

विरुद्ध

गैरअर्जदार : महाराष्ट्र शासन द्वारा जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद.

अर्ज : भारतीय वारसा अधिनियम १९२५ कलम ३७२ प्रमाणे वारसा हक्क प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्या अर्थी अर्जदार यांनी त्यांचे विधिज्ञ अॅड. एम.एच. सय्यद यांच्या मार्फत मा. न्यायालयात अर्ज सादर केला आहे की, मयत सावळा सखाराम जाधव हे अर्जदाराचे काका व मयत अनुसयाबाई भ्र. सावळा जाधव ही अर्जदाराची काकू असून मयत सावळा सखाराम जाधव हे मौजे चिंचखेडा बु. ता. कन्नड जि. औरंगाबाद येथील कायमचे रहिवाशी होते. मयत सावळा सखाराम जाधव हे दिनांक २०/०१/२०२१ रोजी चिंचखेडा बु. ता. कन्नड येथे मयत झाले असून त्यांची पत्नी अनुसयाबाई भ्र. सावळा जाधव ह्या देखील दिनांक ०७/१२/२०२३ रोजी चिंचखेडा बु. ता. कन्नड येथे मयत झाल्या आहेत. सदरील मयतांना कोणतेही आपत्य नाही. अर्जदार हा पुतण्या असून एकमेव वारस असून इतर कोणीही कायदेशीर वारस नाही. मयत सावळा सखाराम जाधव व अनुसयाबाई भ्र. सावळा जाधव यांच्या मृत्यू पश्चात मयत सावळा सखाराम जाधव यांचे नावे असलेली चिंचखेडा बु. गावठाण हद्दीतील मिळकत क्र. ११७ क्षेत्र ११.१५ चौ.मि. सहान जागा व मयत अनसयाबाई भ्र. सावळा जाधव यांचे नावे असलेली चिंचखेडा बु. गावठाण हद्दीतील मिळकत क्र. ११६ क्षेत्र २३.२३ चौ.मि. अर्जदाराच्या नावे करण्यासाठी वारस हक्क प्रमाणपत्र मा. न्यायालयातून प्राप्त करावे असे संबंधित अधिकाऱ्याने सांगितल्यामुळे व वारस हक्क प्रमाणपत्र कार्यालयात दाखल केल्याशिवाय वर उल्लेखित मिळकत नामंतर करता येऊ शकत नाही. करिता सदरील अर्ज वारसा हक्क प्रमाणपत्र मिळण्यासाठी दाखल करीत आहे. मा. न्यायालयाच्या अवलोकनार्थ योग्य ते कागदपत्र सादर केले आहे. मयत सावळा सखाराम जाधव व मयत अनुसयाबाई भ्र. सावळा जाधव हे मौजे चिंचखेडा बु., ता. कन्नड येथे राहत असतांना वृद्धपकाळाने मयत झाले आहे. सदरील मयतास अर्जदार हा एकमेव वारस असून वेळोवेळी वेगवेगळ्या कार्यालयात वारस हक्क प्रमाणपत्राची आवश्यकता भासत असल्यामुळे सदरील अर्जास कारण दि.१०/०२/२०२५ रोजी मौजे चिंचखेडा बु. ता. कन्नड येथे घडले. अर्जदारांनी यापुर्वी अशा प्रकारचा वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठीचा अर्ज इतर कोणत्याही न्यायालयात दाखल केलेला नाही अथवा न्याय प्रविष्ठ नाही. त्याअर्थी सदर जाहीर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, अर्जदार यांनी अर्ज केल्यानुसार वारसा प्रमाणपत्रासाठी परवानगी देण्याबाबत ज्या कुणास, कुठल्याही स्वरुपाचा उजर आक्षेप वगैरे असल्यास त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून तीस (३०) दिवसांच्या आत आपला उजर, आक्षेप वगैरे मा. न्यायलयात नोंदवावा मुदतीत उजर आक्षेप न आल्यास अर्जदाराच्या नावे वारसा प्रमाणपत्र देण्यात येईल. त्यानंतर आलेला उजर आक्षेप ग्राह्य धरला जाणार नाही, याचची नोंद घ्यावी.

दिनांक :- १२/०३/२०२५.

आदेशावरुन

कनिष्ठ लिपीक | सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायालय क स्तर कन्नड

## जाहीर प्रगटन

**मेहेरबान दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर कन्नड (श्री. ए. आय. अवटी मॅडम) यांच्या कोर्टात.**

दिवाणी अर्ज क्र- १७०/२०२५

अर्जदार : १. ज्ञानेश्वर पिता केशवराव मुरकुंडे, वय - ५६ वर्षे, धंदा शेती, रा. नावडी, ता. कन्नड जि. औरंगाबाद २. सुमनबाई भ्र. केशवराव मुरकुंडे, वय ८० वर्षे, धंदा घरकाम, रा नावडी, ता. कन्नड जि. औरंगाबाद ३. कुसूमबाई भ्र. पडित ठुबे, वय ५३ वर्षे, धंदा घरकाम, रा. पोखरी (देवगांव रंगारी) ता. कन्नड जि. औरंगाबाद ४. अलका भ्र. भास्कर फडे, वय ४९ वर्षे, धंदा घरकाम, रा.ह. मु.अरण्यनगर, इंदोर ता. जि. इंदोर (मध्य प्रदेश) ५. वनिता भ्र. विलास दळे, वय ४६ वर्षे, धंदा घरकाम, रा. चिकलठाण, ता. कन्नड जि. औरंगाबाद ६. वंदना भ्र. संजय भोजने, वय ४३ वर्षे, धंदा घरकाम, रा. विटा, ता. कन्नड जि. औरंगाबाद

विरुध्द

गैरअर्जदार : महाराष्ट्र शासन तर्फे जिल्हा अधिकारी औरंगाबाद.

अर्ज : बॉम्बे रेग्युलेशन अॅक्ट १८२७ चे कलम ३ प्रमाणे कायेदशीर वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्या अर्थी तमाम जनतेस कळवीण्यात येते की, वरील अर्जदार क्र. १ ते ६ यांनी अॅड. बी. आर. पाटील औरंगाबाद यांच्या मार्फत न्यायालयात अर्ज सादर केला की,

मयत केशवराव बंडु मुरकुंडे हे अर्जदार नं. १,३,४, ५ व ६ यांचे वडील असुन अर्जदार नं. २ ही त्यांची धर्मपत्नी असुन अर्जदार नं. १,३,४,५ व ६ यांची जन्मदाती आई आहे. मयत केशवराव बंडु मुरकुंडे हे आजार पणाने दिनांक. ०८.१०.२०२० रोजी मौजे नावडी येथे मयत झालेले आहे. मयत केशवराव बंडु मुरकुंडे यांना अर्जदारांच्या व्यतीरीक्त ईतर कोणीही कायदेशीर वारस नाही. केशवराव बंडु मुरकुंडे हे मयत झाल्यामुळे त्यांच्या पश्चात शासकीय कामे करण्यासाठी तहसील कार्यालय व महसुल दप्तरी ईतर शासकीय व निमशासकीय कार्यालयात कामे करण्यासाठी वारस प्रमाणपत्र आवश्यकता असल्यामुळे सदरील अर्जदार यांच्या हक्कात वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. व तशी मागणी अर्जात केली आहे.

त्याअर्थी सदरील अर्जाबाबत कोणाचा काही उजर आक्षेप असल्यास सदरील जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसाच्या आत या न्यायालयात सादर करावा कोणाचा उजर आक्षेप न आल्यास अर्जदाराचा अर्ज मंजुर करुन अर्जदार नं. १ ते ६ च्या हक्कात कायदेशीर वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

सबब हे जाहीर प्रगटन

दिनांक ११/०३/२०२५

पुढील तारीख : १६.०४.२०२५

आदेशावरुन

कनिष्ठ लिपीक | सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायालय क स्तर कन्नड

## जाहीर प्रगटन

**मा. व्ही.डी. पाटील दिवाणी न्यायाधीश साहेब, कनिष्ठ स्तर, कन्नड यांचे न्यायालयात.**

दिवाणी किरकोळ अर्ज क्रमांक. १४२/२०२५

पुढील तारीख ०९/०४/२०२५

अर्जदार :-१- यमुनाबाई भ्र. नामदेव भोंगळ, वय ७२ वर्षे, धंदा शेती व मजुरी रा. सातकुंड. ता. कन्नड, जि. छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) २-विजय पिता नामदेव भोंगळ/मानघरे वय ३८ वर्षे, धंदा शेती व मजुरी रा. सातकुंड ता. कन्नड, ह.मु.रा. गिधाडा (शेकटा) ता. पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) ३-सौ. मंगलाबाई भ्र. शांताराम गोपाळ, वय ३५ वर्षे, धंदा घरकाम, रा. कोल्हे (पिंपळगाव हरेश्वर) ता. पाचोरा, जि. जळगाव. ४-सौ. सखु भ्र कांतीलाल महाजन, वय ३३ वर्षे, धंदा- घरकाम रा. मुलानी वडगाव,, ता. पेठण, जि. छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद)

-विरुध्द-

गैरअर्जदार : महाराष्ट्र शासन द्वारा जिल्हाधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद)

अर्ज : अर्ज बॉम्बे रेगुलेशन अॅक्ट VIII 1827 कलम २ व ३ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार यांनी त्यांचे विधीज्ञ व्ही. के. चव्हाण यांचे मार्फत मा. न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार क्रमांक १ चा पती व अर्जदार क्र. २ ते ४ चा पिता नामदेव पुंजाबा भोंगळ रा. सातकुंड ता. कन्नड, जि. छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) हा दि. १०/०७/२०२० रोजी ढाकेफळ ता. पैठण जि. छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) येथे मयत झाला आहे. मयतास त्याचे मृत्यू समयो व पश्चात वारस अनुक्रमे पत्नी, मुलगा, व २ विवाहित मुली हेच होते व आहेत.

मयताने त्याचे हयातीत कोणतेही इच्छा तथा मृत्युपत्र करून ठेवलेले नाही, करिता मयताचे मृत्यू पश्चात त्याचे स्थावर व जंगम मिळकतीतील हक्क व अधिकार, ऋण, राशन तसेच शासकीय व निमशासकीय अथवा महसूल अभिलेखात नोंदणी करणे संदर्भात कार्यालयीन आणि मयताचे मृत्यू पश्चातचे शासकीय व निमशासकीय योजनांचे लाभा करिता वारस कार्यवाहीसाठी अर्जदार हे मयताचे वारस असल्याने कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

त्याअर्थी या जाहीर प्रगटनव्दारे सर्व जनतेस सुचित करण्यात येते की. सदर प्रकरणाबाबत कोणासही काही उजर, आक्षेप असल्यास त्यांनी सदरचे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाचे आत या न्यायालयात स्वतः अगर आपले विधिज्ञामार्फत हजर राहून उजर, आक्षेप सादर करावा. मुदतीत उजर आक्षेप न आल्यास, अर्जदारांचे हक्कात वारस प्रमाणपत्र प्रदान करण्याचा आदेश पारीत करण्यात येईल.

सबब हे जहीर प्रगटन.

दिनांक १०/०३/२०२५

आदेशावरुन

कनिष्ठ लिपीक | सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायालय क स्तर कन्नड

## अग्रलेख...

# हिंदू समाजाचा दराराच हवा!

दुबईत झालेल्या आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफी- २०२५ स्पर्धेच्या अंतिम सामन्यात भारतीय क्रिकेट संघाने न्यूझीलंडवर मिळविलेल्या विजयाने भारतात जल्लोष न झाला असता तरच नवल होते. तो होणार होता आणि झाला. देशाच्या अनेक शहरांमध्ये नागरिकांनी रात्री रस्त्यावर येऊन गुलाल उधळला, फटाके फोडले, रॅली काढल्या आणि जल्लोष केला. भारतीय लोकांनी भारतीय क्रिकेट संघाचे कौतुक केले. या स्पर्धेत भारत चॅम्पियन ठरल्याचा हा आनंद होता. परंतु, हा आनंद ज्यांच्या डोळ्यात खुपतो, असेही लोक भारतात आहेत, याची प्रचीती देणारा प्रसंग मध्य प्रदेशातील महू येथे घडला. इतर ठिकाणांप्रमाणे तेथेही भारताच्या विजयाचा जल्लोष करण्यासाठी रॅली निघाली. ती तेथील जामा मशिदीजवळून जात असताना दगडफेक झाली आणि संघर्ष सुरू झाला. या प्रकरणात पंधरा-वीस लोकांवर एफआयआर दाखल करण्यात आला आहे. एका फिर्यादीने पोलिसांना सांगितल्यानुसार, आज तुमचा निकालच लावतो, असे एका समुदायातील काही लोक म्हणत होते. या संघर्षात अनेकांच्या घरांमध्ये दगड पोहोचले. दुकाने, वाहने जाळली गेली. आता परिस्थिती नियंत्रणात असल्याचे सांगितले जात असले तरी या घटनेने काही संकेत दिलेले आहेत, जे समस्त हिंदू समाजाने व्यवस्थित समजून घेतले पाहिजे.

हिंदू समाज सहिष्णू आहेच. त्यासाठी त्या समाजाला कुणीही प्रशिक्षण देण्याची आवश्यकता नाही. तो सहिष्णू नसता तर इतक्या धर्मविशेषांचे लोक भारतीय परंपरेत सामावले गेले नसते. तो सहिष्णू नसता तर इतका प्रगत झाला नसता. काही धर्म-पंथाचे लोक भारतीय संस्कृती आणि परंपरेत असे मिसळून गेले आहेत की, जणू दुधात साखर! ते त्यांच्या उपासना पद्धती पाळतात, त्यांच्या चालीरीती पाळतात. पण, भारतीय समाजाच्या मु'य प्रवाहाशी सामंजस्याने वागतात, चांगले संबंध ठेवतात. काही अल्पसं'य समुदाय मात्र अद्याप आपल्या हेकडीवर कायम आहेत. या देशावर अनेक शतके आपल्या पूर्वजांनी राज्य केल्याचा त्यांचा अभिमान आजच्या लोकतांत्रिक व्यवस्थेत वृथा असला तरी ते काही त्यांच्या डोक्यातून जात नाही. त्यामुळेच असे वाकडे वर्तन करण्याची त्यांची हिंमत होते. अशा प्रवृत्तींना नियंत्रित करण्याचे काम कायदा करेलच. परंतु, हिंदूंनी अधिकाधिक संघटित होऊन अशा समुदायांची हिंमत वाढू नये, याची काळजी घेणे ही काळाची गरज बनलेली आहे.

भारतीय क्रिकेट संघाने चॅम्पियन्स ट्रॉफी जिंकून देशाला गौरव मिळवून दिला तेव्हा संपूर्ण भारतात आनंदाचे वातावरण निर्माण होणे स्वाभाविक होते. पण या आनंदोत्सवाच्या वातावरणाला महूतील हिंसाचाराने गालबोट लावले. एकीकडे याच मातीतून आमचाही जन्म झालेला आहे, असे म्हणायचे आणि त्याच मातीच्या विजयाच्या आनंदात मिठाचा खडा टाकायचा, हे अत्यंत आक्षेपार्ह आहे. अलिकडे क्रिकेटमध्ये पाकिस्तानचा विजय क्वचित होतो. पण, एखादवेळ तो झाला तर भारतात तो विजय साजरा करणारी पिलावळ ती हीच. त्यांचे वर्तन हा भारताच्या राष्ट्रीय अस्मितेवरील हल्ला आहे आणि हिंदू समाजासाठी एक इशारा आहे, हे हिंदूंनी समजून घेतले पाहिजे. प्रथमदर्शनी असे दिसते की, महूतील हिंसाचार हा भारताच्या विजयाबद्दल दुःखी झालेल्या आणि देशात अस्थिरता निर्माण करू इच्छिणाऱ्या घटकांनी भडकवला. भारतात क्रिकेट हा सर्वाधिक लोकप्रियता मिळालेला क्रीडा प्रकार आहे. तो आपल्याकडे इंग'जांकडून आलेला असला तरी क्रिकेट आणि भारत हे समीकरण आता जगभरात मान्यता पावलेले आहे. भारतीय क्रिकेट संघाने जगाच्या कानाकोपऱ्यात जाऊन विजयी पताका फडकवली आहे. आशियाई स्पर्धा असोत किंवा ऑलिम्पिक असो, भारताचा विजय किंवा भारताला मिळालेली पदके हा समस्त भारतीयांच्या दृष्टीने विजयाचा, गौरवाचा विषय असतो. त्यामुळे त्याचा जल्लोष साजरा करणे अस्वाभाविक नाही. त्याचप्रमाणे भारतीय क्रिकेट संघ आंतरराष्ट्रीय स्तरावर जिंकतो तेव्हा ती संपूर्ण देशासाठी अभिमानाची बाब असते. पण, आपल्याच देशात काही घटक असे आहेत, ज्यांना भारताचा विजय सहन होत नाही. ते आपला द्वेष, नैराश्य, निषेध असे सारे व्यक्त करण्यासाठी दुसरे काहीही करू शकत नाहीत आणि त्यामुळे जल्लोषादरम्यान हिंसा भडकावणे त्यांना आवडते. महूमध्ये जे काही घडले, ते याच मानसिकतेचे प्रतिबिंब आहे. संपूर्ण देश भारतीय संघाच्या विजयाचा आनंद साजरा करीत असताना काही समाजकंटकांनी या प्रसंगाचे रूपांतर हिंसाचारात केले. अशा घटकांचा मुख्य उद्देश हिंदू समाजात दहशत निर्माण करणे आणि त्यांच्या भावना दुखावणे हाच आहे, हेही हिंदूंनी लक्षात घेतले पाहिजे.

भारताच्या विजयाच्या प्रसंगी हिंसाचार उफाळल्याचा हा पहिला प्रसंग खचीतच नाही. यापूर्वीही काही वेळा अशा घटना घडल्या आहेत. त्यामागे कट्टरपंथीय मानसिकता आहे. त्यांना भारताचा विजय आणि त्याची प्रगती आवडत नाही. त्यांना त्याचे दुःख होत असते. असे समाजकंटक समाजात हिंसाचार, अस्थिरता पसरवून स्वतःचे हित साधू इच्छितात आणि त्याआडून राजकीय डावपेच खेळतात. जगाची एक रीत आहे. अपघात कसाही झाला तरी मोठ्या गाडीची चूक असते. सायकलवाला कसाही चालवू देत, दोष कारचा असतो. कारवाला कितीही मस्ती करू देत, दोष ट्रकचा असतो. त्याचप्रमाणे अनेकदा हिंदूंच्या माथी दोष मारला जातो. त्यांनाच सामंजस्याचे आणि सहिष्णुतेचे धडे दिले जातात. त्यासाठी आजकाल सोशल मीडियासारखे माध्यम फार प्रभावी पद्धतीने वापरले जाते. त्यामागे हिंदू समाजात भीती निर्माण करू पाहणाऱ्या आणि हिंदूंचे ऐक्य कमकुवत करू पाहणाऱ्या काही संघटनाही आहेत. अशा सर्वांना उत्तर द्यायचे असेल आणि त्यांना नियंत्रणात ठेवायचे असेल तर हिंदूंचे व्यापक ऐक्य हाच पर्याय आहे. दुर्दैवाने आजही समस्त हिंदू समाजातील प्रत्येक घटकाला ऐक्याचे महत्त्व पटलेले नाही. अद्याप हिंदू समाज जाती-जातींमध्ये विखुरलेला आहे. हिंदू ही आपली व्यापक ओळख आहे आणि तीच आपले रक्षण करणार आहे, हे सर्वांनी ध्यानात घेतले पाहिजे. त्यासाठी अनेक संघटना प्रयत्न करीत आहेत. इतिहास साक्षी आहे की, जेव्हा जेव्हा हिंदू समाज संघटित झाला, तेव्हा तेव्हा बाह्य आणि अंतर्गत शत्रूंचा पराभव झाला. हिंदू समाज एकजूट राहिला तर देशात अस्थिरता पसरवणारे घटक परावृत्त होतील. हिंदू समाजाला आपली संस्कृती आणि धर्म जपावा लागेल, जेणेकरून कोणतीही बाह्य शक्ती ती कमकुवत करू शकणार नाही. त्यासाठी सर्वप्रथम जातीची बंधने झुगारून हिंदू म्हणून सर्वांनी एकमेकांना आपले मानले पाहिजे. हिंदू समाजाने अशा नेत्यांना आणि पक्षांना पाठिंबा दिला पाहिजे, जे राष्ट्रवादी विचारसरणीचा पुरस्कार करतात आणि भारताच्या सार्वभौमत्वाचे रक्षण करण्याची क्षमता ठेवतात. हिंदू समाज हा देशात बहुसंख्य असला तरी तो पूर्णपणे संघटित नाही. त्यामुळे त्याची ताकद दिसत नाही. नव्या पिढ्यांना हिंदू संस्कृती, धर्म, परंपरांचे महत्त्व समजावून सांगितले तर एक मोठे परिवर्तन घडून येईल. कायद्यावर विश्वास ठेवणे वेगळे आणि स्वतःचे रक्षण करण्यासाठी सिद्ध होणे वेगळे. त्यासाठी एकेक हिंदू माणूस हा सक्षम होणे गरजेचे आहे. शांततेचा उपदेश करणारा बलवान असेल तरच तो ऐकला जातो. कमकुवताने कितीही विश्वशांतीचे प्रवचन दिले तरी त्याकडे कुणी लक्ष देत नाही. हिंदू समाज हा विशाल समुदाय आहे. तो सुशिक्षित, सुसंस्कृत आणि विचारी आहे. त्याने आपल्या विविध क्षेत्रातील पराक्रमांचे व कर्तृत्वाचे झेंडे साता समुद्रापार रोवलेले आहेत. त्याने आपल्या मायभूमीत पूर्णपणे संघटित व्हावे ही एकच बाब त्याची ताकद आणि क्षमता शतगुणित करेल. तसे झाले तर पुन्हा कधीही महू घडणार नाही. महू येथील हिंसाचाराने पुन्हा एकदा स्पष्ट केले आहे, की भारताचे यश आणि हिंदू समाजाची ताकद तोडण्यासाठी देशविरोधी शक्ती नेहमीच सकि'य असतात. त्यांना वेळ, प्रसंग यांचे काहीही औचित्य नसते. अशा प्रवृत्तींच्या विरोधात कंबर कसून उभे राहिले पाहिजे. सामाजिक शांततेला नख लावणारे लोक मोजके आहेत, पण माजलेले आहेत. त्यांना वेळोवेळी कायद्याने तर ठेचलेच पाहिजे; शिवाय संघटित हिंदू समाजाचा एवढा दरारा निर्माण व्हावा की अशा समाजकंटकांतील एकाचीही अशा प्रसंगी साधी काडी उचलण्याचीही हिंमत होऊ नये!...

## चिंतन

गुरुदत्त दिनकर वाकदेकर

# मजबूत अर्थव्यवस्था आणि ढासळता शेअर बाजार

भारतीय शेअर बाजार सध्या कठीण परिस्थितीतून जात आहे; जो गेल्या काही महिन्यांपासून सातत्याने घसरणीतून जात आहे. सलग पाच महिन्यांच्या घसरणीमुळे गुंतवणूकदारांची चिंता आणि अनिश्चितता वाढली आहे. बाजारातील तज्ज्ञ याकडे 'डेंजर झोन' म्हणून पाहत आहेत. सेन्सेक्स आणि निफ्टीसारख्या प्रमुख निर्देशांकांना मोठ्या घसरणीचा सामना करावा लागत आहे; ज्यामुळे गुंतवणूकदारांच्या संपत्तीचे प्रचंड मोठे नुकसान होत आहे. २७ सप्टेंबर २०२४ रोजी ८५,९७८ च्या विक'मी शिखरावर असलेला सेन्सेक्स २८ फेब्रुवारी २०२५ पर्यंत १२,७८० अंकांनी घसरला आहे. ऑक्टोबर २०२४ पासून निफ्टी दर महिन्याला घसरणीसह बंद होत आहे आणि केवळ गेल्या पाच महिन्यांत तो १२ टक्क्यांनी घसरला आहे. अशीच स्थिती शेअर बाजारात २८ वर्षांपूर्वी दिसली होती, जेव्हा निफ्टी सलग ५ महिने घसरला होता. १९९६ नंतर ही पहिलीच वेळ आहे की, सलग पाच महिने बाजार घसरणीसह बंद झाला आहे. ऑक्टोबर २०२४ ते फेब'ुवारी २०२५ दरम्यान निफ्टी सुमारे १२ टक्क्यांनी घसरला असला, तरी या काळात गुंतवणूकदारांचे मोठे नुकसान झाले आहे. ३० सप्टेंबर २०२४ रोजी बीएसईवर सूचिबद्ध झालेल्या कंपन्यांचे एकूण बाजार भांडवल ४७४ लाख कोटी रुपये होते; जे २८ फेब'ुवारी २०२५ पर्यंत घसरून ३८४ लाख कोटी रुपये झाले, याचा अर्थ फक्त पाच महिन्यांत गुंतवणूकदारांनी ९० लाख कोटी रुपयांची संपत्ती गमावली आहे. शेअर बाजारातील घसरणीचा हा ट्रेंड अजून थांबेल अशी अपेक्षा नाही. अशा स्थितीत शेअर बाजारातील या गोंधळाची कारणे काय आहेत, याचा शोध घेणे अत्यंत महत्त्वाचे ठरते.

बाजार तज्ज्ञांच्या मते, बाजारातील घसरण उच्च स्तरावर नफा बुकिंगमुळेदेखील झाली, ही एक सामान्य प्रक्रिया मानली जाते, जेथे गुंतवणूकदार नफा मिळविण्यासाठी त्यांची गुंतवणूक विकतात, ज्यामुळे बाजारात तात्पुरती घसरण होते. अनेक वेळा नकारात्मक बातम्या आणि बाजारातील अस्थिरतेमुळे गुंतवणूकदार घाबरून त्यांचे शेअर्स विकू लागतात. त्यामुळे विक्रीचा दबाव वाढतो आणि बाजार वेगाने घसरतो. तथापि, जागतिक आर्थिक मंदीचा प्रभाव, भारतीय बँकांच्या कमकुवत कमाईच्या अफवा, एमएससीआय आणि देशांतर्गत गुंतवणूकदारांमधील संभ्रमाची स्थिती, विदेशी गुंतवणूकदारांकडून (एफआयआयएस) सतत विक्री, चीनमधील एफआयआयएसचे हित, अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचे धोरणात्मक निर्णय, देशांतर्गत कंपन्यांमधील कमजोरी, आर्थिक मंदी यासह अनेक घटक कारणीभूत आहेत. अमेरिकन डॉलरची ताकद, तांत्रिक सुधारणा आणि नफा घेणे इ. आहेत. भारतीय बँकांच्या कमकुवत कमाईच्या अफवांमुळे बाजारात नकारात्मक भावना निर्माण झाली आणि विक्रीचा दबाव वाढला, तर जागतिक स्तरावर व्याजदरात झालेली वाढ आणि अमेरिकन रोख्यांच्या उत्पन्नात झालेली वाढ यामुळे परदेशी गुंतवणूकदारही भारतीय बाजारातून पैसे काढून घेत आहेत.



परदेशी गुंतवणूकदार भारतीय बाजारातून आपला पैसा काढून चीनकडे वळवत आहेत. त्यामुळे विक्रीचा दबाव वाढला आहे. चिनी बाजारातील मजबूत रिकव्हरीमुळे भारतीय शेअर बाजारातील घसरण वाढत आहे. विदेशी गुंतवणूकदारांनी भारतीय शेअर बाजारात केलेली गुंतवणूक दोन वर्षांतील नीचांकी पातळीवर आली आहे. यावरून एफआयआय प्रवाहातील मोठा बदल समजू शकतो. ऑक्टोबर २०२४ पासून भारताचे मार्केट कॅप सुमारे एक ट्रिलियन डॉलरने कमी झाले आहे, तर चीनचे मार्केट कॅप २ ट्रिलियन डॉलरने वाढले आहे. जगाच्या विविध भागांतील विविध भू-राजकीय तणावामुळे जागतिक पुरवठा साखळीतील व्यत्ययांमुळे भारतीय कंपन्यांना निर्यात आणि आयातीतील वाढत्या आव्हानांचा सामना करावा लागत आहे; ज्याचा भारतीय शेअर बाजारावर नकारात्मक परिणाम होत आहे. अमेरिकन डॉलरच्या तुलनेत भारतीय रुपया सतत कमजोर होत आहे. त्यामुळे आयात वस्तूंच्या किमती वाढल्या आहेत. महागाईचा दबाव वाढला आणि भारतीय कंपन्यांच्या नफ्यावर परिणाम झाला.

उच्च महागाईमुळे रिझर्व्ह बँकेवर व्याजदर वाढविण्यासाठी दबाव वाढत आहे. व्याजदर वाढल्याने कर्ज घेण्याच्या प्रक्रियेत वाढ होईल; ज्याचा कंपन्यांच्या नफ्यावर नकारात्मक परिणाम होईल. या शक्यतेमुळे गुंतवणूकदारांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले असून त्यामुळे बाजारात विक्रीचा दबाव दिसून आला आहे. अमेरिकेचे अध्यक्ष झाल्यानंतर डोनाल्ड ट्रम्प यांचे धोरणात्मक निर्णय आणि अमेरिकेने व्यापार शुल्क वाढवून चीनवर अतिरिक्त कर लादण्याची केलेली घोषणा यामुळे जागतिक बाजारपेठेतही अस्थिरता वाढली आहे. अमेरिकेने भारतावरील आयात शुल्क वाढविण्याची शक्यता असल्याने त्याचा परिणाम भारतीय शेअर बाजारावर झाला आहे. जागतिक आर्थिक मंदीची भीती, अमेरिका आणि युरोपमधील आर्थिक क्रियाकलाप मंदावल्याने गुंतवणूकदारांच्या भावनांवर परिणाम झाला आहे. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने जागतिक आर्थिक वाढीचा अंदाज कमी केल्याने गुंतवणूकदारांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. या जागतिक अनिश्चिततेमुळे विदेशी गुंतवणूकदार भारतीय बाजारातून भांडवल काढून घेत आहेत, त्यामुळे बाजारात विक्रीचा दबाव वाढला आहे. देशांतर्गत आघाडीवरही आर्थिक निर्देशांकांमध्ये कमजोरी दिसून येत आहे. महागाई दरात वाढ, औद्योगिक उत्पादनातील मंदी आणि बेरोजगारीच्या दरात वाढ यासार'या समस्यांचा बाजारावर नकारात्मक परिणाम झाला आहे. या आर्थिक आव्हानांमुळे गुंतवणूकदारांनी आत्मविश्वास गमावला आहे, त्यामुळे बाजारात घसरण झाली आहे. शेअर बाजारातील घसरणीचा परिणाम जवळपास सर्वच क्षेत्रांवर झाला आहे. आयटी, ऑटो, मीडिया, टेलिकॉम आणि बँकिंग आणि एफएमसीजी क्षेत्रात २०-२५ टक्क्यांची घसरण नोंदविली गेली आहे. कंपन्यांचे शेवटच्या तिमाहीचे निकालही अपेक्षेनुसार आले नाहीत. त्यामुळे गुंतवणूकदारांनी आत्मविश्वास गमावला आहे आणि शेअर बाजारात विक'ीचा दबाव वाढला आहे. लार्ज कॅप आणि मिड-कॅप समभागांचे अतिमूल्यांकन आणि बाजारातील अस्थिरता वाढल्यामुळे बाजारात अनिश्चितता कायम आहे. तथापि, काही बाजारतज्ज्ञांचे असे मत आहे की, दीर्घकालीन दृष्टिकोनातून पाहिल्यास भारतीय अर्थव्यवस्था मजबूत आहे आणि बाजारातील सध्याची घसरण ही एक संधी म्हणूनदेखील पाहिली जाऊ शकते. तथापि, शेअर बाजारातील गोंधळाच्या या काळात संयम बाळगणे आणि दीर्घकालीन गुंतवणुकीचा दृष्टिकोन स्वीकारणे ही सर्वात योग्य रणनीती असू शकते. अशा वातावरणात बाजारात स्थिरता आणण्यासाठी ठोस पावले उचलणे आणि गुंतवणूकदारांचा विश्वास टिकवून ठेवण्यासाठी बाजारात हस्तक्षेप करून धोरणात्मक निर्णय घेणे ही सरकार आणि वित्तीय संस्थांची जबाबदारी आहे. गुंतवणूकदारांनाही संयम ठेवावा लागेल आणि बाजारातील चढ-उतार समजून घेऊन धोरणात्मक गुंतवणूक करावी लागेल.

९९८७७४६७७६

## वेध

गिरीश शेरेकर

# गंगेचा रंजक प्रवास

प्रयागराज येथील महाकुंभाची नुकतीच यशस्वीपणे सांगता झाली. येथील गंगा, यमुना व अदृश्य सरस्वती या तीन नद्यांच्या त्रिवेणी संगमाची खूप चर्चा झाली. ऐतिहासिक व पौराणिक महत्त्व असलेल्या या संगमात जवळपास ६५ कोटी लोकांनी श्रद्धेची डुबकी घेतली. जवळपास ४५ दिवस चालेल्या महाकुंभाची सविस्तर माहिती बहुतांश लोकांपर्यंत पोहोचली आहे. प्रयागराजच्या पवित्र संगमात येणाऱ्या गंगा, युमना व त्यांच्या उपनद्यांचा आणि पुढचा गंगेचा बंगालच्या उपसागरापर्यंतचा प्रवास फारच रंजक आहे. उत्तराखंड, उत्तरप्रदेश, बिहार, झारखंड सीमावर्ती भाग, पश्चिम बंगाल अशा पाच राज्यांतून गंगेचा एकूण प्रवास २ हजार ५२५ किमीचा आहे. देशातंर्गत ही सर्वांत मोठी नदी आहे. ज्या भागातून गंगेचा प्रवास झाला आहे, तो भाग पौराणिक दृष्टीने नावारूपास आला आहे. २००८ मध्ये गंगेला राष्ट्रीय नदीचा दर्जा देण्यात आला. कोट्यवधी लोकांची आस्था असलेल्या गंगेच्या पाण्याबद्दल अनेकदा प्रश्न उपस्थित केले जातात. महाकुंभाच्या काळात त्यावर जाणीवपूर्वक खूप चर्चा झाली. या चर्चेचा कोणताही परिणाम हिंदू सनातनींवर झालेला नाही. स्वयंशुद्धीकरणाचे अद्‌भुत तंत्र गंगेत विकसित झाले आहे. गंगेच्या पाण्यात अन्य कोणत्याही नदीच्या पाण्यापेक्षा ऑक्सिजनचे प्रमाण सर्वाधिक आहे. गंगेतला बॅक्टिरियोफेज जीवाणू हानिकारक जीवाणूंना नाहीसा करत असल्याने हे पाणी वैज्ञानिक कसोटीवर सर्वोत्तम ठरले आहे.

हिमालयाच्या पर्वतरांगेतल्या प्रत्येक शिखराला वेगवेगळी नावे आहेत. त्यातल्या उत्तराखंडच्या गंगोत्री हिमानीमधून भगीरथी व संतोपत हिमानीतून अलकनंदा नदीचा उगम होतो. येथूनच काही अंतरावर बद्रीनाथ आहे व पुढे तीन किमीवर उत्तरेतले पहिले गाव माढा येथून सरस्वती नदीचा उगम होतो. ही नदी काही दूर प्रवाहित होऊन अदृश्य होत असल्याची नोंद आहे तर काहींच्या मते ती अलकनंदा नदीत सामावल्याचे सांगितले जाते. पुढे अलकनंदा नदीला धौलीगंगा नदी विष्णूप्रयाग, नंदाकिनी नदी नंदप्रयाग, पिंडार नदी कर्णप्रयाग तर केदारनाथ येथून येणारी मंदाकिनी नदी रुद्रप्रयाग येथे मिळते. या चार नद्यांना घेऊन अलकनंदा नदी देवप्रयाग येथे येते. (पंच प्रयाग) येथेच भगीरथी व अलकनंदा नदीचा संगम होऊन तयार झालेली गंगा नदी हरिद्वार येथे आल्यावर उत्तर प्रदेशातल्या कन्नोजमध्ये पोहोचते. येथेच गंगेला तिची पहिली सहायक नदी रामगंगा येऊन मिळते. पुढे प्रयागराज येथे गंगा व यमुनोत्रीतून उगम पावणाऱ्या यमुनेचा मध्य प्रदेशातून येणाऱ्या चंबल, बेतवा, सिंध, केन या चार नद्यांना सोबत घेत संगम आहे. याच ठिकाणी माढातून उगम होत अदृश्य झालेल्या सरस्वती नदीचे वास्तव्य असल्याने त्याला पवित्र त्रिवेणी संगम म्हणतात. सर्व नद्यांना सोबत घेऊन गंगा प्रसिद्ध अशा वाराणसीत (काशी) आणि तेथून गाजीपुर शहरात येते. या ठिकाणी गोमती नदी गंगेला मिळते. येथून गंगा बिहारमधल्या छपरा येथे पोहोचते. येथे नेपाळमधून उगम झालेल्या काली व कर्णाली नदी एकत्र येत घाघरा नाव धारण करत गंगेला मिळतात. पटणा येथे गंगेसोबत अमरकंटक उगमस्थान असणाऱ्या सोन नदीचा संगम आहे. पुढे गंगेचा सोनपूर येथे गंडक नदी तर कुर्सेला येथे कोसी नदीशी संगम होतो. झारखंडच्या सीमावर्ती साहेबगंज जिल्ह्याला स्पर्शून गंगा पश्चिम बंगालच्या फरक्का बॅरेज येथे पोहोचते. येथेच गंगा व महानदीचा संगम आहे. महानदी गंगेची शेवटची सहायक नदी आहे. येथूनच गंगेच्या दोन नद्या होतात एक गंगेच्या नावाने कोलकात्याला हुगळी नदीत (येथे गंगेचा प्रवास थांबतो) सामावते तर दुसरी पद्मा नदीच्या नावाने बांगला देशात जाते. पुढे पद्मा, ब्रह्मपुत्र व मेघना या तीन नद्यांचा संगम होऊन मेघना नावानेच ही नदी संयमितपणे बंगालच्या उपसागरात पोहोचते. या स्थळाला सुंदरवन डेल्डा असे नाव आहे. जगातला हा सर्वांत मोठा डेल्टा आहे. नदी व सागर संगमाच्या ठिकाणी नदीने सोबत आणलेल्या गाळाने हा डेल्टा तयार होतो.

सहायक आणि थेट जुळलेल्या अशा छोट्या व मोठ्या १९ नद्यांना सोबत घेऊन गंगेचा प्रवास होतो. आठ प्रमुख नद्यांचा गंगेसोबत थेट संगम आहे. गंगेच्या काठावरची आणि आजूबाजूची गावे कमालीची समृद्ध झाली आहेत. प्रत्येक स्थळाला पौराणिक महत्त्व आहे. या सर्व स्थळांपैकी काही स्थळांचा विकास झाला तर काहीचा सुरू आहे. पर्यटक आवडीने या स्थळांना भेटी देत आहेत. चारधाम यात्रेसह अन्य ठिकाणी गेल्या दहा वर्षात होणारी गर्दी त्याचे द्योतक आहे. ज्यांनी दिल्या नाही, त्यांनी अवश्य भेट द्यावी. गंगा सर्वांना मातेसमान आहे. तिची कृपा निरंतर आहे. आपल्या सनातन संस्कृतीचा गौरवशाली इतिहास माँ गंगेच्या अस्तित्वाने उजळला आहे. विशेष म्हणजे तो जाणून व समजून घेण्याचा कोट्यवधी लोकांकडून होणारा प्रयत्न हिंदू धर्मासाठी खरंच गौरवास्पद आहे.

९४२०७२१२२५

## धर्म-संस्कृती

प्रा. दिलीप जोशी

# छंद आधारित छांदोग्य उपनिषद!

'छांदोग्य उपनिषद' हे सामवेदांतर्गत उपनिषद आहे. सामवेदाचे गायन होत असते. त्यामुळे छांदोग्य उपनिषद हे गेय उपनिषद आहे. सामवेदातून छांदोग्य उपनिषदाची निर्मिती असल्यामुळे यातील मंत्र स्वर, ताण, लय आणि छंदावर आधारित आहेत. हे उपनिषद छंदावर आधारित असल्यामुळे या उपनिषदाचे नाव छांदोग्य उपनिषद आहे. विशेष म्हणजे यातील बहुतांश मंत्र काव्यात्मक आणि गायकीच्या मापात, गेयतेच्या मोजपट्टीत बसतात. यातील भाषा गद्य असली, तरी ती पद्य आणि गेय थाटात आहे. म्हणून हे छांदोग्य उपनिषद. छंद म्हणजे परमेश्वराचा अनहत नाद होय. या उपनिषदाचे एकूण ८ अध्याय १५४ खंड आणि ६३० मंत्र आहेत. विशाल कलेवर असलेले हे उपनिषद आहे. या उपनिषदात ओंकाराचे स्वरूप, व्याख्या प्रामुख्याने सांगितली असून ओंकाराचे नाव 'उद्‌गित' सांगितले असून ओंकार म्हणजे सामरस ज्याला अष्टम रस म्हटले आहे. ओंकाराचे ध्यान म्हणजे उद्‌गित ध्यान म्हटले आहे. उद्‌गित म्हणजे उच्च स्वरात आर्त हाक होय.

**ओमित्येतदक्षरमुद्गीथ मुपासित। ओमिति ह्युद्गायति तस्योप व्या'यानम्॥**

याच उपनिषदात ऋषी शांडिल्य यांनी ब्रह्मावर केलेली चर्चा शांडिल्य विद्या नावाने परिचित आहे.

'आत्मा हाच ब्रह्म' सांगणारी शांडिल्य विद्या याच उपनिषदात आहे. अशा विविध विद्या याच उपनिषदात आहेत. या उपनिषदाचे तीन गटांत वर्गीकरण करता येते. पहिल्या गटात अध्याय एक आणि दोन येतात. त्यात ओंकार वर्णन, भाषेची रचना, ताण, लय, सूर यावर आधारित तत्त्वे सांगितले आहेत. दुसरा गट अध्याय तीन ते पाच असून ज्यात उपासना आणि विविध विद्या विदित केल्या आहेत. तिसरा गट अध्याय सहा ते आठचा असून, ज्यामध्ये आध्यात्मिक वास्तवाचे स्वरूप सांगितले आहे. अजून सोपे सांगायचे तर पहिल्या पाच अध्यायात ज्ञानांग, मनांग आणि कर्मांग उपासना सांगितल्या तर उर्वरित तीनमध्ये ज्ञान सांगितले आहे. ज्ञान सहज संक'मित व्हावे म्हणून दृष्टांतासाठी काही आ'यायिका या उपनिषदात आहेत.

पहिल्या अध्यायाची सुरुवात ओंकार स्वरूपाने आहे. उद्‌गित ओंकार या उपनिषदाचा पाया आहे. याच पहिल्या अध्यायात ऋषी उषस्तीची कथा सांगतांना आपद्धर्म विदित केला. उषस्ती कुरू प्रदेशात असताना ओला दुष्काळ पडला. खायला काहीही नसल्यामुळे उपवास घडू लागले. अशावेळी 'शरीरम् आद्यम् खलु धर्म साधनम्'नुसार त्यांनी भिक्षेत मिळालेले उष्टे उडीद खाल्ले. त्यानंतर ज्याच्याजवळून उष्टे उडीद मिळाले, त्यानेच उष्टे पाणी देण्याचा प्रयत्न केला. तेव्हा उषस्ती म्हणाले, 'मी उष्टे पाणी पीत नाही.' तेव्हा तो दाता म्हणाला की, 'अहो! तुम्ही आताच उष्टे उडीद खाल्ले. मग उष्टे पाणी का नको?' इथे जगण्याला आवश्यक म्हणून उष्टे उडीद खाल्ले तो शरीर धर्म; त्याला इथे आपद्धर्म असेही म्हणतात. पण उडीद सेवन केल्याने ऊर्जा आल्यामुळे उष्टे वर्ज्य हा आचार धर्म.

वेदांच्या प्रसिद्ध चार वाक्यांमधील 'तत्त्वमसि' हे वाक्य याच उपनिषदातील आहे. उद्दालक ऋषी आपला पुत्र श्वेतकेतू याला उपदेश करताना हे महावाक्य सांगतात.

**आत्मा तत्त्वमसि श्वेतकेतो इति भूय एव मा।**

चार वेदांची जी चार महावाक्ये आहेत. त्यातील एक वाक्य तत्त्वमसि आहे. 'तत् त्वं असी' ते ब्रह्म तूच आहेस. ते याच उपनिषदातील आहे. भगवान प्रजापतीने देव आणि दानव या दोघांनाही उत्पन्न केले. म्हणजे प्रजापती दोघांचेही जनक. एकदा देवराज इंद्र आणि दानवराज विरोचन आत्म्याविषयी जाणून घेण्यासाठी भगवान प्रजापतीजवळ गेले. तेव्हा सुरुवातीला चर्चा झाल्यावर आपले शरीर म्हणजेच आत्मा हे समजून दोघेही आपापल्या स्थानी गेले. इंद्राला शंका आली म्हणून तो पुन्हा प्रजापतीजवळ गेला. कथा मोठी आहे, पण शेवटी अनेक वेळा चर्चेनंतर इंद्राला समजले की, आत्मा हे परमात्म्याचे लघु रूप आहे म्हणून देव दैवी वागतात. दानव असलेले विरोचन मात्र शरीरालाच आत्मा समजू लागल्यामुळे सर्व राक्षस जमात भौतिक शरीराचा विचार केल्यामुळे राक्षस बनले.

ऋषी अरुण यांचे पुत्र अरुणी ज्यांचे नाव उद्दालक ऋषी आहे. उद्दालकांनी आपले गुरू धौम्यमुनी यांची केलेली सेवा आणि गुरुपरीक्षेची कथा तथा धौम्यमुनींनी सांगितलेला कर्तव्यभाव याच उपनिषदात आहे.

जाबाला नावाच्या वारांगणेच्या पुत्राने आपल्या आईला पित्याचे नाव आणि गोत्र विचारल्यावर त्याच्या आईने सत्यकथन करून पित्याचे नाव आणि गोत्र सांगता येणार नाही, असे सांगितले. तू माझा पुत्र म्हणून तुझे नाव 'जाबाल' असे त्याला सांगितले. पुढे हे जाबाल गुरू हरिदृमत गौतमाकडे गेल्यावर गुरूंनी गोत्र विचारले. त्यावर जाबालाने सत्यकथन केले. तू सत्य सांगितले म्हणून तुला मी शिष्य म्हणून स्वीकारतो. आजपासून तुझे नामाभिधान 'सत्यकाम जाबाल' असे राहील. त्यानंतर सत्यकाम जाबाल ब'ह्मपदापर्यंत पोचले.

देवर्षी नारदांनी सनत्कुमारांना उपदेश मागितला तेव्हा सनत्कुमारांनी नारदांना आधी तुमच्याजवळ असलेले ज्ञान मला सांगा; मग मी त्यापुढील ज्ञान सांगेन. हा सुंदर ज्ञानात्मक संवाद इथे आहे. या ब'ह्मज्ञानाचा संक'मण प्रवास याच उपनिषदात सांगितला आहे.

**तद्धैतब'ह्मा प्रजापतयै उवाच, प्रजापतिर्मनवे मनुः।**
**प्रजाभ्यः आचार्यकुलाद्वेदमधित्य यथा विधानं गुरोः॥**

हे ब्रह्मज्ञान ब्रह्माने प्रजापतीला, प्रजापतीने मनूला, मनूने आपल्या प्रजारूपी पुत्रांना सांगितला. विधीप्रमाणे हे ज्ञान आचार्य कुलांना प्राप्त झाले आणि त्यांच्याकडून आजतागायत संक्रमण सुरू आहे.

छांदोग्यातच देवासुर एकाच पित्याचे पुत्र असून त्यांच्या प्रवृत्तीत भेद का याबाबत चर्चा आहे. देवांनी ओंकार उपासना आरंभ केल्यावर दानव बाधा घालत असत. नासिकेतून ओंकार साधना सुगंध देत असताना असुरांनी बाधा टाकून दुर्गंधदेखील प्रस्थापित केला. त्यामुळेच वाणीत सत्यासोबत असत्य, नेत्रात सुंदरतेसोबत बीभत्स, कानांना चांगले आणि वाईट, मनाला संकल्प आणि विकल्पाने पापी बनवले. शेवटी देवांनी प्राणांसोबत उद्‌गित ओंकार उपासना केली. या प्राणावर असुरांचे काहीच चालेना. म्हणून प्राणावर आधारित उपासना करावी म्हणजे देवत्व, सात्त्विकता कायम राहते. याच उपनिषदात इंद्रियांमध्ये श्रेष्ठत्वावरून भांडण झाले. वाचा गेली तरी शरीरावर तितका फरक पडला नाही. डोळे गेले, कान गेले, नाक गेले तरी शरीर सुरूच होते; पण प्राण गेल्यावर शरीर गेले. त्यावरून सर्व इंद्रियांत प्राणशक्ती श्रेष्ठ हे उपनिषद स्पष्ट करते. सायुज्यता, समीपता, सरुपता आणि सलोकता या चार मुक्तीबाबतही या उपनिषदात इथे चर्चा आहे. 'तरुण भारत'च्या 'धर्मसंस्कृती' सदरामध्ये आपण दशोपनिषदांवर चर्चा केली. नवीन पिढीला किमान प्रमुख दहा उपनिषदांचा परिचय व्हावा, त्यांच्यात उत्सुकता निर्माण होऊन ते वाचण्यासाठी प्रेरित व्हावेत हा शुद्ध हेतू त्यामागे होता. गंगेचे पाणी स्वाहा म्हणून गंगेतच सोडतात तसेच हा उपनिषद विचार उपनिषद चरणी समर्पण!

९८२२२६२७३५

### अग्निहोत्राचे महत्त्व!

दरवर्षी १२ मार्चला विश्व अग्निहोत्र दिवस साजरा केला जातो. त्यानिमित्ताने अग्निहोत्र करण्याचे महत्त्व आणि लाभ थोडक्यात जाणून घेऊ या.

सूर्योदय आणि सूर्यास्ताच्या वेळी अग्नीमध्ये आहुती अर्पण करून केली जाणारी सूर्योपासना म्हणजे अग्निहोत्र! ही उपासना करण्यासाठी वेळ सोडली, तर अन्य कशाचेच बंधन नाही. अग्निहोत्रासाठी पिरॅमिडच्या आकाराच्या पात्रात गाईच्या शेणाच्या गोवऱ्या, दोन चिमूट अखंड तांदूळ आणि देशी गाईचे तूप यांच्या साहाय्याने अग्नी प्रज्वलित करतात. त्यानंतर मंत्र म्हणून आहुती दिली जाते. अग्निहोत्रातून निर्माण होणारा अग्नी हा वायुमंडलात दीर्घकाळ राहतो आणि त्यामुळे आपल्या भोवती दहा फूट अंतरापर्यंत संरक्षक कवच निर्माण होते.

अग्निहोत्रामुळे वनस्पतींना वातावरणातून पोषण द्रव्य मिळतात. भस्माचा वापर शेतीत केल्याने अधिक सकस आणि स्वादिष्ट अन्नधान्य, फळे, फुले आणि भाजीपाला पिकतो. अग्निहोत्र दररोज केल्याने मुलांच्या मनावर उत्तम परिणाम होऊन त्यांच्यावर चांगले संस्कार होतात. मुलांना एकाग'तेने अभ्यास करण्यात मदत मिळते. अग्निहोत्राचे असे अनेक लाभ आहेत. आज आपले जीवन अतिशय धावपळीचे आणि तणावग'स्त झाले आहे. अशा परिस्थितीत मानव जातीच्या कल्याणासाठी ऋषिमुनींनी अग्निहोत्राचा मार्ग उपलब्ध करून दिला आहे. आपण श्रद्धापूर्वक तो अवलंबल्यास निश्चितच लाभ होईल!

**डॉ. स्वाती देशमुख**/नागपूर

### कुंभमेळा : लौकिक, अलौकिक लाभ

'कुठे शोधिसी रामेश्वर अन् कुठे शोधिसी काशी' असा अलौकिक दर्शन सोहळा अगणित लोकांनी महाकुंभमेळानिमित्ताने अनुभवला. 'याचि देही याची डोळा' न्याहाळला, निरखला. कुंभस्नान झाल्यावर विचारमग्न झालो. काय मिळाले या कुंभमेळ्यातून ज्ञान-विज्ञान-संहिता मी काय समजलो? तेव्हा लक्षात आले, जसे आपल्याला लौकिक लाभ प्राप्त झाले, तसेच काही अलौकिक लाभही आपल्या पदरात पडले. महाकुंभ दर्शनाने गंगा-यमुना-सरस्वती या लोकमातांचे भारतीय प्रदेशाला सुजलाम् सुफलाम करणारे भौतिक व आध्यात्मिक महान कार्य आपण समजू शकलो. पंतप्रधान नरेंद्र मोदी, उत्तरप्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी आदींचे सुशासन, त्यांचा व्यापक दृष्टिकोन व रस्ते निर्माण यामुळे सहज सुलभ झालेला प्रवास, दळणवळणाचा परिणाम ध्यानात आला. भारताजवळ 'वैश्विक कल्याणा'चे परम मंगल तत्त्वदर्शन व सुजाण वागणूक असताना हिंदूची राष्ट्रीय एकात्मता बळकटीचे कार्य व महत्त्व कळले. कुंभमेळ्यातून घडलेल्या अशा लौकिक लाभासोबतच अलौकिक लाभही मिळाला. त्यात प्रामु'याने परम कल्याण व ज्ञानाचे अधिष्ठान असलेला भगवान शंकर काशीला प्रकटला. त्याने वेद-उपनिषदे, शास्त्र, कला, विद्या यांचे ज्ञान ग्रंथ संरक्षित करून ते ज्ञान सुयोग्य संथा पद्धतीने देण्यासाठी स्थापित गुरुकुले नीट सांभाळली.

सगळ्यांना पुरणारी संसाधने ईश्वराने मुबलक दिली असून त्यातून आवश्यक तेवढे घ्या, ओरबाडू नका. निर्मल व्हा. निर्मलता राखा. अमृत ज्ञान प्राप्त करा. गंगेत बिनधास्त विहरणारी देशी व पर्यटक पक्षी, सैबेरीयन बदके व जलचर दर्शन मोहक वाटले. मनुष्य सोडला तर द्वैताची भावना कुणातच नसते. त्यामुळे पाप-पुण्य या भावरहित अवस्थेत सुदूर प्रदेशातील स्थलांतरित असंख्य पक्षी कुणाचीही भीती न बाळगता गंगेच्या ईश्वरी कुशीत जलविहार (कुंभस्नान)करीत आनंदी होती. पापक्षालन व पुण्य संपादनाचा विषय थोडा वेगळा काढला तरी अहंकार प्रेरित द्वैत भावनेने, विराट रूपाशी असलेले स'य विसरून असं'य मूढमती माणसे आनंद व ईश्वराचा शोध घेण्यात मग्न असल्याचे या कुंभमेळ्यात दिसून येत होती.

**मिलिंद वसमतकर**/९६६५०७१७८३

## वाचक पत्रे



### प्रदूषित पाण्यामुळे दीनदयालनगरात पोटाचे विकार

दीनदयालनगरातील आजी-आजोबा उद्यानाच्या परिसरात, विशेषतः बसरूटच्या पश्चिमेकडील भागात गेले काही दिवसांपासून नळाच्या पाण्याला दुर्गंधी असून प्रदूषित पाण्यामुळे अनेक घरांत पोटाचे विकार व तापाचा त्रास सुरू झाला आहे. मनपाच्या संबंधित अधिकारीवर्गाने याची दखल घेऊन त्वरित योग्य कारवाई करावी, अशी नागरिकांची अपेक्षा आहे.

**वसंत दीक्षित**/९१३७८६६६१७

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल अॅड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास **९८५०७५३२८१** या व्हॉट्स अॅप क्रमांकावर पाठवावा.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८
RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

# लेंडी प्रकल्पास ९० कोटी रुपये निधी प्राप्त

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. १२ मार्च-**

लेंडी प्रकल्पासाठी ९० कोटी रुपये इतका निधी गोदावरी महामंडळास वितरीत झाला आहे. या निधीतून शेतकऱ्यांना प्राधान्याने सानुग्रह अनुदान वाटप व या प्रकल्पाच्या घळभरणीचे काम समांतरपणे त्वरीत सुरु करण्याचे निर्देश राज्याचे जलसंपदा मंत्री (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिले आहेत.

लेंडी आंतरराज्य प्रधान प्रकल्प हा महाराष्ट्र व तेलंगना राज्याचा संयुक्त प्रकल्प आहे. या प्रकल्पाचा पाणी वापर क्षमता ५.९६ टीएमसी इतका आहे. या प्रकल्पामुळे एकूण २६ हजार ९२४ हेक्टर इतके क्षेत्र सिंचनाखाली येणार आहे. या प्रकल्पास १९८५ मध्ये प्रशासकीय मान्यताप्राप्त असून प्रकल्पाची अद्यावत किंमत २ हजार १८४ कोटी रुपये इतकी आहे. प्रकल्पग्रस्तांनी सन २०११ पासून विविध मागण्यासाठी प्रकल्पाचे काम बंद केले होते.

यात प्रमुख मागण्यापैकी मुक्रमाबाद पूर्ण गावाचे स्वच्छ पुनर्वसन करणे, ज्या गावांमध्ये पूर्णत: जमीन उपलब्ध होत नाही तेथील प्रकल्पग्रस्त कुटूंबाना स्वेच्छा पुनर्वसन अनुदान देणे. वंशवृध्दीमुळे प्रकल्पग्रस्त कुटूंबामध्ये वाढ झाल्यामुळे वाढीव कुटूंबाना विशेष आर्थिक अनुदान देणे. शेतकऱ्यांसाठी विशेष बाब म्हणून सानुग्रह अनुदान मंजूर करणे वरील तीन्ही मागण्या मान्य झाल्या असून शासन निर्णय निर्गमित झाला आहे. याबाबत एकूण २२१ कोटी रुपयाचा निधी महसूल विभागाकडे वर्ग करुन प्रकल्पग्रस्तांना वाटप करुन यावर्षी धरणाचे काम पुनश्च सुरु करण्यात आले होते. सानुग्रह अनुदानाच्या मागण्यासाठी नियामक मंडळाने २७ सप्टेंबर २०२४ रोजी १६५.११ कोटीस मंजुरी दिली. त्यानुसार १० कोटीचा निधी महसूल विभागाकडे वर्ग करण्यात आला होता.

घळभरणीसाठी तांत्रिक व प्रशासकीय दोन्ही मान्यता प्राप्त करण्यात आलेल्या होत्या. परंतु प्रकल्पग्रस्तांनी ५ फेब्रुवारी २०२५ पासून घळभरणीचे व इतर कामे पुन्हा बंद केली होती. आता इतर कामे पुन्हा सुरु करण्यात येत असून, त्या अनुषंगाने ११ मार्च २०२५ रोजी जलसंपदा मंत्री (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) राधाकृष्ण विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली गोदावरी पाटबंधारे विकास महामंडळाअंतर्गत कार्यकारी संचालक, मुख्य अभियंता अधीक्षक यांच्या समवेत बैठक संपन्न झाली. या अनुषंगाने लेंडी प्रकल्पास ९० कोटी रुपये निधी गोदावरी महामंडळास वितरीत करण्यात आला आहे.

# 'आका' अन् 'बोका' प्रवृत्तीचा समाजाला धोका

## अर्धापूर नगराध्यक्ष पदग्रहण सोहळ्यात नरेंद्र चव्हाण प्रतिपादन

**तभा वृत्तसेवा**
**अर्धापूर,दि. १२ मार्च-**

सध्याचा काळ आकाबोक्यांचा आहे. समाजात वाढत चाललेल्या 'आका', 'बोका' आणि आकांचाआका या प्रवृत्तीमुळे राजकीय आणि सामाजिक जिवन बिघडत आहे. आशा आका बोकांपासून समाजातील नागरीकांनी सावध राहावे असे आवाहन अर्धापूर नगराध्यक्ष पदग्रहण सोहळ्यात नरेंद्र चव्हाण यांनी केले.

शिवाजी महाराजांना सर्वात जास्त त्रास स्वकियांचा झाला. त्यांना सर्वात जास्त लढाया स्वकियांशी कराव्या लागल्या संभाजी महाराजांना ३४ दिवस साखळ दंडाने बांधून संगमेश्वर ते बहादूर गड नेतांना त्यांना वाचविण्यासाठी कोणीही पुढे आले नाही हा खेद आहे. शहाजीराजे व जिजाऊ माँ साहेबांनी शेतकऱ्यांना मदत केली. सोन्याचा नांगर फिरविला शेतकरी सुखी राहावा यासाठी मोठे प्रयत्न केले. शंकरराव चव्हाण यांनी पश्चिम महाराष्ट्रातील लोकांसोबत भांडण घेत महाराष्ट्रातील शेतकऱ्यांसाठी ईसापुर पाण्याचा प्रकल्प पूर्ण करण्यासाठी प्रयत्न केले. कै शंकरराव चव्हाणांपाठोपाठ अशोक चव्हाण यांचे विकासात्मक नेतृत्व सर्वश्रुत असुन जनतेने कोणाच्या पाठीमागे राहायला पाहिजे याचा विचार करत जीवाचे रान करणाऱ्या चव्हाण कुटुंबीयांच्या पाठीमागे उभे राहावे हे आपलं कर्तव्य आहे. असे नरेंद्र चव्हाण म्हणाले.

अर्धापूर नगर पंचायतीच्या नगराध्यक्षपदाची निवड दि.७ मार्च रोजी पार पडली. यात नगराध्यक्षपदी सौ. वैशाली देशमुख यांची बिनविरोध निवड झाली आहे. या निवडीनंतर नगर पंचायत कार्यालय परिसरात मोठ्या थाटामाटात पदग्रहण सोहळा संपन्न झाला. या कार्यक्रमांत अर्धापूर शहरासह ग्रामीण भागातील राजकीय नेते, पदाधिकारी, कार्यकर्ते आणि विविध क्षेत्रातील मान्यवरांनी सौ. वैशाली देशमुख व उपनगराध्यक्ष मुख्तदर खान पठाण यांचे जंगी स्वागत करण्यात आले.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संचालक गोविंद शिंदे तर प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ नेते धर्मराज देशमुख, जिल्हाध्यक्ष अँड. किशोर देशमुख, सभापती संजय लहानकर, माजी सभापती किशोर स्वामी, तालुकाध्यक्ष डॉ. लक्ष्मण इंगोले, शहराध्यक्ष योगेश हाळदे, माजी तालुकाध्यक्ष बालाजी पाटील गव्हाणे, माजी नगराध्यक्ष छत्रपती कानोडे, माजी उपनगराध्यक्ष मुसव्वीर खतीब, उपनगराध्यक्ष मुक्तेदरखाँन पठाण, शहराध्यक्ष राजेश्वर, शेटे आदी मान्यवर उपस्थित होते. अर्धापूर नगर पंचायत अध्यक्षपदाच्या निवडणूकीसाठी उपविभागीय अधिकारी सचिन खल्लाळ यांनी पिठासीन अधिकारी म्हणून काम पाहिले तर मुख्याधिकारी शैलेश फडसे यांनी त्यांना सहकार्य केले. यावेळी नगराध्यक्षा वैशाली देशमुख, उपनगराध्यक्ष मुख्तदर खान पठाण यांच्यासह माजी नगराध्यक्ष छत्रपती कानोडे, माजी उपनगराध्यक्ष यास्मिन सुल्ताना मुसवीर खतीब, नगरसेवक बाबुराव लंगडे, सोनाजी सरोदे, कान्होपात्रा माटे, शालिनी शेटे, डॉ. पल्लवी लंगडे, नामदेव सरोदे, गाजी काझी, सलीम कुरेशी, मिनाक्षी राऊत हे नगरसेवक उपस्थित होते. नगराध्यक्ष निवडीनंतर नगरपंचायत परिसरात ढोलताशांच्या गजरात फटाक्यांची आतिषबाजी करून आनंदोत्सव साजरा करण्यात आला.

## संक्षिप्त वृत्त

### डिजिटल मीडिया परिषदेच्या नांदेड महानगर सहकोषध्यक्ष पदी दिनेश येरेकर



**नांदेड** -मराठी पत्रकार परिषदेचा सलग्न असलेल्या डिजिटल मीडिया परिषदेच्या नांदेड महानगर सह कोषाध्यक्षपदी दिनेश येरेकर यांची निवड करण्यात आली आहे. डिजीटल मिडीया परीषदेचे जिल्हाध्यक्ष प्रवीण खंदारे यांनी ही निवड जाहीर केली. नांदेड डिजिटल मीडियाचे जिल्हाध्यक्ष प्रवीण खंदारे, डिजिटल मीडियाचे महानगरध्यक्ष नकुल जैन यांच्या उपस्थितीत दि. १२ मार्च शासकीय विश्रामगृहात बैठक घेण्यात आली. या बैठकीत डिजिटल मीडिया नांदेड महानगर कार्यकारणी जाहीर करण्यात आली असुन महानगर सह कोषध्यक्षपदी दिनेश येरेकर यांची निवड करण्यात आली आहे. या बैठकीस डिजीटल मिडीयाचे कायदेशीर सल्लागार अॅड. प्रमोद नरवाडे, प्रविण देशमुख, शिवाजी हंबर्डे आदीसह अनेकांची उपस्थिती होती.

### बँक खाते होल्ड केल्याने कर्जबाजरी शेतकऱ्याने केली आत्महत्या



**मुदखेड-** तालुक्यातील मौजे वाई येथील शेतकरी रावसाहेब मानिका ढगे वयवर्ष (५३) यांनी सततची नापीकी व बँकेने खाते व्होल्ड केल्याने गळफास लावून आपली जीवन यात्रा संपविली आहे. रावसाहेब पिता मानिका ढगे रा. वाई ता. मुदखेड जि. नांदेड हे आपल्या कोरडवाहू शेतीवर आपला उदरनिर्वाह करीत असत.सतत होणारी नापिकी या मुळे बँक व खाजगी सावकारांच्या कर्ज पाशात अडकल्याने निरंतर होणारी कुचंबना यामुळे आधीच व्यतिथ झाले होते, त्यातच वडिलोपार्जित घर मोडकळीस झाल्याने कुटुंब उघड्यावर आले म्हणून राहण्यापुरते बांधकाम करण्यासाठी काम हाती घेतले होते. आर्थिक दुस्ट चक्रमुळे बांधकाम उरकता उरकत नव्हते, त्यातच थकीत कर्ज झाल्याने बँकेने खाते व्होल्ड केले, यामुळे खाजगी गृह कर्ज देणाऱ्या खाजगी कंपनीने कर्ज नाकारले, तुटपुंज्या रोज मजुरीतून जमावलेली पुंजी संपून गेली, वेळेवर कोणतेच कामे होत नव्हती, यातच शासनाचे पंतप्रधान सन्मान निधी व दुष्काळ या सारखे मिळणारे अनुदान बँक खाते व्होल्ड झाल्याने अडकून पडले यामुळे हवालदिल झालेल्या शेतकरी राजाने अखेर अर्धवट बांधकामास सुम्ब बांधून स्वतःच गळफास घेऊन आपली जीवन यात्रा दि. १० मार्च २०२५ रोजी संध्याकाळी १०:३० च्या दरम्यान आपली जीवन यात्रा संपविली. त्यांच्या पसच्यात आई सुभद्राबाई माणिक ढगे, पत्नी सत्वशीलाबाई रावसाहेब ढगे, मुलगा माणिक रावसाहेब ढगे, मुलगी मीनाबाई गंगाधर पंडागळे असा परिवार असून, मुदखेड येथील पोलीस स्थानकात आकस्मित मृत्युंची नोंद घेण्यात आली असून, ग्रामीण रुग्णालय मुदखेड येथे दि. ११ मार्च २०२५ रोजी शव विच्छेदन झाल्यानंतर मौजे वाई येथे साश्रू नयनाने नातेवाईक व गावाकऱ्यांच्या उपस्थितीत अंतिम संस्कार करण्यात आले.यामुळे संपूर्ण गावात हळहळ व्यक्त होत असून, पंच क्रोशीत शोक कळा पसरली आहे.

### आर्य वैश्य महासभेच्या जिल्हा ग्रामीण कार्यकारणीत डॉ. पलीकोंडावार, व्यवहारे

**हदगाव-** हदगाव आर्य वैश्य समाज बांधवांची महासभेच्या जिल्हा कार्यकारणीवर दोन प्रतिनिधी पाठविण्यासाठी काल रात्री बैठक होऊन त्यात सर्वानुमते डॉ.संजय पलीकोंडावार व सुनील व्यवहारे यांची बिनविरोध निवड करण्यात आली. या बैठकीस आर्य वैश्य महासभेचे राज्य कार्यकारिणीचे सदस्य शिरीष मनाठकर, बांधकाम समितीचे प्रभाकर पत्तेवार हदगावचे आर्य समाजाचे अध्यक्ष श्रीनिवास दमकोंडवार यांच्या प्रमुख उपस्थितीत सर्व बांधवांची जिल्हा कार्यकारिणीसाठी शिरीष मनाठकर यांच्या निवासस्थानी बैठक घेऊन त्यात सर्वानुमते डॉ.संजय पलिकोंडावार व सुनील व्यवहारे यांची निवड बिनविरोध निवड घोषित करण्यात आली.यावेळी राज्य कार्यकारिणीची माजी सदस्य राजेश्वर रायेवार, बंडोपंत रायेवार, राजु मनाठकर, सतीश रेवनवार, अरुण मामीडवार, राम वट्टमवार, डॉ. संतोष मामीडवार, मनोज करचलवार, प्रशांत मुक्कावार, उदय गंदेवार, अजित बंडेवार, सुरेश उत्तरवार, सुरेश तृप्तेवार, सुरज अमिलकठंवार, सुनील रायेवार, गजानन रेवनवार, विजय व्यवहारे, धनंजय महाजन यांच्यासह सर्व समाज बांधवांनी निवडीचे स्वागत केले.

### ग्लॅन्डर रोगाच्या प्रादुर्भावामुळे अश्व प्राण्यांचे शहरातुन ये-जा वाहतूकीस प्रतिबंध

**नांदेड** - नांदेड शहरामध्ये अश्ववर्गीय प्राण्यांमध्ये ग्लॅन्डर रोगाचा प्रादुर्भाव आढळून आल्यामुळे प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून प्राण्यांमधील संक्रमण व सांसर्गिक रोग प्रतिबंध व नियंत्रण २००९ मधील तरतुदीनुसार नांदेड शहरामध्ये बाहेरुन येणाऱ्या व बाहेर जाणाऱ्या अश्ववर्गीय प्राण्यांची वाहतूक करण्यास प्रतिबंध केला आहे असे आदेश जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी राहुल कर्डिले यांनी निर्गमित केले आहेत. प्राण्यांमधील संक्रमण व सांसर्गिक रोग प्रतिबंध व नियंत्रण अधिनियम २००९ व ग्लॅन्डरच्या नियंत्रण व निर्मूलनासाठी राष्ट्रीय कृती योजना २०१९ अंतर्गत पाच ते दहा किलोमीटर अंतर्गत असलेल्या गावातील अश्ववर्गीय प्राण्याची वाहतूक करण्यास या आदेशान्वये प्रतिबंध करण्यात आला आहे.

# तब्बल दोन वर्षांपासून रखडली मान्यवर वृद्ध कलावंत व साहित्यिकांच्या मानधन निवडीची प्रक्रिया

**तभा वृत्तसेवा**
**हिमायतनगर,दि. १२ मार्च-**

राजर्षी शाहू महाराज साहित्यिक व कलावंत मानधन निवडीसाठीची जिल्हास्तरीय समिती पूनर्गठित नसल्याने मान्यवर वृद्ध कलावंत व साहित्यिकांच्या मानधनांचे प्रस्ताव गत दोन वर्षांपासून मान्यतेविना असून समितीच्या पूनर्गठनासाठी जिल्ह्याचे पालकमंत्री ना.अतुल सावे यांच्याकडे पाठपुरावा करावा अशी आग्रही मागणी समितिच्या सदस्या तथा,जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे आज निवेदनातून करतांनाच याबाबत दूर्लक्ष केल्यास येत्या दि.२१ मार्च रोजी नांदेडच्या जिल्हा परिषद कार्यालयासमोर भजन आंदोलन करण्याचा ईशारा दिला आहे.

सन् २०२३-२४ या वर्षात मान्यवर वृद्ध कलावंत व साहित्यिक मानधन निवडीची प्रक्रिया जिल्हास्तरीय समिती पूनर्गठन नसल्याने रखडली होती.त्यानंतर,शासन परिपत्रकानुसार सदरची समिती नामकरणासह काही बदल करण्यात आले. त्यानुसारचीही राजर्षी शाहू महाराज साहित्यिक व कलावंत मानधन निवड जिल्हास्तरीय समिती पूनर्गठित नाही.त्यामूळेच सन् २०२३-२४ व २०२४-२५ या दोन्ही वर्षाचे अर्ज व प्रस्ताव मागविण्यात आलेले असले तरिही त्यांची छाननी करुन अद्याप पात्र ठरविण्यात आलेले नाहीत.यासाठीच्या समितीचे पूनर्गठन नसल्यानेच त्याबाबतची कार्यवाही थांबल्याची माहिती संबंधित विभागाकडून दिलो जात आहे. परिणामी आर्थिक मदतीविना लाभार्थींची परवड होत असल्याची बाब जिल्ह्याचे पालकमंत्री ना.अतुल सावे यांच्या निदर्शनास आणून द्यावी सोबतच,सदरची समिती पूनर्गठित व्हावी यासाठी पाठपुरावा करावा अशी मागणी समितीच्या सदस्या तथा,जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे बहुजन टायगर युवा फोर्स च्यावतिने करण्यात आलेली असून या निवेदनाच्या प्रति नांदेडचे जिल्हाधिकारी,जिल्हा पोलीस अधिक्षक,जिल्हा परिषद पंचायत विभागाच्या उप मुख्य कार्यकारी अधिकारी आदींना पाठविण्यात आल्या आहेत. महत्वाचे म्हणजे,भारतीय संस्कृतीत लोकपारंपारिक कला जीवंत ठेवण्यासाठीच कलेच्या माध्यमातून समाजप्रबोधनाचे महान कार्य कलावंत करित असतात.त्यांना शासनाकडून देण्यात येत असलेली आर्थिक मदत वाढविण्यासह मान्यवर वृद्ध कलावंत व साहित्यिकांच्या न्याय व हक्कासाठी आम्ही सातत्याने प्रयत्नशील असून गत अनेक वर्षांपासूनच्या प्रलंबित मागण्या पुर्णत्वासह राज्यातील रखडलेल्या नांदेडसह अनेक जिल्हास्तरीय समितींच्या पूनर्गठनासाठी आगामी काळात आंदोलनात्मक भूमिका घेत यापूढेही प्रसंगी आक्रमकपणे रस्त्यावर उतरुन संघर्ष करणार असल्याचे बहुजन टायगर युवा फोर्स महाराष्ट्र व पारंपारिक शाहीर लोककला संवर्धन मंडळाचे संस्थापक अध्यक्ष त्रिरत्नकुमार भवरे म्हणाले.

# गोरठा परीसरात जळालेल्या अवस्थेत आढळला अनोळखी व्यक्तीचा मृतदेह

**तभा वृत्तसेवा**
**उमरी,दि. १२ मार्च-**

शहरापासून जवळच असलेल्या गोरठा परिसरात एका अनोळखी व्यक्तीचा मृतदेह जळालेल्या अवस्थेत आज आढळून आला. मृतदेह आढळून आल्यामुळे उमरी तालुक्यात खळबळ उडाली आहे. दरम्यान मागील वर्षभरात खुनाचीही तिसरी घटना असल्याने तालुक्यात भितीचे वातावरण निर्माण झाले आहे.

उमरी शहरापासून जवळच असलेल्या गोरठा परिसरात दररोज सकाळी शहरातील अनेक जण मॉर्निंग वॉकसाठी जात असतात. आज सकाळी काही जणांना गोरठा परिसरातील पुलापासून जवळच दुर्गंधी येत असल्याने नागरिकांनी पाहिले असता त्याठिकाणी त्यांना एका अज्ञात व्यक्तीचा मृतदेह जळालेल्या अवस्थेत आढळून आला. नागरिकांनी तातडीने पोलिसांना माहिती दिल्यानंतर उमरी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक अंकुश माने आपल्या पथकासह घटनास्थळी दाखल होवून माहिती घेतली. दरम्यान मागील काही दिवसापासून उमरी शहरासह तालुक्यात अवैध मटका, गुटका विक्री मोठ्या प्रमाणात सुरु आहे. त्याचबरोबर हाणामारी, चोरी आदी प्रकार मोठ्या प्रमाणात घडत असल्याने नागरिकांमध्ये भितीचे वातावरण झाले आहे. त्यातच आज उघड झालेल्या घटनेमुळे नागरिकांमध्ये दहशत निर्माण झाली असून, पोलिसांनी अशा अवैध धंद्यावर वेळीच आवर घालावा, अशी मागणी होत आहे.



नांदेड- स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक उदय खंडेराय व त्यांच्या पथकाने नवनाथ वडजे यास अटक केली असुन त्याच्याकडुन चोरीच्या पाच मोटारसायकली जप्त केल्या आहेत.

# राष्ट्रवादी काँग्रेसचा पक्ष प्रवेश सोहळा

**तभा वृत्तसेवा**
**देगलूर,दि. १२ मार्च-**

देगलूर तालुक्यातील मरखेल येथे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे सदस्य नोंदणी अभियान व पक्षप्रवेश सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. यावेळ आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या प्रमुख उपस्थित भव्य असा कार्यक्रम पार पडला.

यावेळी शिक्षण महर्षी श्री गोजेगांवकर यांनी सुंदर असे आयोजन केले होते. यावेळी मी राष्ट्रवादी पक्षाचे गाव तिथं शाखा -घर तिथं राष्ट्रवादी संघटन बद्दल विस्तृर्त मार्गदर्शन केले.

यावेळी अनेक कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीमध्ये पक्ष प्रवेश केला. सर्वांचे आभार मानत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

यावेळी माजी. आ. मोहन हंबर्डे, माजी. आ. अविनाश घाटे, दिलीप धर्मधिकारी, मा बाळासाहेब रावनगावकर यांच्या सह अनेक पदाधिकारी मान्यवर पदाधिकारी उपस्थिती होती. यावेळी भव्य असा कार्यकर्ता जनसमुदाय उपस्थिती झाला होता.

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी दिव्यांग सेलचे प्रदेश कार्याध्यक्ष रामदास पाटील सुमठाणकर यांनी म्हणाले कि,देगलूर हा माझ्यासाठी माझं कुटूंब आहे येथील जनतेची नाळ माझ्याशी खुप पूर्वी पासून जोडलेली आहे माझ्या प्रशासकीय काळात मी सर्वांच्या सोबत राहून काम केलं आहे म्हणून माझं देगलूर तालुक्यातील जनतेचं आपुलकीच नातं आहे.

पक्ष प्रवेश सोहळ्यांनतर असं सांगितलं जातं कि रामदास पाटील सुमठाणकर यांच्याशी अनेकांचे घनिष्ठ नाते असून येत्या काळात त्याच्या नेतृत्वाखाली असंख्य युवक राष्ट्रवादी काँग्रेस मध्ये प्रवेश करतील अशी सर्वत्र चर्चा रंगली आहे.

# विद्यापीठात 'रंग चेहऱ्यांचे' छायाचित्र प्रदर्शन

**तभा वृत्तसेवा**
**नवीन नांदेड,दि. १२ मार्च-**

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील माध्यमशास्त्र संकुलाच्या विद्यार्थ्यांनी टिपलेल्या पोर्ट्रेटचे 'रंग चेहऱ्यांचे' छायाचित्र प्रदर्शनाचे आयोजन दि. १३ मार्च रोजी स. ११:३० वा. माध्यमशास्त्र संकुलात करण्यात आले आहे. या प्रदर्शनाचे उदघाटन विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. डी.डी. पवार यांच्या हस्ते दि. १३ मार्च रोजी स. ११:३० वा. माध्यमशास्त्र संकुलात करण्यात करण्यात येणार आहे. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून आंतरविद्याशाखीय अभ्यास विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. चंद्रकांत बाविस्कर उपस्थित राहणार आहेत.

या छायाचित्र प्रदर्शनामध्ये मानवी जीवनातील विविध पैलू, सामाजिक परिस्थिती, सौंदर्य आणि सांस्कृतिक विविधतेचे दर्शन घडणार आहे. प्रत्येक चेहरा आपली स्वतः ची कहाणी सांगत असतो. ती कहाणी टिपणं ही कला आहे. प्रदर्शनातील चित्रांमध्ये भावभावना आणि कलात्मकता यांचे सुंदर मिश्रण पाहायला मिळणार आहे. विद्यार्थ्यांनी आपली सर्जनशीलता आणि तांत्रिक कौशल्ये दाखवून विविध छायाचित्रे सादर केली आहेत. हे प्रदर्शन दि. १३ ते १७ मार्च स. १०:३० ते सायं. ०५:३० वा. या कालावधीत सर्वांसाठी खुले राहणार आहे. या प्रदर्शना लाभ अधिकाधिक विद्यार्थी व छायाचित्र प्रेमींनी घ्यावा, असे आवाहन माध्यमशास्त्र संकुलाचे डॉ. राजेंद्र गोणारकर, छायाचित्र प्रदर्शनाचे समन्वयक डॉ. सचिन नरंगले, डॉ. दीपक शिंदे, डॉ. सुहास पाठक, डॉ. कैलाश यादव, प्रा. गिरीश जोंधळे यांनी केले आहे.

# जगद्गुरु तुकाराम महाराज वैकुंठ गमन सोहळ्यास सुरुवात

**तभा वृत्तसेवा**
**सोनखेड,दि. १२ मार्च-**

सोनखेड येथे श्री.संत जगद्गुरु तुकाराम महाराज यांच्या बीज उत्सवाच्या सप्ताहाला १० मार्च रोजी येथे प्रारंभ झाला आहे.



येथील प्रति देहू असलेल्या श्री संत जगद्गुरु तुकाराम महाराज संस्थान सोनखेड येथे अनाधिकाळापासून चालू असलेला हा सप्ताह मि.फाल्गुन शु.११ एकादशीच्या सुरुवात झाली आहे. या सप्ताहामध्ये पहाटे ४ ते ६ काकडा आरती,सकाळी ६ ते ७ विष्णू विष्णुसहस्त्रनाम,सकाळी ७ ते १२ संत तुकोबारायाच्या गाथेचे सामूहिक पारायण प्रमुख ह भ प बळवंत भगवानमहाराज मोरे यांचे होईल ,दुपारी १ ते २ गाथा भजन, सायंकाळी ४ ते ५ प्रवचन,६ ते ७ हरिपाठ रात्री ९ ते ११ हरी किर्तन होईल तर रात्री ह.भ.प.शरद महाराज देगलूरकर,ह.भ.प.गाथामूर्ती चंद्रशेखर महाराज देगलूरकर, ह.भ.प गुरुवर्य उल्हास महाराज सूर्यवंशी(आळंदी देवाची), गुरु कानोबा महाराज देहूकर (नाना), ह.भ.प.पंडित महाराज शिरसागर (आळंदी देवाची), ह.भ.प.माऊली महाराज सिंदगीकर तर १६ मार्च रोजी गुलालाचे किर्तन ९ ते १२ ह.भ.प. दत्तात्रय आंबिरकर यांचे होईल तद्नंतर सार्वजनिक भंडारा असेल व रात्री ९ ते ११ ह.भ.प.अच्युत महाराज दस्तापुरकर यांचे किर्तन होणार आहे व शेवटी ह.भ.प.गुरुराज महाराज देगलूरकर यांचे काल्याचे किर्तन होईल आणि या सप्ताहामध्ये सकाळी फराळ दुपारचे अन्नदाते व सायंकाळचे अन्नदाते यांच्याकडून दररोज पंगती असतील तरी हा अखंड हरिनाम सप्ताह श्री संत जगद्गुरु तुकाराम महाराज यांच्या त्रिशतकोत्तर (३७५) व्या अमृत महोत्सवानिमित्त साजऱ्या होणाऱ्या सामूहिक गाथा पारायणाचा,किर्तन सोहळ्याचा, अन्नदानाचा पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी लाभ घ्यावा असे आवाहन श्री.संत जगद्गुरु तुकाराम महाराज संस्थान सोनखेड यांच्या वतीने करण्यात आले आहे. व संपूर्ण साप्ताहचे लाईव्ह प्रक्षेपण jagadguru tukaram maharaj sansthan sonkhed या लिंक वर लाईव्ह पाहता येईल अशी माहिती संस्थान च्या वतीने करण्यात आली आहे

# गणपती मूर्तिकार बांधवांच्या सदैव पाठीशी : हेमंत पाटील

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. ११ मार्च-**

प्लास्टर ऑफ पॅरिस पासून बनणाऱ्या मुर्त्या पासून नदीचे प्रदूषण होत असल्यामुळे त्यावर बंदी आणण्याचे आदेश न्यायालयाने दिले आहेत. त्यामुळे गणपती मूर्ती बनविणाऱ्या मुर्तीकारावर उपासमारीची वेळ आली आहे.त्यांच्या या न्यायालयीन लढाईत मी शिवसेना पक्ष सदैव त्यांच्या पाठीशी आहे असा ठाम विश्वास कॅबिनेट मंत्री नामदार हेमंत पाटील यांनी मूर्तिकार बांधवांच्या बैठकीत व्यक्त केला.

नदीच्या प्रदूषणाला मोठ्या प्रमाणात पीओपी जबाबदार आहे त्यामुळे पीओपी पासून बनणाऱ्या मूर्ती व इतर वस्तू वर न्यायालयाने बंदी आणली आहे.परंतु हा व्यवसाय करणाऱ्या लाखो मूर्तिकार कामगारांवर



उपासमारीची वेळ या निर्णयामुळे आली आहे.मूर्तीकार यांच्या सोबतच या व्यवसायावर अनेकांची घरे चाललात त्यामुळे यावर अवलंबून असलेल्या सर्व स्तराला याचा फटका बसणार आहे. नदी प्रदूषण होते हे मान्य आहे. परंतु इतकी वर्षे झाले यावर अवलंबून असणाऱ्या मूर्तिकार कामगार यांनी काय करावे असा सवाल ही नामदार हेमंत पाटील यांनी उपस्थित केला. पीओपी वर बंदी आणल्या नंतर नांदेड मधील गणपती मूर्तिकार कामगार यांची बैठक आयोजित करण्यात आली होती या बैठकीला नामदार हेमंत पाटील यांच्यासह उपशहर प्रमुख अवतारसिंग, जेष्ठ शिवसैनिक बिल्लू यादव संघटनेचे अध्यक्ष गजेंद्रसिंह ठाकूर, उपाध्यक्ष शिवराजसिंह परमार,सचिव चंदनसिंह ठाकूर,अवतारसिंघ पहरेदार, जेष्ठ शिवसैनिक बिल्लू यादव, दत्तात्रय पेंटर, आनंद पलये, नामदेव झुरुडे, श्रीनिवास परडे, शंकर परडे,अंकुश झुरुडे,गोविंदसिंह गहेरवार,शंकरसिंह परमार यांच्यासह मूर्तिकार बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. पुढे बोलताना नामदार हेमंत पाटील म्हणाले की, देशाची संस्कृती या ना त्या माध्यमातून कोणी-कोणी जिवंत ठेवत असतात त्यामध्ये आपल्या मूर्तिकार बांधवांचा वाटा मोलाचा आहे ते आपल्या कलेच्या माध्यमातून हे काम करत आहेत.अनेक वर्षांपासून ते आपला व्यवसाय करत आहेत आणि अचानक त्यांना पाहिजे असलेल्या कच्च्या मालावर बंदी आणल्यामुळे सर्व मूर्तिकार बांधव हैराण झाले आहेत.व्यवसाय सुरू ठेवल्यास न्यायालयाच्या आदेशाचे उल्लंघन होईल या भीतीने सर्व व्यवसाय ठप्प झाले आहेत.आगामी काळात गणपती उत्सव, नवरात्र उत्सव येत असून त्याची तयारी सुद्धा आतापासून करावी लागते.त्याकरिता या समस्येवर खात्री लायक उपाय काढावा अशी विनंती मूर्तिकार बांधवानी केली आहे.यावर नक्की उपाय काढून मूर्तिकार बांधवां सोबत मी आणि शिवसेना पक्ष सदैव आपल्या सोबत असल्याचा ठाम विश्वास या बैठकीत नामदार हेमंत पाटील यांनी व्यक्त केला.

CMYK

# लातूर जिल्हा

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## सरकारचा विकासाभिमुख अर्थसंकल्प : आ. अभिमन्यू पवार

**तभा वृत्तसेवा**
**औसा, दि.१२ मार्च -**

कर्तव्यदक्ष मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील विकासाभिमुख सरकारचा हा विकासाभिमुख अर्थसंकल्प आहे.

अर्थमंत्री अजित पवार यांनी कोकणातील उल्हास आणि वैतरणा नद्यांच्या खोऱ्यातून ५४.७० टीएमसी पाणी गोदावरी खोऱ्यात वळविण्याचा प्रकल्प हाती घेण्यात आला असल्याची घोषणा अर्थसंकल्पात केली आहे.



या प्रकल्पामुळे मराठवाड्यातील सुमारे २ लाख ४० हजार हेक्टर कृषी क्षेत्राच्या सिंचनासाठी पाणी उपलब्ध होणार आहे. राज्यात शेत आणि पाणंद रस्ते निर्मितीसाठी एका चांगल्या योजनेची नितांत गरज होती. १६ जानेवारी रोजी महसूल मंत्री महोदयांची भेट घेऊन विनंती केलेली बळीराजा शेत, पाणंद रस्ते योजना सुरू करण्याची घोषणा या अर्थसंकल्पात करण्यात आली आहे.

या घोषणेचे सहर्ष स्वागत आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित पवार व महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचे मनःपूर्वक आभार आमदार अभिमन्यू पवार यांनी व्यक्त केले आहेत.



### संक्षिप्त वृत्त...



#### छत्रपती संभाजीराजे प्रतिष्ठानच्या वतीने छत्रपती संभाजी महाराजांना अभिवादन

**उदगीर, दि.१२ मार्च -**

छत्रपती संभाजी महाराज बलिदान दिनानिमित्त धर्मवीर छत्रपती संभाजीराजे प्रतिष्ठान ट्रस्ट उदगीर यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या भव्य दिव्य पुतळ्याशेजारी चौकात धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या प्रतिमेला पुष्प वाहून अभिवादन केले. धर्मवीर छत्रपती संभाजीराजे प्रतिष्ठान ट्रस्ट, उदगीर यावेळी सरपंच तथा सामाजिक कार्यकर्ता सतीश पाटील मानकीकर, सामाजिक कार्यकर्ते बी.जी. शिंदे, शुभम गायकवाड, शुभम बिरादार, अमित पले, गणेश जाधव-पाटील, पवन घोगरे, विठ्ठल घोगरे, शिवम बावगे, श्रेयस सूर्यवंशी, अजय शिंदे, व्यंकटेश शिंदे, मयुरी शिंदे यांनीही धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या प्रतिमेला पुष्प वाहून अभिवादन केले.



#### जागतिक महिला दिनानिमित्त कर्करोग जनजागृती रॅली

**उदगीर, दि.१२ मार्च -**

जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून रोटरी क्लब ऑफ उदगीर सेंट्रलच्या वतीने उदगीर शहरातून कर्करोग जनजागृती रॅली काढण्यात आली. या रॅलीमध्ये शहरातील विविध संस्था व सामाजिक संघटनाच्या महिलांनी सहभाग नोंदविला. उदगीर शहरातील हुतात्मा स्मारकापासून ही रॅली सुरु करण्यात आली. हुतात्मा स्मारक, छत्रपती शिवाजी महाराज चौक, छत्रपती शाहू महाराज चौक ते माहेर हॉस्पिटल बस स्टॅन्ड समोर अशी रॅली काढण्यात आली. रोटरी क्लबच्या अध्यक्षा सरस्वती चौधरी यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून या रॅलीला सुरुवात करण्यात आली. यावेळी रोटरी क्लबच्या अध्यक्षा सरस्वती चौधरी, सचिव ज्योती चौधरी, विद्या पांढरे, सुनीता मदनूरे, प्रा. मंगला विश्वनाथे, डॉ. सुलोचना येरोळकर, मातृभूमीच्या प्राचार्या उषा कुलकर्णी, मानसी चन्नावार, पल्लवी मुक्कावार, प्रिया नारखेडे, स्वाती गुरुडे, रोहिणी चाटे, तुलसी देशमुख, राणी वैजापुरे, डॉ. प्राजक्ता गुरुडे, अरुणा लेंडाणे यांच्यासह महिला व युवतींची मोठी उपस्थिती होती.



#### शास्त्री विद्यालयाची आपत्ती व्यवस्थापन क्षेत्रभेट

**उदगीर, दि.१२ मार्च -**

लाल बहादूर शास्त्री माध्यमिक विद्यालयातील इयत्ता आठवी मधील विद्यार्थ्यांनी आपत्ती व्यवस्थापनसंदर्भात अग्निशमन दल उदगीर या ठिकाणी क्षेत्रभेट दिली. विद्यार्थ्यांना तेथील कार्यप्रणालीची तसेच साहित्यांच्या हाताळणीबाबत माहिती देण्यात आली. या उपक्रमासाठी विद्यालयाचे मा. मुख्याध्यापक बालासाहेब केंद्रे, पर्यवेक्षक किरण नेमट यांच्या मार्गदर्शनानुसार क्रीडाशिक्षक संतोष कोले यांच्या पुढाकारातून क्षेत्रभेट संपन्न झाली. या उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी कलाशिक्षक गुरुदत्त महामुनी, विद्यालयातील कर्मचारी झुंमुबाई डांगे यांचे चिरंजीव शिवशंकर रावळे तसेच अग्निशामन विभागाचे अधिकारी राजकुमार चामले तसेच तेथील कर्मचारी यांनी सदर कार्यप्रणालीची, यंत्रणेची प्रात्यक्षिके करून सखोल माहिती तसेच साहित्य हाताळणीसाठी विद्यार्थ्यांना प्रोत्साहित केले.

# बेलकुंड येथील २४८ हेक्टर जमिन औद्योगिक क्षेत्र घोषित

**अधिसुचना निर्गमित... आ. आभिमन्यू पवारांच्या पाठपुराव्याला यश...**

**तभा वृत्तसेवा**
**औसा, दि.१२ मार्च -**

राज्याच्या उद्योग विभागाने महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात राज्यपाल यांच्या आदेशाने मंगळवार दि.११ मार्च रोजी अधिसूचना प्रसारित करून बेलकुंड व चिंचोली सोन येथील २४८ हेक्टर क्षेत्राला औद्योगिक क्षेत्र म्हणून घोषित केले आहे. या अधिसूचनेसह बेलकुंड-चिंचोली सोन एमआयडीसी अस्तित्वात आली असून आ. अभिमन्यू पवार यांच्या पाठपुराव्याला यश आले आहे.

औसा तालुक्यातील बेलकुंड-सोन चिंचोली येथे मंजूर करण्यात आलेल्या एमआयडीसी साठीची भूसंपादन प्रक्रिया लवकरच सुरू होणार आहे. २४८ हेक्टर क्षेत्रावर औद्योगिक वसाहत स्थापित करण्यास याअगोदर मंजुरी देण्यात आली आहे.

तर मंगळवारी राज्य सरकारने बेलकुंड व चिंचोली सोन येथील २४८ हेक्टर क्षेत्राला औद्योगिक क्षेत्र म्हणून घोषित केले आहे. या नव्या एमआयडीसीच्या उभारणीमुळे या भागाचा औद्योगिक व आर्थिक विकास होणार असून उद्योगातून रोजगार निर्मिती होण्यास मदत मिळणार आहे.

औसा येथे अतिरिक्त औद्योगिक वसाहतीच्या निर्मिती सह आवश्यक मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासह अनेक विषयावर विधिमंडळात विशेष

**औशाचे अर्थकारण बदलणार : आ. पवार**

लवकरच भूसंपादनाला सुरुवात होईल, त्यानंतर निधी उपलब्ध करून घेऊन आवश्यक पायाभूत सुविधांची उभारणी करुन याचबरोबर एखादा मोठा निर्मिती उद्योग बेलकुंड-चिंचोली सोन एमआयडीसीत आणून हजारो तरुणांच्या हाताला काम मिळवून देण्याचे नियोजन आहे. यासोबतच औसा तालुक्यातील तरुण उद्योजकांना या एमआयडीसीमुळे उद्योगांसाठी जागा सुद्धा उपलब्ध होणार आहे. बेलकुंड-चिंचोली सोन एमआयडीसीच्या माध्यमातून औसा मतदारसंघाचे अर्थकारण पूर्णतः बदलणार आहे, असा विश्वास आ. आमदार अभिमन्यू पवार यांनी यावेळी व्यक्त केला आहे.



लक्षवेधी करताना आमदार अभिमन्यू पवारांनी सरकारचे लक्ष वेधले. १८ डिसेंबर २०२३ रोजी उद्योग मंत्री उदय सामंत यांच्या अध्यक्षतेखाली उच्च स्तरीय बैठक घेण्यात आली होती.यानंतर एमआयडीसी मंजुरीच्या दृष्टीने महत्त्वपुर्ण घडामोडी घडल्या आहेत.

औसा एमआयडीसीत जागा उपलब्ध नसल्याने अतिरिक्त एमआयडीसी निर्माण करण्यासाठी औसा तालुक्यातील बेलकुंड सोन चिंचोली भागात जमीन उपलब्ध होत असल्याने आमदार अभिमन्यू पवार यांच्या प्रयत्नातून बेलकुंड येथील खाजगी १७९.०६८६ हें. आर. व सरकारी ०.१८. हे. आर, तर सोन चिंचोली येथील खाजगी ६८.५२ हे. आर असे एकूण २४७.७६८६ हे.आर. क्षेत्र या एमआयडीसी करिता स्थापित करण्यास मंजुरी देण्यात आली.

यानंतर राज्याच्या उद्योग विभागाने महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात राज्यपाल यांच्या आदेशाने दि.११ मार्च रोजी अधिसूचना प्रसारित करून बेलकुंड व चिंचोली सोन येथील २४८ हेक्टर क्षेत्राला औद्योगिक क्षेत्र म्हणून घोषित केले आहे.

या अधिसूचनेमुळे बेलकुंड-चिंचोली सोन एमआयडीसी अस्तित्वात आली आहे. ग्रामीण भागात विशेषतः त्या भागात उद्योग निर्मिती करून रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहे.

## वडिलांच्या मदतीसाठी मुली वळल्या शेतीकडे...
# निलंग्यातील मुलींनी घेतले कोथिंबीरचे पिक



**तभा वृत्तसेवा**
**निलंगा, दि.१२ मार्च -**

निसर्गाच्या लहरीपणामुळे व येणाऱ्या अडचणींमुळे आज शेती करणे अवघड झाले असताना निलंगा तालुक्यातील निटुर जवळील माचरटवाडी शिवारातील शेतकरी सुग्रीव श्रीरंग पवार या शेतकऱ्यांच्या मुली शेती कामाकडे वळल्या. त्यांनी आपल्या वडिलांना शेतीच्या कामात मदत करत एक एकर मध्ये कोथिंबीरीचे पिक घेतले आहे.

आज प्रत्येक क्षेत्रात महिला पुरूषांच्या बरोबरीने काम करत असताना शेतातही पुरूषांच्या बरोबरीने महिलाही काम करताना दिसत आहेत. आपल्या वडीलांची परिस्थिती हालाखीची असल्याचे पाहून आपणही वडीलांना मदत करावी. या हेतूने १२ वी पर्यंत चे शिक्षण घेऊन घरी बसलेली अंकीता सुग्रीव पवार, निकिता सुग्रीव पवार व सरस्वती पवार या तीन विद्यार्थीनींनी एक एकर मध्ये कोथिंबीर पेरणी केली आहे. या तीन मुलींनी कोथिंबीर पिकाची खुरपणी, फवारणी करत रेन पाईपाच्या सहाय्याने पाणी देतात. वीज भारनियमन असताना रात्रीच्या वेळी लाईट आल्यानंतर या मुली शेतात जाऊन स्वत पाणी देतात.

अतिशय संघर्षातुन या मुलीनी कोथिंबीरचे पिक घेतले आहे. तसेच निटुर परिसरातुन या मुलींच्या कामाचे कौतुक केले जात आहे.

## महिलांनी निर्भयतेने जगावे; आपल्या हक्कांसाठी आवाज उठवावा : गोडबोले



**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि.१२ मार्च -**

महिला दिनाच्या औचित्याने महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयात सहाय्यक पोलीस निरीक्षक सोनाली शेषराव गोडबोले-पाटील यांचे प्रेरणादायी व्याख्यान आयोजित करण्यात आले. आपल्या व्याख्यानात त्यांनी महिलांनी निर्भय होऊन जीवन जगावे, अत्याचारांविरुद्ध लढावे आणि आपल्या हक्कांसाठी आवाज उठवावा यावर भर दिला. तसेच, महिलांच्या सुरक्षेसाठी सर्वांनी एकत्र येऊन कार्य करण्याची आवश्यकता असल्याचे त्यांनी प्रतिपादन केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीच्या उपाध्यक्षा डॉ. रेखा रमण रेड्डी या होत्या. आपल्या अध्यक्षीय समारोपात बोलताना त्यांनी महिलांचे सामाजिक-आर्थिक सक्षमीकरण करण्यासाठी शिक्षण हे एक प्रभावी साधन असल्याचे सांगितले. स्त्री शिक्षित झाल्यास संपूर्ण कुटुंब सक्षम होते आणि कामाच्या समान संधी उपलब्ध करून महिलांना आर्थिक सशक्तता मिळू शकते, असे त्यांनी नमूद केले. या कार्यक्रमास महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचे सचिव रामचंद्र तिरुके, सहसचिव ॲड.एस.टी. पाटील चिघळीकर, सदस्य प्रशांत पेन्सलवार, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.आर.के. मस्के, उपप्राचार्य डॉ.एस.जी. पाटील, प्रा.डॉ. मल्लेश झुंगास्वामी हे उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. शिवनंदा रोडगे यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्रा. पुजा जाजू यांनी केले.

## महाराष्ट्र कॉलेज ऑफ फार्मसी येथे जागतिक महिला दिन साजरा

**तभा वृत्तसेवा**
**निलंगा, दि.१२ मार्च -**

महाराष्ट्र कॉलेज ऑफ फार्मसी निलंगा येथे दि.११ मार्च रोजी जागतिक महिला दिन संस्थेचे अध्यक्ष विजय शिवाजीराव पाटील निलंगेकर यांच्या मार्गदर्शनाखाली व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस.एस. पाटील यांच्या अध्यक्षतेखाली साजरा करण्यात आला.

याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून निलंगा येथील पोलिस उपअधीक्षक राजश्री तेरणी पाटील व सुप्रसिद्ध स्त्रीरोग तज्ञ डॉ. रोहिणी दवणे उपस्थित होत्या. कार्यक्रमाची सुरुवात राजमाता जिजामाता यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण व दीपप्रज्वलन करून करण्यात आली.

प्रास्ताविकामध्ये प्राचार्य डॉ.एस.एस. पाटील यांनी महाविद्यालयातील महिला विद्यार्थी व कर्मचारी यांच्या सुरक्षतेविषयक व महिला सशक्तिकरण व तसेच औषध निर्माणशास्त्रात महाविद्यालयातील महिला विद्यार्थ्यांच्या योगदान याबद्दल महत्वपूर्ण दृष्टीने प्रशंसा केली.

कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या राजश्री पाटील यांनी विद्यार्थ्यांना स्वतःच्या जीवनातला खडतर प्रवास करुन साधारण विद्यार्थी ते पोलीस उपअधीक्षक पर्यंतचा प्रवास महिला व विद्यार्थ्यांनी समोर व्यक्त केला. प्रथम तुमचे ध्येय ठरवा आणि त्यावर काम करा.

महिलांसाठी सध्या अनेक करिअर संधी उपलब्ध आहेत जसे की डॉक्टर, अभियंता, शिक्षक, संशोधक व्यावसायिक इत्यादी. व तसेच महाराष्ट्र लोकसेवा आयोग मार्फत घेण्यात येणाऱ्या स्पर्धा परीक्षा याबद्दल सविस्तर असे मार्गदर्शन केले.

कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पाडण्यासाठी प्रा. प्रिती माकने, प्रा. सानुली पौलकर, प्रा. मयुरी गुडले, सुवर्णा मोहिते, आदिती चव्हाण, प्रतीक्षा मोरे, आगलावे गायत्री, पायल पांढरे, वनिता गिरी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

## दैनिक तरुण भारतच्या बातमीने काटेरी झाडे काढण्यास सुरूवात...
# सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांना अखेर आली जाग !

**तभा वृत्तसेवा**
**शिरूर अनंतपाळ, दि.१२ मार्च -**

शिरूर अनंतपाळ तालुक्यातील आरी मोड ते नळेगाव व आरी मोड ते लातूर जाणाऱ्या मुख्य मार्गावर दोन्ही बाजूंनी काटेरी झाडे-झुडपे वाढली होती. त्याचा परिणाम वाहतूकीवर होत होता व त्यामुळे अपघाताची संख्या वाढत चालली होती.

दोन्ही बाजूंनी काटेरी झाडे झुडपे घनदाट वाढली होती. वळणावरील झाडांमुळे समोरच्या वाहणांचा अंदाज न आल्यामुळे अनेक अपघात झाले आहेत यात अनेकांना आपला प्राण गमवावे लागले आहेत.

यापुर्वी सुध्दा तरुण भारत या वृत्तपत्राने याची दखल घेऊन बातमी प्रकाशित केली होती त्यावेळेस प्रशासनाने



बातमीची दखल घेऊन गुत्तेदार मार्फत लागलीच झाडे झुडपे काढण्यास सुरुवात केली होती. परंतु अर्धवट कामास गुत्तेदाराने स्थगिती दिली.

काम अर्धवट सोडल्याने तालुक्यात उलटसुलट चर्चा सुरू झाली होती. त्यामुळे तरुण भारत या वृत्तपत्राने बातमी छापली त्याचाच परिणाम म्हणजे आज राहिलेले अर्धवट काम सुरू झाले आहे.

# आशीव पाटीवर नऊ महिन्यात तिसऱ्यांदा फोडले दुकान; ४ लाख ४७ हजारांचा ऐवज लंपास

**तभा वृत्तसेवा**
**औसा, दि.१२ मार्च -**

औसा तालुक्यातीलआशीव पाटीवरील निसर्ग सोलार ॲण्ड ग्रोटेक सर्हिसेस चे दुकान शनिवार दि.८ रोजी रात्री फोडून दुकानातील ४ लाख ४७ हजार रुपयांच्या कापर वायर, पानबुडी, विद्युत मोटारी, चार्जिंग स्प्रेपंप, इन्वेटर अशा वस्तूची चोरट्यांनी चोरी केली. या प्रकरणी भादा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला असून गेल्या नऊ महिन्यात याच दुकानातील तिसऱ्यांदा आणि एकाच पध्दतीने चोरट्यांनी धाडसी चोरी करून पोलिसांना आव्हान दिले आहे.

राष्ट्रीय महामार्ग ३६१ लगत औसा तालुक्यातील आशीव पाटीवर शरणाप्पा कुंभारे यांचे निसर्ग सोलार ॲण्ड ग्रोटेक सर्हिसेसचे दुकान आहे. या दुकानातील पहिल्या दोन चोरीपैकी कांही वस्तू शोधण्यात भादा पोलिसांना यश आले आहे. तर उर्वरित वस्तूंचा शोध अद्याप सुरु आहे. याच काळात चोरट्यांनी तिसऱ्यांदा ४ लाख ४७ हजारांचे सिंगल फेस कापर वायर, थ्री फेस कापर वायर, ड्रील मशीन, इंजिन फवारे, टिल्लू मोटारी, पानबुडी विद्युत मोटारी, टुल किट, पाने सट, ५ एच पी पानबुडी पंप, चार्जिंग स्प्रे पंप, चर्जिंग बटरी पेटी



अशा साहित्याची चोरी दुकानाच्या शटरचा लाक तोडून शनिवारी बोलोरो नंबर प्लेट नसलेल्या चार चाकीतून पहाटे २ वा. सुमारास केली असल्याचा गावकऱ्यांचा अंदाज आहे.

चोरट्यांनी राष्ट्रीय महामार्गालगत असलेल्या एकाच दुकानात नऊ महिन्यात तिसऱ्यांदा चोरी करुन हटट्रिक केली आहे. तसेच दुकानाचा एकच पत्रा तिसऱ्यांदा उचकावूनही हटट्रिक पुर्ण केली आहे. परंतू पहिल्या दोन चोऱ्या पाहता दुकानदाराने दुकानाची तीन बाजुने मजबुती केली. यामुळे चोरट्यांना पत्रा खोलूनही दुकानात प्रवेश करता आला नाही. यामुळे महामार्गावरील दुकानाच्या शटरचे लाक कुलुप तसेच ठेवून तोडून काढून दुकान फोडून चोरट्यांनी धाडसी चोरी केली. या चोरींतील चोरट्यांचे फोटो सीसीटीव्ही कमेऱ्यात कैद झाले असल्यामुळे तपासात पोलिसांना मदत होणार आहे. केवळ नऊ महिन्यात तिसऱ्यांदा एकाच दुकानात चोरी झाल्यामुळे आशिव गावातील दुकानदारात घबराहटीचे वातावरण दिसून येत आहे.

**पोलिसांच्या अपयशामुळे तिसऱ्यांदा चोरी**

पहिल्या दोन चोऱ्यांतील चोराला पकडून कांही विद्युत मोटारी मिळविण्यात भादा पोलिसांना यश मिळाले आहे. चोरी एकाच दिवशी एकाच वेळेत एकाच दुकानातून होवूनही कमी वस्तू मिळून आल्या. आणि चोराची जामिनावर सुटका झाली. तर चोरीतील उर्वरीत वस्तू शोधण्यात नऊ महिन्यानंतर अपयश आले आहे. यामुळे चोरट्यांनी तिसऱ्या वेळी धाडसाने चोरी केली, असे मत किशोर कुंभारे यांनी व्यक्त केले.

## उदगीर येथे छत्रपती संभाजी महाराज बलिदान दिनानिमित्त अभिवादन

**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि.१२ मार्च -**

स्वराज्याच्या रक्षणार्थ आपल्या प्राणांचे बलिदान देणारे महान योद्धे, स्वराज्याचे दुसरे छत्रपती संभाजी महाराज यांच्या बलिदान दिनानिमित्त पुण्यतिथी दिना निमित्ताने अभिवादन करण्यात आले.



यावेळी उदयभाऊ मुंडकर, मनोन पुदाले, सुनील सावळे, धनाजी मुळे, बिपीन पाटील, बालाजी बिरादार, कणसे, बाबासाहेब पाटील, निवृत्ती तिरकमठे, यशवंत बिरादार, अहमद सरवर, सिद्धेश्वर लांडगे, अभिजित पाटील, दत्ता पाटील, प्रशांत जगताप, अजित शिंदे, राहुल अतनुरे, सतीश पाटील मानकीकर, यशवंत बिरादार, रामदास माळेगाव, नितीन दुरुगकर, वाडकर गुणवंत, विजय बामणीकर, भाऊसाहेब जांभळे, देवानंद बिरादार, दयाराम बिरादार, गोविंद बिरादार, गणेश बिरादार, दीपक पाटील नागलगावकर, बालाजी वेंकोने, सचिन पाटील, हनमंत म्हेत्रे, व्यंकट मगर, रोहिदास मिरखले, परमेश्वर मोरे, तुकाराम मोरे, अवधूत जाधव, अमोल पाटील, बालाजी नादरगे, राहुल बिरादार, अविनाश पुपलवाड, गणेश जाधव, गणेश बिरादार, रवी जवळे, बाबासाहेब सूर्यवंशी, राहुल पाटील, प्रशांत रंगवाड, प्रकाश कुलकर्णी, साईप्रसाद वाघमोडे, पपन घोगरे, गणेश गुडळे, सुधाकर येंकोणे इत्यादी उपस्थित होते.

# बालकांचे शोषण होऊ नये यासाठी बालस्नेही गावे बनवावीत- गोयल

## मिशन सक्षम बालिका, बालविवाह मुक्त हिंगोली कार्यक्रम



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १२ मार्च**

बालकांचे हक्क व अधिकार, बालकांसाठी कार्यरत यंत्रणा, बालविवाह प्रतिबंध अधिनियम २००६, बाल न्याय मुलांची काळजी व संरक्षण अधिनियम २०१५, ग्राम बाल संरक्षण समितीची रचना व भूमिका, अग्रभागी कर्मचारी यांच्या भूमिका आणि जबाबदाऱ्या, बालविवाह निर्मूलन कृती आराखडा, डेटा संकलन व अहवाल सादरीकरण, कम्युनिकेशन कीट इत्यादी विषयांवर प्रशिक्षण देवून गावात बालकांच्या बाबतीत कुठल्याही प्रकारचे शोषणाचे प्रकार होवू नये, कुठलेही बालक त्यांच्या हक्कांपासून वंचित राहणार नाही याची काळजी घ्यावी व बालस्नेही गावे बनवावीत, अशा सूचना जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांनी कार्यशाळेत दिल्या.

जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांच्या संकल्पनेतील मिशन सक्षम बालिका, बालविवाह मुक्त हिंगोली जिल्हा अंतर्गत अग्रभागी कर्मचाऱ्यांची एकदिवशीय कार्यशाळा दिनांक १० मार्च २०२५ रोजी येथील जिल्हाधिकारी कार्यालयाच्या जिल्हा नियोजन समिती सभागृहात जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी ते बोलत होते. या कार्यशाळेला मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, पंचायत विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी केशव गड्डापोल, महिला व बालविकास विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी गणेश वाघ, सहाय्यक जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. फोफसे, जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी राजाभाऊ मगर, बाल कल्याण समिती सदस्य परसराम हेंबाडे, जिल्हा बाल संरक्षण अधिकारी सरस्वती कोरडे, साधन व्यक्ती नंदू जाधव, प्रकल्प अंमलबजवणी प्रमुख बालविवाह निर्मूलन प्रकल्प युनिसेफ एस.बी.सी.३ मुंबई यांची उपस्थिती होती. तसेच वरिष्ठ प्रकल्प समन्वयक बाळू राठोड, बालविवाह निर्मूलन प्रकल्पाच्या प्रकल्प समन्वयक मोनाली धुर्वे, चाईल्ड हेल्पलाईनचे जिल्हा समन्वयक संदिप कोल्हे यांची उपस्थिती होती.

हिंगोली जिल्ह्यात बालविवाह निर्मूलनासाठी महिला व बालविकास विभाग, युनिसेफ, डइउ३ व जिल्हा प्रशासनाच्या माध्यमातून विविध नाविन्य पूर्ण उपक्रम जिल्ह्यात राबविले जात आहे, याच उपक्रमाच्या माध्यमातून हिंगोली जिल्ह्याचे जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांच्या संकल्पनेतून जिल्ह्यातील निवडक ५० हॉटस्पॉट गावांसाठी पंचायत विभाग, महिला व बाल कल्याण विभाग जिल्हा परिषद, शिक्षण विभाग, जिल्हा महिला व बाल विकास विभाग या सर्व विभागाचा बालविवाह निर्मूलन कृती आराखडा तयार करण्यात आला आहे. या कृती आराखड्याची प्रभावी अंमलबजवणी व्हावी या उद्देशाने ग्रामपंचायत अधिकारी, मुख्याध्यापक, अंगणवाडी सेविका यांची बालविवाह निर्मूलन कृती आराखडा अंमलबजावणी करण्यासाठी कार्यशाळा घेण्यात आली.

या कार्यशाळेचे सूत्रसंचालन संदीप कोल्हे यांनी केले तर जिल्हा बाल संरक्षण अधिकारी सरस्वती कोरडे यांनी बालविवाह निर्मुलन बाबत प्रतिज्ञा घेऊन आभार व्यक्त केले. या कार्यशाळेच्या यशस्वीतेसाठी जिल्हा बाल संरक्षण कक्ष, चाईल्ड हेल्प लाईन १०९८ यांनी अथक परिश्रम घेतले.

# बौध्द गया येथील महाविहाराचे व्यवस्थापन बौध्दांच्या ताब्यात द्या

## वंचीत बहुजन आघाडीचे जिल्हा कचेरीसमोर निदर्शने



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १२ मार्च**

सम्राट अशोक यांनी इ. स. पूर्व तिसऱ्या शतकात महाबोधी महाविहाराचे बांधकाम केले होते. जगभरातील बौध्द अनुयायी भिक्खू आणि पर्यटक या स्थळाला भेट देतात मात्र या महाविहाराचे नियंत्रण आणि व्यवस्थापन आजही बौध्दांच्या ताब्यात नाही. महाबोधी विहार बौध्दांच्या ताब्यात देण्यात यावे त्यासाठी महाबोधी विहार व्यवस्थापन कायद्यात बदल करण्यात यावा या मागणीसाठी येथील जिल्हाधिकारी कार्यालयासमोर वंचीत बहुजन आघाडीच्यावतीने आंदोलन करण्यात आले.

निवेदनात नमुद करण्यात आले आहे की, जागतिक वारसा म्हणून मान्यता प्राप्त बौध्द गया येथील महाविहार व्यवस्थापन कायदा तातडीने बदलण्यात यावा, महाबोधी महाविहार हे पवित्र बौध्द धर्मस्थळ असून बौध्दगया महाविहार कायदा १९४९ चा अन्यायकारक कायदा रद्द करावा, बोधगया येथील महाबोधी महाविहाराचे नियंत्रण आंतरराष्ट्रीय बौध्दांसोबत घेऊन बौध्दांच्या ताब्यात द्यावे, जागतिक वारसा अबाधित ठेवण्यासाठी मोठ्या प्रमाणात विशेष विकास निधी आणि सुविधा तत्काळ देण्यात याव्यात या मागण्या यावेळी आंदोलनकांनी केल्या. यासंदर्भात जिल्हाधिकारी यांचेमार्फत महामहीम राष्ट्रपती, केंद्र सरकार यांना निवेदन पाठवण्यात आले आहे.

निवेदनावर जिल्हाध्यक्ष अनिल कांबळे, महासचिव ज्योतीपाल रणवीर यांच्यासह पदाधिकारी तसेच बौध्द समाजातील बांधव, भगिनींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# मराठी पत्रकार संघाच्या तालुकाध्यक्षांची बिनविरोध निवड



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १२ मार्च**

मराठी पत्रकार संघाची बुधवारी तालुकाअध्यक्षाची निवड जाहीर करण्यात आली असून यात कळमनुरी, हिंगोली, वसमत, औंढा सेनगाव येथील पत्रकारांचा समावेश आहे.

येथील जुनी नगरपालिका येथील कार्यालयात जिल्हाध्यक्ष प्रद्युन गिरीकर, कार्याध्यक्ष मदन शेळके यांच्या अध्यक्षतेखाली तर संघटनेचे राज्य सरचिटणीस डॉ. विजय कुमार कुलदीपके यांच्या मार्गदर्शनाखाली बुधवारी (ता.१२) तालुका अध्यक्षा सह, शहर व शहर उपाध्यक्ष जाहीर करण्यात आले . यामध्ये हिंगोली तालुकाध्यक्षपदी श्रीकांत शिंदे तर कळमनुरी तालुकाध्यक्षपदी गोविंद बेंद्रे, औंढा तालुकाध्यपदी अरुण चव्हाण, सेनगाव तालुकाध्यक्षपदी ज्ञानेश्वर कांबळे तर वसमत तालुकाध्यक्षपदी फेरोज पठाण, जिल्हा उपाध्यक्षपदी नारायण काळे, तसेच हिंगोली शहर अध्यक्षपदी विलास जोशी, तर शहर कार्याध्यक्षपदी श्याम शेवाळकर यांची निवड करण्यात आल्याने सर्व नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचा पुष्पहार देऊन सत्कार करण्यात आला.

यावेळी फकीरराव नागरे पाटील, संतोष जैयस्वाल, प्रसिद्धी प्रमुख चंद्रकांत वैद्य, आदीची उपस्थिती होती. दरम्यान लवकरच तालूका अध्यक्ष हे तालुका कार्यकारिणी जाहीर करतील.



**हिंगोली- जिल्ह्यातील सुशिक्षित बेरोजगार उमेदवारांसाठी जिल्हा कौशल्य विकास व रोजगार उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, मॉडेल करिअर सेंटर हिंगोली तसेच स्व देवराव कल्याणकर उच्च माध्यमिक विद्यालय यांच्या संयुक्तविद्यमाने पंडित दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळावा व मुख्यमंत्री युवा प्रशिक्षण योजना भरती मेळाव्याचे आयोजन कळमनुरीत करण्यात आले होते. यावेळी १८९ उमेदवारांची प्राथमिक निवड करण्यात आली. छाया- सुनील पाठक**

## संक्षिप्त वृत्त

### स्मार्ट प्रकल्पांतर्गत अभ्यास दौऱ्याला सुरूवात



हिंगोली- जागतिक बँक अर्थसहाय्यित मा. बाळासाहेब ठाकरे कृषि व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्प अंतर्गत जिल्हा अंमलबजावणी कक्ष स्मार्ट, हिंगोली कार्यालय मार्फत मूल्यसाखळी विकास शाळा २०२४-२५ अंतर्गत ६ समुदाय आधारित संस्थेचे संचालक, सभासद अशा एकूण ३० प्रशिक्षाणार्थीना दि. ११ मार्च ते १७ मार्च २०२५ या कालावधीत ७ दिवस तेलंगणा राज्यामध्ये राज्याबाहेरील प्रशिक्षणासह अभ्यास दौरा आयोजित करण्यात आला आहे. या प्रशिक्षणासह अभ्यास दौरा वाहनाला हिरवी झेंडी दाखवून प्रस्थान करण्यात आले. यावेळी हिरवा झेंडा दाखवताना कृषी उपसंचालक पी. एस. हजारे, जिल्हा अंमलबजावणी कक्षाचे नोडल अधिकारी जी. बी. बंटेवाड, पुरवठा व मूल्यसाखळी तज्ञ जी. एच. कच्छवे व कार्यालयातील अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते. हा अभ्यास दौरा निजामाबाद येथील हळद प्रक्रिया युनिट, रुद्रुर येथील केव्हीके, कमरापल्ली हळद संशोधन केंद्र, अरमुर व स्मार्ट फुड पार्क, हैद्राबाद या ठिकाणी आयोजित केला आहे.

### बेवारस वाहनांची लिलावाद्वारे विक्री

हिंगोली- वसमत शहर पोलीस स्टेशन येथे अभिलेखावर नसलेल्या परंतु पोलीस स्टेशन परिसरात पडून असलेल्या बेवारस वाहनाची उपप्रादेशिक परिवहन कार्यालय हिंगोली यांच्यामार्फत तपासणी केली असता सदरची वाहने खूप वर्षापासून पोलीस स्टेशनला पडून असल्याने त्यांचे नंबर प्लेट चेसीस क्रमांक, इंजिन क्रमांक स्पष्ट दिसत नाही व खोडलेले असल्याने त्याचा मूळ मालक कोण आहे हे कळू शकले नाही. त्यामुळे पोलीस स्टेशन परिसरात १०७ दूचाकी वाहने पडून आहेत. वरील वाहनांबाबत आजपर्यंत कोणीही मालकी हक्क किंवा त्यासंबंधी दस्तावेज सादर करुन मागणी केलेली नाही. त्यामुळे नजीकच्या काळात या बेवारस वाहनाची लिलावाद्वारे विक्री करण्यात येणार असल्याची माहिती पोलीस निरीक्षक , पोलीस स्टेशन वसमत शहर यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे दिली आहे.

### आंबा प्रजातीचे १५ टन लाकडे जप्त

हिंगोली- येथील वनविभागाच्या कारवाईत हिंगोली ते वाशिम रस्त्यावर वाहन क्रमांक एमएच ४८ जे ०८०५ मध्ये आंबा प्रजातीचे १५ टन लाकूड विनापरवाना तोड करून वाहतुक करीत असतांना पकडण्यात आले. गस्तीवर असलेल्या पथकाने वाहनासह लाकूड विभागीय वनाधिकारी कार्यालयात जप्त केले आहे. सदरील कारवाई विभागीय वनाधिकारी डॉ राजेंद्र नाळे, स. वनसंरक्षक सचिन माने, वनपरिक्षेत्र अधिकारी मिनाक्षी पवार यांनी केली आहे.

# आरबीएसके कार्यक्रमांतर्गत विशेष तपासणी मोहीम सुरू

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १२ मार्च**

आरबीएसके २.० कार्यक्रमांतर्गत हिंगोली तालुक्यात दि. १ मार्च पासून अंगणवाडीतील बालकांची विशेष तपासणी मोहीम सुरु केली आहे.

हिंगोली तालुक्यात ४ पथके कार्यरत असून या पथकामार्फत विशेष तपासणी मोहीम घेण्यात येत आहे.

दि. १२ मार्च, २०२५ रोजी वंजारवाडा, गवळीपुरा, नरसी, भिंगी येथील अंगणवाडी मध्ये बालकांची तपासणी करण्यात आली. दि. १३ मार्च रोजी संदर्भसेवा शिबीर, राजूरा, लासिना येथे, दि. १५ मार्च रोजी मस्तानशाह, भोईपुरा, करंजाळा तांडा, घोटा, नवखा येथील अंगणवाडी, दि. १७ मार्च रोजी मस्तानशाह, कमलानगर, आडगाव, सरकळी येथील अंगणवाडी, १८ मार्च रोजी मस्तानशाह, भोईपूरा, नरसी, एकंबा येथे, दि. १९ मार्च रोजी सिध्दार्थनगर, डिग्रस, लोहगाव येथे, दि. २० मार्च रोजी महादेववाडी, जुना औंढा नाका, माळसेलू, लोहगाव येथे, दि. २१ मार्च रोजी संदर्भसेवा शिबीर, गिलोरी येथे, दि. २२ मार्च रोजी पोळा मारोती, सावरकर नगर, बोराळवाडी, भिंगी येथे, दि. २४ मार्च रोजी गवळीपुरा, शिवराज नगर, डिग्रस (क), हनवंतखेडा, जांभळून तांडा येथे, दि. २५ मार्च रोजी मस्तानशाह, खाजा कॉलनी, कडती, हिंगणी (मिनी), हिंगणी येथे, दि. २६ मार्च रोजी तालाबकट्टा, मोची गल्ली, बळसोंड व अनुपस्थित बालकांची तपासणी, दि. २७ मार्च रोजी पेन्शनपुरा व अनुपस्थित बालकांची तपासणी, दि. २८ मार्च रोजी संदर्भ सेवा शिबीर व अनुपस्थित बालकांची तपासणी आणि दि. २९ मार्च रोजी बावनखेली व अनुपस्थित बालकांची तपासणी करण्यात येणार आहे, अशी माहिती जिल्हा रुग्णालयातील आरबीएसकेचे तालुका नोडल वैद्यकीय अधिकारी यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे दिली आहे.

# विभागीय वनाधिकारी डॉ. राजेंद्र नाळे यांना उत्कृष्ट सेवेबद्दल रजत पदक






**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १२ मार्चे**

येथील विभागीय वनाधिकारी डॉ राजेंद्र नाळे यांना वनसेवेत वन आणि वन्यजीव संरक्षण क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल रजत पदक देऊन गौरविण्यात आले आहे. तसेच वनपाल शिवरामकृष्ण चव्हाण यांनाही रजत पदक मिळाले आहे.

महसूल व वनविभागाच्यावतीने वनसंपत्तीचे संरक्षण व संवर्धनाचे काम प्रभावीपणे करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना राज्य स्तरावरून पुरस्कार देण्यात येतात. वनविभागाच्या अधिपत्याखाली कार्यरत अधिकारी, कर्मचारी यांनी वन संरक्षणार्थ, वन्यजीव संरक्षणार्थ, शोधकार्य, वन व्यवस्थापन, नाविन्यपूर्ण शोध याबद्दल दरवर्षी सुवर्ण व रजत पदक बहाल करून गौरविण्यत येते. यासाठी राज्यस्तरीय समिती गठीत करण्यात आली होती. राज्यस्तरीय पदक निवड समितीने दि २९ नोव्हेंबर २०२४ रोजी बैठक घेतली. या बैठकीत राज्यातील उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांची निवड करण्यात आली. या निवडीमध्ये हिंगोली येथील विभागीय वनाधिकारी डॉ राजेंद्र नाळे आणि वनपाल शिवरामकृष्ण चव्हाण यांची रजत पदकासाठी निवड झाली. त्यांच्या निवडीबद्दल वन विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

# घरकुलांसाठी पैशाची मागणी करीत असल्याचा लाभार्थ्यांचा आरोप



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १२ मार्च**

सेनगाव पंचायत समितीमध्ये घरकुल विभागातील अभियंता, कारकून पैसे घेतल्याशिवाय घरकुलाची फाईल काढीत नाही असा थेट आरोप सरपंचांनी गटविकास अधिकारी यांचेसमोर केला. यावेळी माजी जि प उपाध्यक्ष अनिल पतंगे यांच्यासह उपस्थित पदाधिकाऱ्यांनी अभियंत्यासह कारकूनाला धारेवर धरीत प्रश्न विचारले असता दोघेही निरूत्तर झाले.

सेनगाव पंचायत समिती नेहमीच वादाच्या भोवऱ्यात आहे. येथील पंचायत समितीअंतर्गत घरकुल मंजुरीसाठी लाभार्थ्यांना चकरा माराव्या लागतात. अभियंता तसेच संबंधीत कारकून लाभार्थ्यांची फाईल पैसे घेतल्याशिवाय काढीत नसल्याचा आरोप यावेळी लाभार्थ्यांनी केला. येथील पंचायत समितीसमोर दि १२ मार्च रोजी माजी जि प उपाध्यक्ष अनिल पतंगे यांच्या नेतृत्वात आंदोलन करण्यात आले. या आंदोलनाची दखल घेत गटविकास अधिकारी कोकाटे आंदोलनस्थळी दाखल झाले. यावेळी संबंधीत अभियंता आणि कारकून यांनाही पाचारण करण्यात आले. यावेळी काही गावांचे सरपंचासह लाभार्थी देखील उपस्थित होते. यावेळी अभियंता कार्यालयात उपस्थित नसतो, पैसे घेतल्याशिवाय घरकुलाची फाईल काढल्या जात नाही आदी आरोप गटविकास अधिकारी कोकाटे यांचेसमोरच लाभार्थ्यांनी केले. त्यामुळे पुन्हा एकदा सेनगाव पंचायत समितीचा गैरकारभार उघडकीस आला आहे. संबंधीतांवर योग्य ती कार्यवाही करून पात्र लाभार्थ्यांना तत्काळ घरकुल मंजूर करावे अशी मागणी अनिल पतंगे यांनी केली.

# औंढ्यात भाजपची आढावा बैठक



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १२ मार्च**

भारतीय जनता पार्टी औंढा नागनाथ तालुका संघटन पर्व सदस्य नोंदणी अभियान व सक्रिय सदस्य नोंदणी अभियान यासंदर्भात १२ मार्च बुधवार रोजी सकाळी ११ वाजता शासकीय विश्रामगृहात आढावा बैठक घेण्यात आली.

याप्रसंगी भाजपा हिंगोली जिल्हा निवडणूक प्रभारी तथा माजी जिल्हाध्यक्ष सुभाषराव कदम यांनी या बैठकीला मार्गदर्शन करून सूचना दिल्या व सखोल मार्गदर्शन केले. या आढावा बैठकीस भाजपा हिंगोली जिल्हा निवडणूक प्रभारी सुभाषराव कदम, भाजपचे जिल्हाध्यक्ष फुलाजीराव शिंदे, किसान मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष सुरजितसिह ठाकुर, जिल्हा सरचिटणीस उमेश नागरे, नगरसेवक गणेश पाटील, तालुकाध्यक्ष सखाराम इंगळे, अँड गणेश ठाकूर, मंचकराव कदम, डिगांबर गीरी, संतोष देशमुख, राजू लोंढे विजय पडोळे, लष्कर जाधव, अंगद गारकर, सोपान कदम, माऊली जाधव यांच्यासह भारतीय जनता पार्टी औंढा नागनाथ तालुक्यातील सर्व बुथ प्रमुख, शक्ती केंद्रप्रमुख, सुपर वॉरियस व सर्व आघाड्याचे प्रमुख, तालुका पदाधिकारी उपस्थित होते. आढावा बैठकीचे प्रस्तावना सखाराम इंगळे सूत्रसंचालन गणेश पाटील तर आभार डिगांबर गीरी यांनी मानले.

# प.पु.माधवानंद महाराजांच्या हस्ते दत्तधामच्या दत्तमंदिराचा कलशारोहन





**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१२ मार्च**

शहरातील दत्तधाम येथील नव्याने उभारण्यात आलेल्या श्रीदत्त मंदिराच्या शिखराचे बांधकाम अवघ्या दोन महिन्यात पूर्ण झाले. दि.२६ डिसेंबर २४ रोजी श्रीदत्त मूर्तीची प्राणप्रतिष्ठा मोठ्या उत्साहात पार पडली होती त्याच वेळी या भागातील भाविकांनी एकत्र येऊन शिखराचे कामही पूर्ण करून घेतले. दि.९ फेब्रुवारी २५ रोजी प.पु. माधवानंद महाराजांच्या शुभहस्ते कलशारोहन करण्यात आले.

दत्तधाम येथील श्री दत्त मंदिराचे काम गेल्या वर्षभरापासून सुरू होते हे काम डिसेंबरच्या पहिल्या आठवड्यात पूर्ण झाल्यानंतर २६ डिसेंबर रोजी या मंदिरात अत्यंत सुंदर आणि आकर्षक अशा श्री दत्त मूर्तीची प्राणप्रतिष्ठा करण्यात आली. याच कार्यक्रमात मंदिराच्या शिखराचे कामही लवकरच पूर्ण करण्याचा माणस भाविकांनी बोलून दाखवला होता. त्यानुसार शिखराचे बांधकाम देखील पूर्ण करण्यात आले. या मंदिराच्या शिखराचे हे वैशिष्ट्य आहे की, या मंदिराच्या शिखरावर बीड जिल्ह्यातील वैकुंठवासी संतांच्या मूर्ती बसवण्यात आल्या आहेत. बांधकाम सुरू असतानाच उमरखेड संस्थानचे मठाधिपती गुरू माधवानंद महाराज दत्तदर्शनासाठी मंदिरात आले होते. त्याचवेळी मी बीडमध्ये आहे तोपर्यंत शिखराचे काम पूर्ण करा मी स्वतः येतो असा शब्द दिला होता. त्यानुसार या भागातील भाविकांनी लगेच नियोजन करून दि.९ फेब्रुवारी रोजी कलशारोहन कार्यक्रमाचे आयोजन केले होते. प.पु.माधवानंद महाराज यांच्या शुभहस्ते कलशारोहन करून महाप्रसादाचे आयोजन देखील करण्यात आले. कंत्राटदार अतुल संघांनी यांनी महाप्रसाद ठेवला होता तर या कार्यक्रमाचे पौरोहित्य संतोष रत्नपारखी आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी केले. सतीश कुलकर्णी, विलास रत्नपारखी, योगेश खडके, गोपाळ पाठक या यजमानाच्या हस्ते विधिवत पूजन करण्यात आली. यावेळी भाविकांना बसण्यासाठी पेव्हरब्लॉक बसवण्याचे काम करण्याचा संकल्प करण्यात आला तेव्हा शहरातील प्रसिद्ध व्यापारी सत्यनारायण लाहोटी यांनी लगेच ५ ब्रास तर जयंत पत्की यांनी २ ब्रास पेव्हरब्लॉक दिले त्याचेही काम पूर्ण करण्यात आले असून भाविकांच्या सोयी सुविधांसाठी मंदिराचे विश्वस्त प्रयत्न करत आहेत. कमी कालावधीत प्रसिद्ध झालेल्या या मंदिरात दिवसेंदिवस भाविकांची गर्दी वाढत असून दर गुरुवारी आणि पौर्णिमेला सकाळी अभिषेक आरती आणि सायंकाळी ७ वाजता सामुदायिक आरतीची परंपरा येथे सुरू करण्यात आली आहे. विशेष म्हणजे सायंकाळी आरती नंतर खिचडी हा प्रसाद देखील याठिकाणी सुरू केला आहे. या कार्यक्रमाला भाविक भक्तांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## पांगरीत ग्रामदरबार संपन्न; शासकीय योजनांची माहिती आणि समस्यांचे निराकरण

### गटविकास अधिकारी, आरोग्य अधिकारी आणि ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा**
**धारूर दि.१२ मार्च**

पांगरी ग्रामपंचायत कार्यालयात नुकताच ग्रामदरबार आयोजित करण्यात आला. या ग्रामदरबारामध्ये पंचायत समितीचे गटविकास अधिकारी लोखंडे यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते. ग्रामस्थांनी शासकीय योजनांची माहिती जाणून घेतली आणि आपल्या समस्या मांडल्या.

ग्रामदरबारामध्ये पंचायत समितीचे सहाय्यक गटविकास अधिकारी कांदे, पंचायत समिती विस्तार अधिकारी राऊत, आरोग्य विभागाचे डॉ.लोमटे, माने आणि पालेकर, विस्तार अधिकारी कृषी, पशुसंवर्धन विकास अधिकारी डॉ. राधिका वराडे मॅडम, महिला बालकल्याण कुलकर्णी यांनी ग्रामस्थांना मार्गदर्शन केले.

ग्रामपंचायत उपसरपंच श्री. श्याम थोरात, किशोर थोरात, सचिन थोरात, अमोल थोरात आणि सम्राट थोरात यांच्यासह ग्रामपंचायत सदस्य आणि महिलांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला.



कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ग्रामपंचायत अधिकारी दळवे जी.एम. यांनी केले. उपसरपंच श्याम थोरात यांनी उपस्थितांचे आभार मानले.

ग्रामदरबारामध्ये आरोग्य, कृषी, पशुसंवर्धन, महिला बालकल्याण आणि इतर शासकीय योजनांची माहिती देण्यात आली. ग्रामस्थांनी आपल्या समस्या अधिकाऱ्यांसमोर मांडल्या, ज्यांचे योग्य निराकरण करण्याचे आश्वासन अधिकाऱ्यांनी दिले.गटविकास अधिकारी लोखंडे यांनी ग्रामस्थांना शासकीय योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन केले. त्यांनी सांगितले की, ग्रामस्थांनी शासकीय योजनांची माहिती घेऊन त्यांचा लाभ घ्यावा. शासनाच्या विविध योजना ग्रामस्थांच्या विकासासाठी आहेत.

या ग्रामदरबारामुळे ग्रामस्थांना शासकीय योजनांची माहिती मिळाली आणि त्यांच्या समस्यांचे निराकरण झाले, अशी प्रतिक्रिया उपस्थितांनी व्यक्त केली.

## सन पेस इंटरनॅशनल स्कूलचे चे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.१२ मार्च**

तालुक्यातील गंगामसला येथील सन पेस इंटरनॅशनल स्कूलचे वार्षिक स्नेहसंमेलन दि. ११ मार्च रोजी मोठ्या उत्साहात संपन्न झाले. यावेळी चिमुकल्यांनी मराठी, हिंदी गीतावर बहारदार नृत्य सादर करत विविध कलागुणांचे प्रदर्शन केले.

स्नेह संमेलनाचे अध्यक्ष गटशिक्षणाधिकारी रविंद्र महामुनी होते. यावेळी गंगामसलाचे सरपंच भालचंद्र सोळंके,गुंजथडीचे सरपंच समीर यादव, शुक्लतीर्थ निमगावचे सरपंच कृष्णा थावरे, छोटे वाडीचे सरपंच अंगद कटके,संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मण पोटभरे, सचिव लक्ष्मीकांत सोळंके यांची प्रमुख उपस्थिती होती.



प्रारंभी कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना लक्ष्मण पोटभरे म्हणाले की, विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होण्यासाठी व विद्यार्थी परिपूर्ण जीवन कसा जगेन यासाठी सनपेस इंटरनॅशनल स्कूल प्रयत्न करणार आहे. तसेच ज्या सुविधा शहरात मिळतात त्याच सुविधा गंगामसला या ठिकाणी देण्यासाठी संस्था कटिबद्ध आहे.

अध्यक्षीय समारोप करताना गटशिक्षण अधिकारी रवींद्र महामुनी म्हणाले की , मुलांना इंग्रजी माध्यमाबरोबरच मराठी भाषेचेही ज्ञान अवगत झाले पाहिजे त्यासाठी शाळांनी प्रयत्न करावेत. गुणवत्तापूर्व शिक्षणामुळे या शाळेचे भविष्य उज्वल दिसून येते आहे. यावेळी गंगामसल्याचे सरपंच भालचंद्र सोळंके व संस्थेचे सचिव लक्ष्मीकांत सोळंके यांनी मनोगत व्यक्त केले.स्नेहसंमेलनामध्ये बाल कलाकारांनी लावणी,बॉलिवूड तसेच देशभक्तीपर गीतावर बहारदार नृत्य तसेच विविष कला सादर करून कलाविष्कार दाखवीला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अशोक डोंगरे व कल्पना सोळंके यांनी केले तर गणेश सोळंके यांनीआभार मानले.यावेळी विद्यार्थी ,पालक,शाळेचे शिक्षक वृंद पालक उपस्थित होते.

## श्रीक्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे गुरूवारी सुरेशानंदजी महाराज शास्त्री यांचे कीर्तन

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१२ मार्च**

विसाव्या शतकातील महान संत .किसनबाबा यांच्या २७ व्या वर्षातील सातव्या पुण्यतिथी फाल्गुन शुद्ध पौर्णिमे निमित्त श्रीक्षेत्र गोरक्षनाथ टेकडी ता.जि.बीड येथे ह.भ.प. महंत गुरूवर्य सुरेशानंदजी महाराज शास्त्री श्रीक्षेत्र श्रृंगऋषी गड यांचे गुरुवार दिनांक १३ मार्च २०२५ रोजी दुपारी १२ ते २ या वेळेत कीर्तन होणार आहे. तरी या किर्तनाचा व महाप्रसादाचा या परिसरातील भाविक भक्तांनी लाभ घ्यावा असे आवाहन श्रीक्षेत्र गोरक्षनाथ टेकडीचे गुरूवर्य शांतीब्रह्म ह.भ.प.नवनाथ महाराज यांची नम्रविनंती व समस्त गावकरी मंडळी ढेकणमोह ता. जि.बीड यांच्याकडून महाप्रसादाचे आयोजन केले आहे. तसेच बाबांचा पालखी सोहळा सकाळी आठ वाजता सुरू होईल व गोरक्षनाथ टेकडी येथे गर्भाद्री पर्वत प्रदक्षिणामध्ये सकाळी ९ ते १० यावेळेत सहभागी होता येईल.







(छाया-कृष्णा शिंदे,बीड)

बीड : धुलिवंदन हा सण जवळ आला आहे. त्यानुषंगाने सध्या बीडच्या सुभाष रोड, भाजीमंडई, धोंडीपुरा, सिध्दीविनायक कॉम्प्लेक्स या ठिकाणी वेगवेगळे रंग, पिचकारी विक्रीसाठी आले आहेत.

## जिल्ह्यातील शाळा दुपारच्या सत्रात बेकादेशीर रितीने बंद

### गावकऱ्यांनो पंचनामे करा-ॲड.अजित देशमुख

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१२ मार्च**



बीड जिल्हा वेगवेगळ्या कामासाठी सातत्याने गाजत असतो. प्रशासन चांगले चाललेले आहे, हे फक्त कागदावर दाखवण्यात काही अधिकारी लक्ष घालतात. मात्र प्रत्यक्षात आपल्या खाली किती अंधार आहे ? हे पाहिले जात नाही. जिल्ह्यातील अनेक शाळा दुपारच्या सत्रात एक मार्च २०२५ पासून बंद असतानाही कुठलीही कारवाई होत नाही. विद्यार्थ्यांच्या नुकसानीकडे कोण पाहणार ? असा प्रश्न उपस्थित करत प्रत्येक गावातील शालेय शिक्षण समिती, सरपंच आणि गावकऱ्यांनी बंद शाळेचे पंचनामे करून शिक्षकांवर कारवाईची मागणी करावी, असे आवाहन जन आंदोलनाचे विश्वस्त ड. अजित देशमुख यांनी केली आहे.

यासंदर्भात कुर्ला तालुका बीड येथील तुषार पाटील व अन्य गावकऱ्यांसह इतर काही गावातील लेखी व तोंडी तक्रार देखील प्रशासनाकडे पोहोचलेल्या आहेत. शिक्षणाधिकारी, गटशिक्षणाधिकारी यांच्यासह थेट मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे या तक्रारी दिलेल्या आहेत.

शिक्षणाची वाट लावणे, ही गंभीर बाब असताना वरिष्ठ अधिकारी मात्र या तक्रारीकडे गांभीर्याने पाहत नाहीत. त्यामुळे या अधिकाऱ्यांना जागेवर आणण्यासाठी प्रत्येक गावातील गावकऱ्यांनी आपापल्या परीने बंद शाळांचे पंचनामे करणे, त्याचप्रमाणे अँगल कॅम कॅमेरा मध्ये वेळ, तारीख आणि इतर सर्व माहितीसह फोटो घेऊन संबंधित शिक्षक व मुख्याध्यापकांवर कारवाई करण्याची मागणी करावी.

शिक्षण हे वाघिणीचे दूध म्हटलं जातं. मात्र दहावी आणि बारावीच्या परीक्षा पाहता परीक्षेतील कॉपी मुळे शिक्षणाचा दर्जा ढासळलेला आहे. त्यातच आता शाळा बंद ठेवल्यामुळे विद्यार्थ्यांचे नुकसान होत आहे.जिल्हा परिषदेच्या शाळेमध्ये मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी अचानक फेरफटका मारला आणि विद्यार्थ्यांची विद्यार्थ्यांना प्रश्न विचारले तर त्यांना गुणाकार, भागाकार अशा मूलभूत क्रिया देखील येत नाहीत. त्याचप्रमाणे इंग्रजीचा आणि विद्यार्थ्यांचा अनेक ठिकाणी गंध नाही. हे देखील दिसून येईल. त्यामुळे शिक्षणाचा दर्जा ढासळव होणार्या या दोषी शिक्षकांवर कारवाई करून त्यांचे पगार कपात करावेत, अशी मागणी ही ड. देशमुख यांनी केली आहे.

# संपूर्ण मुंडे कुटुंब धनंजय मुंडे यांच्या पाठीशी-बंधू अजय मुंडे

### कौटुंबिक विषयात चुकीचे आरोप करून आम्हाला बदनाम करण्याचे षडयंत्र-अजय मुंडे यांची स्पष्टोक्ती

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१२ मार्च**

आमचे बंधू तथा परळीचे आमदार धनंजय मुंडे यांनी परळी येथील पंढरी निवासस्थानाचे नूतनीकरण करण्याचे काम हाती घेतले असल्याने मागील काही महिन्यांपासून ते आमच्या नाथ्रा या जन्मगावी असलेल्या घरी राहण्यासाठी आई व कुटुंबासह स्थलांतरित झालेले असून, हे सर्वांनाच माहित आहे. मात्र तरीही आता कोणत्याही आरोप करायला शिल्लक राहिलेले नसल्यामुळे आमदार सुरेश धस यांनी मुंडे कुटुंबात नाराजी आहे धनु भाऊंच्या आई नाराज होऊन गावी गेल्या, त्यांचे भाऊ नाराज आहेत, अशा प्रकारच्या वल्गना करत धादांत खोटे व निराधार आरोप केले असून, संपूर्ण मुंडे कुटुंब हे धनंजय मुंडे यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे. राजकारणामध्ये एखाद्या व्यक्तीला केवळ बदनाम करण्यासाठी आज पर्यंत कुटुंबापर्यंत कधीही कोणीही आरोप केलेले नाहीत असे वक्तव्य, धनंजय मुंडे यांचे बंधू तथा जिल्हा परिषदेचे माजी गटनेते अजय मुंडे यांनी केले आहे.

एका कार्यक्रमानिमित्त बीड येथे आले असता त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. आमच्या कुटुंबात धनु भाऊ व पंकजाताई असे दोघेजण एकाच वेळी मंत्री झाल्याचे अनेक जणांना कदाचित आवडले नसावे, त्यामुळे एका पाठ एक खोटेनाटे आरोप करून सातत्याने आमच्या कुटुंबाला बदनाम करून आता शेवटी कुटुंबात फूट पाडायचे प्रयत्न केले जात असून ही बाब अत्यंत दुर्दैवी असल्याचेही अजय मुंडे म्हणाले.

स्व.संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणात जे दोषी आहेत त्यांना त्या अमानवी कृत्याची शिक्षा झालीच पाहिजे, मुंडे कुटुंबातील कुठल्याच व्यक्तीने कधीही आरोपींचे समर्थन केले नाही. मात्र त्या आडून सातत्याने खोटे आरोप करून बदनाम करण्याचे षड्यंत्र सध्या सुरु आहे, असेही ते पुढे बोलताना म्हणाले.दरम्यान आ सुरेश धस यांनी मुंडे कुटुंबात नाराजी असल्याचे जे वक्तव्य केले त्या सर्व आरोपांचे अजय मुंडे यांनी खंडन केले आहे. यावेळी त्यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेस परळीचे तालुकाध्यक्ष वैजनाथराव सोळंके, शहराध्यक्ष बाजीराव भैय्या धर्माधिकारी, प्रा. गणेश तांदळे यांसह आदी उपस्थित होते.

## आष्टी पंचायत समिती आमसभेसाठी संबधितानी उपस्थित राहावे

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१२ मार्च**

पंचायत समिती आष्टी,पाटोदा,शिरुर कासारची आमसभा पंचायत समिती पाटोदाच्या प्रांगणात दि. १६ मार्च २०२५ रोजी सकाळी १०.०० वाजता आमदार सुरेश रामचंद्र धस यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आलेली आहे.

आमसभेकरीता आजी माजी जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सदस्य, सरपंच, उपसरपंच, सहकारी संस्थेचे पदाधिकार, ग्राम पंचायत अधिकारी, सामाजिक कार्यकर्ते, मुख्याध्यापक यांनी उपस्थित राहवे, असे आष्टी पंचायत समितीचे गट विकास अधिकारी यांनी प्रसिध्दी पत्रकाव्दारे कळविले आहे.

# उद्योगांमधील प्रदूषण कमी करण्यासाठी तज्ञांची समिती स्थापन करणार-मंत्री पंकजा मुंडे

**तभा वृत्तसेवा**
**मुंबई दि.१२ मार्च**

राज्यामध्ये उद्योगांमधून विविध प्रकारचे प्रदूषण होत असते. प्रदूषण कमी करण्यासाठी शासन उपाययोजना करीत असते. उद्योगांमधील प्रदूषण कमी करण्यासाठी तज्ञांची समिती स्थापन करण्यात येईल. या समितीच्या अहवालानंतर प्रदूषण कमी करण्यासाठी अधिक प्रभावीपणे उपाययोजना करण्यात येतील. तसेच चंद्रपूर जिल्ह्यातील प्रदूषण कमी करण्यासाठी शासन सर्वतोपरी प्रयत्न करेल, असे पर्यावरण व वातावरण बदल मंत्री पंकजा मुंडे यांनी नियम ९४ अन्वये उपस्थित केलेले अर्धा तास चर्चेच्या उत्तरात दिली.



चंद्रपूर जिल्ह्यातील प्रदूषणाबाबत सदस्य सुधीर मुनगंटीवार, सदस्य देवराव भोंगळे यांनी अर्धा तास चर्चा उपस्थित केली होती.या चर्चेच्या उत्तरात मंत्री पंकजा मुंडे म्हणाल्या, प्रदूषण कमी करण्यासंदर्भात आमदारांची समितीही गठीत करण्यात येईल. चंद्रपूर देशातील सर्वाधिक प्रदूषित शहरांपैकी एक आहे. केंद्र शासनाने चंद्रपूर जिल्ह्यात २१ मार्च २०१२ रोजी नवीन उद्योगांना बंदी करण्यात आली होती. मात्र चंद्रपूर जिल्ह्यातील प्रदूषण पातळी ८३.८८ टक्क्यांवरून ५४ पर्यंत खाली आल्यामुळे केंद्र शासनाने उद्योग बंदी उठवली . त्यानंतर जिल्ह्यात उद्योगांचा विस्तार, नवीन उद्योग वाढीस लागले. राज्यामध्ये स्टील, वस्त्रोद्योग व औष्णिक वीज उद्योगसारख्या अति प्रदूषण करणाऱ्या उद्योग समूहांची उपाय योजनांची बैठक घेण्यात येईल. तसेच अतिप्रदूषण करणाऱ्या उद्योगांची एक वेगळी सूची तयार करण्यात येईल. चंद्रपूर जिल्ह्यातील उद्योग या यादीमध्ये समाविष्ट करण्यात येतील.

पर्यावरण विभागाच्या माध्यमातून प्रदूषण करणाऱ्या उद्योगांना भेटी देऊन तपासणी करण्यात येत असते. अशा तपासण्याची संख्या वाढवण्यात येईल. अधिवेशन संपल्यानंतर चंद्रपूर जिल्ह्याचा दौरा करून या भागातील परिस्थितीचा आढावा घेण्यात येईल. वेकोली कोळसा खाणीबाबत सीएमडी सोबत अधिवेशन काळात बैठक घेण्यात येईल. चंद्रपूर जिल्ह्यात उद्योगामुळे झालेल्या शेती नुकसानीबाबत कृषी विभागाच्या अहवालानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल. प्रदूषण कमी करण्यासाठी कोळशाची वाहतूक ' कन्व्हेअर बेल्टमधून बंद स्वरूपात करावी. कार्बन फॉगरचा उपयोग करण्यात येवून पाण्याची नियमित फवारणी करावी. तसेच वृक्ष लागवड करण्यात यावी, असेही मंत्री पंकजा मुंडे यांनी यावेळी सांगितले.